

१९६.०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
९३११



# रघुवंश

REFBK-0010977




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत,
अनुक्रम २०८४२ वि: परिम
क्रमांक ६८८ नों: दि: ८-१-५९

# र घु वं श

मराठी संक्षिप्त अनुवाद

अनुवादक

वि. गो. आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. १०८७७

कुमार साहित्य माला

REFBK-0010977

दीड रुपया

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

श्री : २८९

●

© १९६०
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

●

कुमार साहित्य
माला : ४०

●

मूल्य रु. १–५०

●

आवृत्ति पहिली :
शके १८८२
सन १९६०



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

●

मुद्रक :
शंकर त्र्यंबक आवटे
इंदिरा प्रिंटिंग प्रेस,
१००५ सदाशिव पेठ,
पुणें २

१०९७७

## वंदना

कविकुलगुरु कालिदास हा आपल्या थोर भारतीय संस्कृतीचा महान् कलाकार आहे. विशुद्ध भारतीय संस्कृतीचा प्रमुख प्रतिनिधि कवि हें त्याचें वैशिष्ट्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

कालिदास म्हणजे कालिदासच; त्याच्यासारखा दुसरा कोणी नाहीं, अशी त्याची महती वर्णन केलेली आहे. त्याचा काल, त्याचें जन्मस्थळ, त्याचें निवासस्थान इत्यादि बाबतींत अनेक मतभेद आहेत. तथापि सर्वसाधारणपणें इ. स पांचव्या शतकापासून ते इ. स. पूर्व पहिल्या शतकापर्यंत केव्हां तरी तो होऊन गेला असें दिसतें. कालिदासाचा स्मृतिदिन आषाढ शुद्ध प्रतिपदेला साजरा करण्यांत येतो.

या महाकवीचें जीवनचरित्र उपलब्ध नाहीं. परंतु माळव्यांतील उज्जयिनीचा राजा विक्रम याचा राजकवि म्हणून कालिदासाची प्रसिद्धि आहे. कालिदास एका गरीब ब्राह्मणकुलांत जन्मला. उज्जयिनी हेंच त्याचें नेहमींचें रहाण्याचें ठिकाण. तो शंकराचा उपासक होता. त्याचा सर्व शास्त्रें व कला यांचा चांगला अभ्यास होता. त्याचें प्रत्येक गोष्टीचें निरीक्षण मोठें सूक्ष्म होतें. कुशाग्र बुद्धि, अतुलनीय प्रतिभा आणि अपार रसिकता त्याच्या ठिकाणीं होती. तो वैदिक धर्माचा अभिमानी होता. इत्यादि माहिती कालिदासासंबंधीं मिळूं शकते. तसेंच तो स्वभावानें मोठा उमदा आणि संस्कारानें फार श्रेष्ठ प्रतीचा होता असेंहि सांगतात. तरी पण, दुर्दैवानें या जगप्रसिद्ध थोर भारतीय महाकवीची विश्वसनीय, लिहिलेली अशी माहिती कोठेंच उपलब्ध झालेली नाहीं.

कालिदास हें त्याचें नांवच कालीदेवीचा तो भक्त असल्याचें दर्शविते. आणि त्यावरून त्याच्यासंबंधीं कांहीं दंतकथाहि प्रचलित आहेत. तो लहानपणीं अगदीं निर्बुद्ध होता; आणि पुढें त्यानें कालीदेवीची कडक उपासना करून तिची कृपा संपादन केली. देवीच्या वरप्रसादानें त्याला अलौकिक प्रतिभा व काव्यस्फूर्ति लाभली. आणि त्यामुळें तो सर्वश्रेष्ठ महाकवि झाला, अशी ती कथा आहे. कालिदास भोजराजाच्या पदरीं होता अशीहि दंतकथा आहे.

याचा अर्थ कालिदास या व्यक्तीची प्रत्यक्ष माहिती फारशी मिळत नाहीं. त्याच्याविषयीं आपल्याला जें निश्चित कांहीं माहीत आहे तें म्हणजे त्याचीं काव्य-

नाटकें, त्याच्या श्रेष्ठ, अप्रतिम अशा साहित्यकृति. कालिदासाच्या साहित्यसंपदेंत चार काव्यें आणि तीन ( किंवा चार ) नाटकें यांचा अंतर्भाव होतो. 'रघुवंश', 'कुमारसंभव', 'मेघदूत' आणि 'ऋतुसंहार' हीं तीं काव्यें; आणि 'शाकुन्तल', 'मालविकाग्निमित्र', 'विक्रमोर्वशीय' (तसेंच 'नलोदय' हेंहि नाटक कालिदासाचेंच असल्याचें कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे ) हीं तीं नाटकें. या काव्य-नाटकांवरून कोणालाहि प्राचीन भारतीय संस्कृतीचा परिचय करून घेणें सोपें आहे.

'उपमा कालिदासस्य' – म्हणजे उपमेचा उपयोग करावा तर कालिदासानेंच अशी त्याची ख्याति आहे. कालिदासाचा 'कविकुलगुरु' असा गौरवपूर्वक उल्लेख केला जातो, तो यथार्थ आहे. 'कविकुलगुरु' ही पदवी त्याला जयदेव कवीकडून लाभली. तर " जगांत कालिदासासारखे दोन-चारच महाकवि होऊन गेले " असे एका भारतीय पंडिताचे उद्‌गार आहेत. कालिदासाच्या साहित्यसंपदेनें केवळ आपण भारतीयच मोहून गेलों असें नव्हे. जगप्रसिद्ध जर्मन महाकवि गटे हा 'शाकुन्तल' वाचून त्याची मुक्तकंठानें स्तुति करूं लागला. आणि दुसरा एक पाश्चिमात्य पंडित तर ह्या आनंदानें बेहोष होऊन अक्षरशः नाचूं लागला.

कालिदासाच्या 'रघुवंश' आणि 'कुमारसंभव' ह्या काव्यकृति पंचमहाकाव्यांत गणल्या जातात. त्यांतील 'रघुवंशा'चाच संक्षिप्त अनुवाद प्रस्तुत पुस्तकांत दिला आहे.

कालिदासाच्या काव्यकृतींचीं भाषांतरें वा अनुवाद जगांतील बहुतेक सर्व प्रगल्भ भाषांतून झालेले आहेत. काव्यांत विशेष रमणीय म्हणजे नाटक आणि त्यांतहि अधिक रमणीय म्हणजे कालिदासाचें 'शाकुंतल'. या 'शाकुन्तला'नें अनेक पाश्चिमात्यांनाहि वेड लावलें आहे.

कालिदास हा आपला राष्ट्रीय महाकवि आहे. इंग्लंडला जसा शेक्सपिअर तसा भारताला कालिदास. या थोर महाकवीचें जीवनचरित्र अज्ञातांत गुरफटलेलें असलें तरी त्याच्या काव्यकृति आपल्यासमोर प्रकट आहेत. तद्द्वाराच त्या महान कवीला वंदन असो.

● ● ●

## 'रघुवंशा'विषयीं

'रघुवंश' हें महाकाव्य लिहून कालिदासानें भारतीय राजांचें भव्योदात्त चित्र जगासमोर ठेवलें आहे. दिलीपापासून अग्निमित्रापर्यंत तीस राजांचें वर्णन या अप्रतिम महाकाव्यांत आलें आहे. प्रसिद्ध अशा तेहतीस पंडितांनीं यावर टीका लिहिल्या आहेत.

'रघुवंशां'तील राजांचीं वर्णनें, कांहीं अद्भुत स्थळें वगळतां वास्तववादी दृष्टिकोनांतून केलेलीं आहेत. रेखीव वर्णनशैली, मनोहर काव्यकौशल्य, उत्कट प्रतिभा, काव्यवस्तूंतील रमणीयता इत्यादि अनेक गोष्टींचा अनुभव 'रघुवंश' वाचतांना येतो. महाकाव्याच्या रचनेसाठीं लागणारी बहुश्रुतता, सूक्ष्म दृष्टि, गाढ विद्वत्ता आणि अलौकिक प्रतिभा या सर्वांचा समुच्चय कालिदासाच्या ठिकाणीं झाला असल्याचा प्रत्यय हें महाकाव्य वाचून सहज येण्यासारखा आहे. कालिदास प्रवृत्तीनें मोठा रसिक होता. त्याला विनोदाची आवड असल्याचीहि खूण जागोजाग मिळते. या सर्व गुणांमुळें कालिदासाचा उल्लेख 'रघुकार' म्हणूनहि केला जातो तो योग्यच आहे.

* * *

कालिदासानें 'रघुवंशां'त वर्णिलेलीं रघुवंशीय राजांचीं चरित्रें येथें सारांशरूप दिलीं असलीं तरी त्यांतल्या महत्त्वाच्या भागांचें वर्णन मात्र विस्तारपूर्वक दिलें आहे. कालिदासाची विनयशीलता, त्यानें सांगितलेले रघुराजांचे विशेष, सीतेनें रामाला पाठविलेला तेजस्वी संदेश, अतिथी राजाची आदर्श राज्य-व्यवस्था इत्यादि गोष्टी उदाहरणासाठीं म्हणून सांगतां येतील. कांहीं संदिग्ध गोष्टी फोड करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कथनांतला भाव आणि आवेश यांत भाषांतरामुळें कमतरता पडूं नये म्हणून कांहीं ठिकाणीं अधिक शब्द घालून मुळांतील भाव स्पष्ट करण्याचा यत्न केला आहे. तरी पण मुळाला कोठेंहि धक्का पोहोंचूं नये याची काळजी घेतली आहे. शृंगारिक वर्णनें मात्र गाळलीं आहेत.

या अनुवादांतील एक महत्त्वाचा उद्देश 'रघुवंश' महाकाव्यांतील आशय यथार्थपणें वाचकांच्या ध्यानीं यावा, हा आहे. कांहीं महत्त्वाचीं सुभाषितेंहि मूळ संस्कृतमधूनच जागच्या जागींच ठळक ठशांत घातलीं आहेत. ज्यांचें विस्तारानें

वर्णन या पुस्तकांत केलें आहे ते सगळे भाग पाठ्यहि आहेत अशी शिफारस करावीशी वाटते. त्यासाठीं तीं स्थळें जिज्ञासू वाचकांनीं मुळावरून स्वतंत्रपणें उतरावींत आणि उल्हसित मनानें त्यांचें पाठांतर करावें.

कालिदासाच्या या सर्वोत्तम काव्याचें प्रास्ताविक त्याच्याच शब्दांत देणें उचित वाटतें. काव्यरचनेला आरंभ करण्याच्या वेळीं जगताच्या थोर माता-पित्यांना वंदन करतांना हा महाकवि विनम्रभावानें म्हणतो, 'पवित्र वाचा (शब्द) आणि तिचा सम्यग् अर्थ हीं दोन्ही जशीं परस्परांना सोडून कधींच असत नाहींत, त्याप्रमाणें नेहमींच एकरूपतेंत एकत्र नांदणाऱ्या सकल विश्वाच्या पार्वती-परमेश्वर नामक प्रकृति-पुरुषरूपी माता-पित्यांना मी नम्रभावानें अभिवादन करतों. हेतु हा कीं, मला माझी काव्यरचना करतांना शब्द आणि त्यांच्या यथार्थ–योग्य अर्थाच्या ज्ञानाची केव्हांहि उणीव पडूं नये.' कालिदासाच्या आणखी एका गुणविशेषाचें दर्शन येथें होतें. हा जगद्वंद्य व अलौकिक प्रतिभासंपन्न महाकवि अति विनयानें म्हणतो, 'कोठें तो साक्षात् सूर्यापासून उत्पन्न झालेला महान् रघुवंश आणि कोठें माझी लहानसहान विषयांतच चालणारी अल्प बुद्धि! लहानशा होडीनें दुस्तर महासागर तरून जाण्याचा मूर्खपणाच जणुं मी येथें करीत आहें! उंच माणसाच्या हाताला मोठ्या प्रयासानें येणारें फळ घेण्यासाठीं एखाद्या ठेंगूनें आपला हात उंचावण्याचा मूर्खपणा मी येथें करीत आहें, असें मला वाटतें. कारण केवळ थोर कवींनाच प्राप्त होणारें यश मिळविण्याचा खटाटोप मंद बुद्धीचा असूनहि मी करीत आहें. तथापि, माझी अशी धारणा आहे कीं, वाल्मीकीसारख्या विख्यात् प्राचीन कवींनीं आपल्या प्रतिभासंपन्नतेनें ज्याचा रस्ता अगोदरच रुळवून ठेवला आहे, त्या वाटेनें, वेजें पाडलेल्या मण्यांतून दोरा जसा सहज ओवला जातो, त्याप्रमाणें मला विनाप्रयास जातां येईल.' त्या थोर महाकवीचा केवढा हा विनय!

आपण रघुवंशीय राजांचें वर्णन करण्यास कां उद्युक्त झालों याविषयीं कवि सांगतो, 'असा अल्पशी मति असलेला मी रघुवंशांतल्या अभिजात गुणांनीं आकर्षिला जाऊन त्यांचें वर्णन करण्याचें धाडस करतों आहें. या वंशांतील राजे जन्मापासूनच पवित्र होते. फळ हातीं लागेपर्यंत प्रयत्नांचा पाठपुरावा ते करीत. त्यांचा राज्यविस्तार सागरापर्यंत पोहोंचलेला असे. त्यांचा रथ-संचार स्वर्गलोकापर्यंत होत असून ते यथाविधि यज्ञयाग करणारे; याचकांना कधींहि विन्मुख व

दवडणारे; अपराध्यांना त्यांच्या अपराधानुरूप शासन करणारे; योग्य काळीं सावधगिरी बाळगणारे; सत्पात्रीं दान करतां यावें म्हणूनच अर्थसंचय करणारे; कधीं खोटें बोलण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून मितभाषी असलेले; यशासाठीं दिग्विजय करणारे; बालपणीं विद्याभ्यास, तारुण्यांत उपभोग, उतारवयांत विरागी वृत्ति आणि ईश्वरध्यान करीत मृत्यु पत्करणें, असा आश्रमधर्म ठेवणारे हे रघुवंशीय राजे होते.'

एक उत्कृष्ट गुणसंपन्न महाकाव्य आणि राजसत्ताधारी भव्योदात्त चारित्र्याचे देदीप्यमान आदर्श समोर ठेवणारी साहित्यकृति म्हणून 'रघुवंशा'ची थोरवी आहेच. तसेंच भारतीयांच्या स्वत्व-स्वाभिमानाचा यथार्थपणें परिपोष व्हावा; त्यांच्या प्राचीन, मध्ययुगीन वा अर्वाचीन इतिहासांतले उत्कट विशेष त्यांच्या दृष्टीपुढें नेहमीं जागते रहावेत आणि त्यायोगें त्यांचे वर्तमानकालीन जीवन पौरुषपूर्ण, स्वाभिमानी, सुसंघटित आणि यशस्वी व्हावें यासाठींहि प्रस्तुतसारख्या वाङ्मयीन रचनेचें महत्त्व फार मोठें आहेच.

• • •

# र घु वं श


| | | |
|---|---|---|
| भक्तिमान् यशोधन सम्राट दिलीप | ... | १ |
| दानशूर दिग्विजयी रघुराज | ... | २ |
| प्रेमळ अयोध्यापति अज | ... | ३ |
| राजगुणसंपन्न दशरथ | ... | ४ |
| प्रजावत्सल पुरुषोत्तम श्रीराम | ... | ५ |
| रामतनय कुश | ... | ६ |
| आदर्श राजनीतिधुरंधर अतिथि | ... | ७ |
| बालराजा सुदर्शन | ... | ८ |

## : १ :

# भक्तिमान् यशोधन सम्राट् दिलीप

* * * * * * * * * * * * * * * * * * *

### गुणसमृद्ध दिलीप

वेदांत ज्याप्रमाणें ॐकार हा पहिलाच पवित्र शब्द आहे त्याप्रमाणें भगवान् सूर्यनारायणाचा सुपुत्र मनु नांवाचा पृथ्वीवरील पहिला पूजनीय सम्राट् होऊन गेला. त्याच्याच शुद्ध कुळांत दुधाच्या सागरांतून ज्याप्रमाणें चंद्र उत्पन्न झाला त्याप्रमाणें अतिशय पवित्र असा दिलीप नांवाचा राजश्रेष्ठ जन्मला. तो शुद्ध चारित्र्याचा, कर्तव्यकुशल, सामर्थ्यशाली, पुऱ्या उंचीचा, धिप्पाड शरिराचा, अतुल पराक्रमी, शत्रूंचा तेजोभंग करणारा, विशाल बुद्धीचा, गाढ विद्यासंपन्न असलेला, यशस्वी, दिसायला देखणा; आणि अशासारख्या अनेक राजगुणांमुळें प्रजेचें एकमेव आश्रयस्थान बनलेला असा विख्यात राजा होता. प्रजेपासून तो कर घेत असे हें खरें; पण त्याचा उपयोग तो तिच्या हितासाठींच करी. यामुळें प्रजाहि त्यानें घालून दिलेल्या नीतिनियमांचें पालन निष्ठेनें करीत असे. त्याच्या सकस शरिराला साजेशी त्याची बुद्धि तेजस्वी होती. या बुद्धीला अनुरूप असाच त्याचा शास्त्राचा अभ्यास असे. या अभ्यासाला धरूनच तो आपले सगळे उद्योग पार पाडी. यामुळें त्याच्या व्यवसायाची फलनिष्पत्ति अनुकूलतेनें होण्याला त्याला कधीं अडचण पडली नाहीं. राज्यशास्त्रांत निपुण असलेला हा लोकप्रिय सम्राट् स्वतःच्या विचारआचारांत नीतिमान होता. त्याचें चतुरंग सैन्यहि नेहमीं सिद्ध असे. त्याच्या मनांतल्या योजना कोणाला कळत नसत. परिणामावरूनच त्याच्या कृत्यामागच्या विचारांचा सुगावा लागे. स्वतः तो निर्भय, सुदृढ प्रकृतीचा आणि अनासक्त असल्यामुळें त्याच्या रक्षणक्षमतेला, धर्मशीलतेला, अर्थसंपादनाला आणि प्रसन्नतेला आगळीच शोभा आली होती ! तो ज्ञानी, समर्थ आणि त्यागी होता; तरीपण तो अबोल, क्षमाशील आणि स्तुतिविन्मुख असे. हीं त्याच्या स्वभावांतलीं एकमेकांना शोभा आणणारीं

गुणद्वंद्वें त्याच्याबरोबरच जन्माला आलीं होतीं ! वैभवशाली सम्राट् असूनहि तो विरागी होता. वेदवेदांगामध्यें त्याचा हात धरणारा कोणी नसे. आणि त्याच्या धार्मिकतेनें तर सीमाच गांठली होती. यामुळें तरुणपणींच त्याला प्रौढत्व आलेलें होतें.

प्रजेचें संरक्षण, शिक्षण आणि धारणपोषण हीं तो आईबापांच्या प्रेमानें आणि जाणिवेनें करी. आपलीं राज्यविषयक कर्तव्यें उत्तम रीतीनें पार पाडतां यावींत म्हणूनच तो लोकांपासून करभार घेत असे. त्याच्या तेजस्वी-पणाचा प्रभाव इतका विलक्षण होता कीं त्याच्या राज्यांत कोणीहि चोरी करायला धजत नसे. शत्रूपासूनहि तो गुणग्रहण करी. आणि कोणी कितीहि प्रिय असला तरी त्याच्या चुकीची तो गय करीत नसे. ईश्वरानें त्याच्या ठायीं जे गुण दिले होते, ते लोककल्याणाकरितांच दिले होते.

**वसिष्ठाश्रमांत**

मगधवंशांतील सुशील आणि विनयशाली सुदक्षिणा ही दिलीपाची धर्म-पत्नी होती. बरेच दिवस लोटले तरी पुत्रसंतान नसल्यानें दोघेंहि मनांत कष्टी असत. संतानप्राप्तीसाठीं कांहीं धार्मिक आचार करतां यावेत म्हणून राजानें राज्यकारभार सचिवांवर सोंपविला आणि राणीला बरोबर घेऊन तो वसिष्ठाश्रमाकडे रथांतून निघाला. त्यानें आपल्याबरोबर अगदीं मोजकें सैन्य घेतलें होतें. वाटेनें जातांना, धान्याच्या शेतावरून वहात येणारा मद आणि सुगंधित वारा भोंवतालच्या झाडांना हलकेच डोलवीत त्यांना सुख देण्यासाठीं झुळझुळत होता. त्यांच्या रथांच्या होणाऱ्या घरघरीला मेघांचा गडगडाट समजून आसपासच्या मोरांनीं आपल्या माना उंचावल्या आणि त्यांनीं षड्ज सुरांत केका गाऊन राजाराणीला आनंदित केलें. हरिणांचीं जोडपींहि भयभीत आणि आश्चर्यचकित होऊन दुरूनच त्या उभयतांना पहात होतीं. सारस पक्ष्यांनीं वर आकाशांत रचलेल्या मालाकार ओळींतून होणारा अस्फुट किलबिलाट या राजप्रवाशांना आनंदित करीत होता. शेजारच्या सरोवरांतल्या कमलांवरून वहात आलेला थंडगार वायु हा त्या प्रवाशांच्या निःश्वासांच्या सुवासांत भर टाकीत होता. दोहों बाजूला डोक्यावर दुधादह्याच्या घागरी घेतलेल्या वन्य जमातींतल्या वृद्धांना त्यांची नांवें मधून मधून विचारीत त्यांचा प्रवास चालला होता.

संध्याकाळीं ते वसिष्ठांच्या आश्रमांत पोहोंचले. सपत्नीक सम्राटाचा तेथें यथोचित सत्कार झाला. उभयतांनीं वसिष्ठ-अरुंधतींना वंदन केल्यावर त्यांनीं पण त्यांचें उलट अभिनंदन केलें. कुशल प्रश्नोत्तरें झालीं.

“ माझ्या राज्याचीं स्वामी, मंत्री, मित्र, कोश, देश, दुर्ग आणि सैन्य हीं सातहि अंगें व्यवस्थित असून दुष्काळासारख्या दैवी आणि चोरीसारख्या मानवी संकटांपासून प्रजेचें रक्षणहि मी करूं शकतों. कोणी शत्रू वर डोकें काढण्यास धजत नाहीं. देशांत सगळीकडे वेळच्यावेळीं पाऊस होत असल्यानें शेतांतलीं पिकें चांगलीं येतात. माझी प्रजा दीर्घायु, निर्भय, आपत्तिरहित आणि विद्याभ्यासांत गढून गेलेली अशी असते.हें सगळें तुमच्या कृपेचें फल होय ! पण एक उणीव मात्र नेहमीं भासते. सुदक्षिणेच्या ठायीं मला मुलगा नसल्यानें रत्नें प्रसवणारी धरणी मजवर रागावली आहे. माझ्या मागें माझ्या पितरांना श्राद्धद्वारां पिंडदान करणारा वंशज कोणी नसल्यानें त्यांना कायमचें अतृप्त रहावें लागेल. माझ्या हयातींत मी केलेलें पिंड-दानहि माझे पितृगण जड मनानें स्वीकारूं लागतील. इहपरलोकीं जें सुख माणसांना लाभत असतें, तें त्याच्या संततीकडूनच. मला संतति नसल्यानें माझ्या शिरावरचें पितरांना पिंडदानादि क्रियांनीं तृप्त करण्याचें दायित्व तसेंच अपुरें रहाणार आहे. त्यामुळें माझ्या मनाला होणारी पीडा दिवसें-दिवस असह्य होत आहे. हे सद्गुरु वसिष्ठ तात, ज्यायोगें मी पितृऋणांतून सुटेन, असा उपाय तुम्हीच मला सांगा. या अडचणींतून पार पाडण्याला तुम्हीच एकटे समर्थ आहां. ” याप्रमाणें दिलीपानें वसिष्ठ गुरूंची प्रार्थना केली.

**गुरूंनीं सांगितलेली साधना**

थोडा वेळ ध्यानमग्न होऊन वसिष्ठांनीं राजाला पुत्रप्राप्ति कां झाली नाहीं, याच्या कारणांचा शोध केला. भानावर आल्यावर प्रसन्नचित्त झालेले ऋषि राजाला म्हणाले, “ बऱ्याच दिवसांची गोष्ट आहे. तूं एकदां इंद्रलोकाकडून परत येत होतास. वाटेंत कल्पतरूखालीं सुरभि कामधेनु विसांवत होती. त्यावेळीं कांहीं कौटुंबिक अडचणीमुळें तुझ्या हातून तिचा प्रदक्षिणा–पूजन–वंदनादि सत्कार झाला नाहीं. त्यामुळें कामधेनु तुजवर संतापली आणि तिनें तुला शाप दिला कीं, ‘ ज्याअर्थीं तूं माझा अपमान

केलास, त्याअर्थी माझ्या संततीची आराधना केल्याशिवाय तुला संतति होणार नाहीं.'

"त्या वेळीं गंगानदीच्या प्रवाहाच्या गर्जनेमुळें गाईचा हा शाप कोणालाच ऐकूं आला नाहीं. पूज्य वस्तूचा आदर केला नाहीं म्हणजे चुकणाऱ्याचें अकल्याण होत असतें.[1] अस्तु. सध्यां सुरभि ही पातालांत आहे म्हणून त्या सुरभीच्या नंदिनी नांवाच्या मुलीची तुम्ही उभयतां सेवा करा. ती तुमची इच्छा पुरी करील." हें गुरूंचें म्हणणें पुरें होतें न होतें तोंच नंदिनी रानांतून परत आली. हा शुपशकून समजून वसिष्ठांनीं दिलीपाला तिची सेवा पुढीलप्रमाणें करायला सुचविली: "ती चालत असेल तेव्हां तिच्या-मागोमाग तूं चालत जा. ती विसावेल त्या वेळींच तूं भूमीवर तिच्या-शेजारीं विश्रांति घेतलीस तरी चालेल. ती उभी असेल त्या वेळीं तूं उभा रहा आणि जेव्हां ती पाणी प्राशन करील तेव्हांच तूं पण पाणी पीत जा. तुम्ही दोघांनीं सकाळीं तिची पूजाअर्चा करा. मग तूं तिला रानांत नेत जा आणि सायंकाळीं तिला परत आश्रमांत आण. तुझी इच्छा पूर्ण होईपावेतों तुला नंदिनीची याप्रमाणें सेवा करायला हवी. तुझ्या कामांत कोणतेंहि संकट न येतां तूं यशस्वी होशील असा मी तुला आशीर्वाद देतों."

### नंदिनीच्या सेवेचें व्रत

वसिष्ठांच्या आज्ञेप्रमाणें राजाराणींनीं नंदिनीची सेवा करण्याचें ठरविलें. त्यांच्या सूचनेप्रमाणें त्यांनीं ती रात्र पर्णशाळेंत दर्भशय्येवर झोंपून काढली. गोसेवाव्रताला लागणारी सर्व सिद्धता मुनींनीं केली. पहांट होतांच उठून सुदक्षिणेनें नंदिनी गोमातेची गंधफुलें वाहून पूजा केली. धार काढल्या-नंतर यशोधन राजा दिलीप तिला रानांत घेऊन निघाला. राणी पण गायीच्या चालण्यानें पवित्र झालेल्या रस्त्यानें नंदिनीमागोमाग थोडा वेळ चालून गेल्यावर आश्रमांत परतली. रानांत हिंडतांना गाईला भूक लागली असें लक्षांत आल्यावर तिच्या तोंडीं ताज्या सुगंधित गवताचा चारा द्यावा; तिच्या अंगावरच्या माश्या झटकाव्यात; तिला हलुवार हातांनीं गोंजारावें; गाय चालत असेल तोंपावेतों मागें चालत रहावें; ती उभी असतांना आपणहि

---

१. प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजा व्यतिक्रमः।

उभें रहावें; तिला तहान लागलेली पाहून पाणी पाजावें; अशा रीतीनें आपलें वैभवशाली राजेपण दिलीप पार विसरून गेला. आणि नंदिनीची जणुं आपण सावली आहों, इतका एकनिष्ठ सेवक बनून तो तिची सेवा करूं लागला.

आपल्या डोक्यावरचा केशसंभार रानवेलीच्या एका डहाळीनें बांधून हातीं धनुष्यबाण घेतलेला तो राजा नंदिनीच्या मागोमाग निमूटपणें रानांतून भटकत होता. राजाच्या जयजयकारासाठीं जणुं सभोंवारच्या झाडावरून पक्षी किलबिलाट करीत होते. वाऱ्याच्या झोतानें सहजपणें हेलावणाऱ्या वेली आपल्या फुलांची राजावर वृष्टि करीत. हरिणी आपल्या कावऱ्याबावऱ्या दृष्टींनीं राजाला न्याहाळीत होत्या. पोकळ वेळूंच्या नळ्यांमधून होणाऱ्या कूंजनानें वनदेवता राजस्तुति करीत असल्याचा भास होई. आपल्या अणु-अणूंतून वहाळाच्या पाण्याचे तुषार आणि रानफुलांचा सुगंध भरून घेऊन त्याच्या हळुवार झुळुकांनीं वनदेवताहि तपस्वी दिलीपाची सेवा करायला विसरली नाहीं. नंदिनीसह राजाचें जेथें जेथें हिंडणें होई त्या त्या ठिकाणीं आणि त्याच्या सभोंवारहि जिकडे तिकडे फुलाफळांनीं झाडें भारावून गेलेलीं असत. सर्वत्र वातावरण कसें प्रसन्न, पवित्र आणि शांत होतें. अशा रीतीनें दिवसभर हिंडणें फिरणें झाल्यावर सूर्य अस्तास गेला आणि नंदिनी पण गोशाळेकडे परतली.

नंदिनीसमवेत आश्रमांत परतलेल्या सम्राटाचें भेटीसाठीं आसुसलेल्या, अधीर आणि उपाशी डोळ्यांनीं सुदक्षिणेनें दर्शन घेतलें. पतिपत्नींच्या मध्यें नंदिनी चालत असतांना तें दृश्य दिवस आणि रात्र यांच्या दरम्यान येणाऱ्या संध्येप्रमाणें भासलें. सुरभिकन्यकेला सम्राज्ञीनें प्रदक्षिणा घातली, तिला नमस्कार केला आणि तिच्या कपाळाला गंधकुंकुमाचा टिळा लावून तिची तिनें मनोभावानें पूजा केली. वासराच्या भेटीला उतावीळ असली तरीहि नंदिनीनें राणीच्या पूजेचा स्वीकार शांतपणानें उभें राहून केला. राजाराणींची मनांतली पुत्रप्राप्तीची इच्छा लवकरच पुरी होईल, हें कदाचित् तिला सुचवायचें असेल ! राजानेंहि गुरूंना सपत्नीक वंदना केली; संध्याकर्म उरकलें आणि पुन्हा तो नंदिनीच्या सेवेला लागला. ती झोपीं गेल्यानंतर मगच राजा झोपीं गेला व पहाटे ती उठतांक्षणीं तो पण उठला.

### दिलीपाच्या निष्ठेला कस

अशा प्रकारें नंदिनीची सेवा करण्यांत दिलीप पतिपत्नींचे एकवीस दिवस लोटले. बाविसाव्या दिवशीं या वसिष्ठ मुनीच्या होमधेनूच्या मनांत आपल्या राजसेवकाच्या निष्ठेला कस लावून पाहण्याचें आलें. रानांत भटकत भटकत ती राजाला दूर दूर घेऊन गेली आणि गंगामाईच्या धबधब्यालगत हिमालयाच्या एका डोंगरकपारींत, गुहेंत ती शिरली. नव्या निसर्गरम्य प्रदेशांत आल्यानें राजाची दृष्टि सहजच तेथली शोभा लुटण्यांत गुंतून गेली. त्याचें गाईवरचें लक्ष ढळून कांहीं काळ सृष्टिसौंदर्य न्याहाळण्यांत गढलें. इतक्यांत धनुर्धारी राजाचें गाईकडे दुर्लक्ष झालेलें पाहून एका सिंहानें गाईवर झडप घातली! गुहेंत गेलेल्या गोदेवीनें मोठा करुण हंबरडा फोडला. त्याच्या प्रतिध्वनीनें सगळी गुहा थरारली. त्यानें राजाला पण त्याच्या स्वप्नांतून जागें केलें. तो तत्काळ आंत डोंगराच्या पोटांत गेला. तेथें जाऊन पहातो तों एका अक्राळ विक्राळ सिंहानें नंदिनीच्या अंगावर झडप घातल्याचें क्रूर आणि गंभीर दृश्य त्यानें बघितलें. राजपराक्रमाला सिंहानें दिलेलें हें उघड उघड आव्हान होतें! दिलीपासारखा धुरंधर धनुर्धारी शूर राजा रक्षणासाठीं सिद्ध असतांना सिंहानें गरीब गाईवर, सम्राटाच्या उपास्य देवतेवर, प्राणान्त झेप घ्यावी, ही घटना दिलीपाला अत्यंत अपमानाची वाटली. त्यानें तत्काळ भात्यांतला बाण उपसण्यासाठीं हात घातला. उन्मत्त वनराजाचा वध तत्काळ साधायचा होता त्याला. त्याचा उजवा हात धनुष्याकडे धावला. पण चमत्कार असा झाला कीं, राजाची सगळी हालचाल जेथल्या तेथेंच थांबली. एकाद्या चित्राप्रमाणें राजा अचल झाला! एकाद्या मांत्रिकानें चिडलेल्या नागाला रोधून धरावें, तसा क्रूर केसरीवर प्रहार करण्यासाठीं उतावीळ झालेल्या राजाचा राग आणि पराक्रमहि रोधला गेला. अशा प्रकारानें विस्मित झालेल्या त्या शूर योद्धयाशीं सिंह मनुष्यवाणीनें बोलूं लागला :

### नर-सिंह संवाद

"पृथ्वीपति राजा, तुझी धडपड थांबव आतां. माझ्यावर तुझ्या अस्त्रांचा वा बाणांचा कांहींहि परिणाम होणार नाहीं. खडकावर उगाच डोकें आपटून घेऊं नकोस. अरे, सोसाट्याचा वारा झाडें उन्मळून टाकील; म्हणून काय तो



दिलीपानें पाहिलें तों– नंदिनीच्या अंगावर एका अक्राळविक्राळ सिंहानें झडप घातल्याचें त्याला दिसलें. ( पृ. १४ )

पर्वताशीं झुंजूं शकेल ?[२] ज्याच्या पाठीच्या आधारानें भगवान् शंकर आपल्या नंदीवर बसतात, असा शंकरपादस्पर्शानें पावन झालेला कुंभोदर नांवाचा मी एक देवसेवक आहें. हा समोर जो देवदारु उभा आहे ना, तो पार्वतीनें स्वतः पाणी घालून पुत्रप्रेमानें वाढविला असल्यानें शंकराला पण तो मुला-प्रमाणेंच आवडता झाला. एकदां कोणा एका वन्य गजानें आपलें डोकें या देववृक्षावर खाजविल्यानें त्याची कातडी सोलली गेली. आपला मुलगा देव-सेनानी स्कंदच जणुं राक्षसास्त्रांनीं जखमी झाला आहे, अशा भावनेनें गौरीला त्याचें दुःख झालें. या देवदारूला कोणाहि श्वापदापासून पुन्हां त्रास पोंचूं नये म्हणून तेव्हांपासून सिंहरूपांत श्रीशिवानें माझी योजना या गुहेंत केली आहे. माझी भुकेचीच वेळ आहे ही. स्वतः महादेवानेंच मला माझें रक्तमांसाचें आवडतें जेवण या गाईच्या रूपांत धाडून दिलें आहे ! आतां तूं येथून परत जा. मनांत शरमण्याचें तुला कांहीं कारण नाहीं. कारण जिचें रक्षण शस्त्रास्त्रादींनींहि करतां येणें तुला मुळींच शक्य नाही ती गाय माझ्या हातून मारली गेली म्हणून तुझ्या यशाला त्यामुळें कमीपणा येईल थोडाच ! शस्त्रानें रक्षणीय अशा गोष्टींचें रक्षण शस्त्रानेंहि करणें जेव्हां अशक्य होतें तेव्हां त्यामुळें शस्त्रधारण करणाराच्या प्रतिष्ठेला उणेपणा येतो असें नाहीं."[३]

शंकरप्रभावाचा हा सगळा प्रताप आहे, असें जाणून राजा दिलीपानें झालेला अपमान मनांतल्या मनांत गिळला. आणि सिंहाला तो उलट म्हणाला,

"हे वनराजा, तूं साक्षात् भगवान् शंकराचा सेवक. त्याच्याच आज्ञेनें तूं येथें राहिला आहेस, हें मी जाणतों. त्या देवदेवाचें स्थावरजंगमावर असलेलें स्वामित्वहि मी आदरपूर्वक मानतों. तरीपण अहिताग्नि वसिष्ठ गुरूंच्या या गोधनाची मी उपेक्षा करणें, कसें योग्य ठरेल बरें ? तूं गाईऐवजीं मला खाऊन तुझी भूक शमव आणि ही मुनीची गाय मोकळी सोड. तिचें वासरूं तान्हें आहे. ती आश्रमांतल्या आपल्या बछड्याला भेटायला अगदीं अधीर झालेली आहे."

---

२. न पादपोन्मूलनशक्तिरंहः शिलोच्चये मूर्च्छति मारुतस्य।

३. शस्त्रेण रक्ष्यं यदशक्य रक्ष्यं न तद्यशः शस्त्रभृतां क्षिणोति।

राजाची ही काकुळती शंकराच्या किंकरानें ऐकल्यावर थोडें हंसून तो त्याला उपदेश करूं लागला :

" राजा तूं जगताचा सम्राट्. शिवाय तूं तरुण आहेस. तूं देखणा पण आहेस दिसण्यांत. अशा तुझें मोलाचें शरीर त्या मानानें अल्पमोली असलेल्या गाईच्या मोबदल्यांत द्यायला तूं तयार व्हावेंस, हें तुझें करणें मला अगदीं वेडेपणाचें वाटतें.[४] प्राणिमात्रावर असलेल्या दयेच्या पोटीं तूं गाईचें रक्षण स्वतःचा देह समर्पण करून करूं इच्छितोस. तर असें पहा, तूं आतां प्राणार्पण केल्यानें एकाच प्राण्याचा जीव वांचेणार आहे. पण जर गाय तूं मला खाऊं दिलीस आणि तूं स्वतः जगलास तर आपल्या प्रजेचें संकटां-पासून पित्याप्रमाणें रक्षण करण्यानें असंख्य प्राण्यांवर दया केल्याचें श्रेय तुला लाभणार नाहीं का ? कदाचित् वसिष्ठांच्या रागाला तूं घाबरत असशील. पण तूं त्यांचा राग त्यांना कोटींनीं गायी दान देऊन सहज शांत करूं शकशील. म्हणून तूं स्वतःचा बळी देऊं नकोस. माझें ऐक. "

यावर नरेंद्रानें मृगेंद्राला उत्तर दिलें :

" नाशापासून रक्षण करतो त्यालाच क्षत्रिय म्हणतात.[५] एवढेंहि ज्या क्षत्रियाला साधत नसेल अशा क्षत्रियानें निंदास्पद आयुष्य जगण्यांत किंवा राज्याचा नुसता उपभोग घेण्यांत तरी काय अर्थ आहे ! तूं म्हणतोस कीं वसिष्ठांना पुष्कळ गाई देऊन त्यांचा राग शांत करतां येईल म्हणून.पण या निर्दोष कामधेनूच्या कन्यकेला तूं सिंह स्वतः मारीत नसून श्रीशंकराच्या प्रभा-वानें तूं तिला वधण्याला धजला आहेस. म्हणून माझ्या देहाच्या मोबदल्यांत मी तिला सोडविणें हेंच न्यायाचें ठरेल. तूं तर तुझ्या धन्याचा सेवक. त्यानें सांगितलेलें देवदारूच्या रक्षणाचें काम प्रयत्नपूर्वक पार पाडण्यासाठींच केवळ तुझी योजना झाली आहे. असें असतांना आपल्या नियोजित कामाच्या चाकोरीबाहेर जाऊन जर तूं रक्षणीय अशा गाईला ठार मारलेंस तर आपल्या धन्यापुढें तुला तोंड तरी दाखवितां येईल का ? बरें, मला मारणें बरें नाहीं, असें तुला वाटत असेल तर तू गाईऐवजीं माझ्या शरिराचा वध कर. कारण माझें पांचभौतिक जड शरीर तूं मारून खाल्लेंस

---

४. अल्पस्यहेतोर्बहुहातुमिच्छन् विचारमूढः प्रतिभासि मे त्वं ।

५. क्षतात् किल त्रायत इत्युदग्रः क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः ।

तरी माझ्या यशःशरिरावर दया दाखविल्याचें श्रेय तुला लाभणार आहे. अरे, शरीर हें केव्हांतरी नष्ट व्हायचेंच आहे. म्हणून माझ्यासारख्या विवेकी पुरुषानें त्याविषयीं उदासीन असणेंच योग्य होय. आपण दोघे परस्परांचे मित्र झालों आहोंत. म्हणून कुंभोदरा, माझी ही मागणी पुरी कर आणि स्नेह्याचें कर्तव्य पार पाड. "

असें म्हणून दिलीप आपल्या शरिराचा घांस क्रूर सिंहाच्या जबड्यांत देण्यासाठीं खालीं मान करून शांतपणें उभा असतां सिंहाच्या झेपेऐवजीं विद्याधरगणांनीं वरून आकाशांतून उधळलेलीं फुलें त्या राजपुरुषाच्या अंगावर येऊन पडलीं.

" वत्सा ऊठ ! " या अमृतवाणीनें राजा भानावर येऊन त्यानें वर मान केली. आणि समोर पाहतो तों मातेच्या आविर्भावांत उभी असलेली नंदिनी त्याला दिसली. सिंह आधींच अदृश्य झाला होता. या अद्भुत प्रसंगानें आश्चर्यचकित झालेल्या राजपुरुषाला ती गाय म्हणाली, " हे सत्पुरुषा, मी मायेचें रूप धरून तुझ्या निष्ठेची परीक्षा पाहिली. नाहींतर वसिष्ठऋषींचें सामर्थ्य माझ्या पाठीमागें उभें असतांना प्रत्यक्ष मृत्युदेखील माझ्या शरिराला स्पर्श करूं शकणार नाहीं, मग सिंहाचा काय पाड ! वसिष्ठगुरूंच्या ठिकाणीं असलेली तुझी भक्ति आणि माझ्या ठायीं तूं दाखविलेली करुणा यामुळें हे पुत्रा, मी तुझ्यावर प्रसन्न झालें आहें. तूं इच्छित वर मजजवळ खुशाल माग. मी नुसती दूध देणारी साधीसुधी गाय नसून भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारी कामधेनु आहें, हें तुला आतां समजलें असेलच. "

स्वतःच्या पराक्रमांनीं वीरत्व संपादिलेल्या दिलीपानें नंदिनीला हात जोडले. आणि " रघुकुळाला साजेसा कीर्तिवान् मुलगा सुदक्षिणेच्या पोटीं मला होऊं दे " असा वर त्यानें मागितला.

" माझें अमृतमय दूध द्रोणभर पी म्हणजे तुझी इच्छा अवश्य पूर्ण होईल," असें सांगून नंदिनीनें त्याला तथास्तु म्हटलें.

राजाची मनकामना पूर्ण होण्याच्या मार्गाला लागली. राजा गोदेवीला घेऊन आश्रमांत परतला. प्रसन्न मनानें झालेली सगळी घटना गुरूंना आणि नंतर पत्नीला नृपतीनें निवेदिली. नंतर त्या प्रजावत्सल, निष्पाप राजानें वसिष्ठ मुनींची अनुज्ञा घेतली. आणि वासरानें पिऊन आणि होमाला

अर्पून उरलेलें आणि यज्ञानें निर्मळ झालेलें नंदिनीमाईचें दूध राजानें प्राशन केलें.

**रघूचा जन्म आणि शिक्षण**

पुत्रप्राप्तीसाठीं स्वीकारलेल्या व्रताची सांगता राजानें दुसऱ्या दिवशीं केल्यावर वसिष्ठानें उभयतांना आशीर्वाद दिले. नंतर अग्नीला, पतिपत्नी वसिष्ठांना आणि सवत्स धेनूला प्रदक्षिणा करून गोसेवेच्या मंगल उपचारांनीं पोसल्या गेलेल्या आत्मसामर्थ्यानिशीं राजा राजधानीला परतला. इंद्रपराक्रमी राजाचें प्रजेनें यथोचित अभिनंदन केलें. राजानें नंतर राज्य-सूत्रें आपल्या हातीं पुन्हा घेतलीं. पुढें राणी गर्भवती झाली. नऊ महिने पूर्ण लोटल्यावर पांच ग्रह उच्च स्थानीं असतांना सुदक्षिणेनें एका तेजस्वी मुलाला जन्म दिला. त्या वेळीं सर्व दिशा प्रसन्न झाल्या होत्या. सुख देणारा मंद शीतल वारा वहात होता. अग्नीनें आनंदानें हविर्द्रव्य स्वीकारलें. नवबालकाच्या तेजापुढें बिछान्याभोंवतालचे दिवेसुद्धां मंदावले.

स्तिमित नेत्रांनीं पुत्राचें सौंदर्य उपभोगीत असलेल्या राजाच्या आनंदाला भरती आली. पूर्णचंद्राचें दर्शन होतांच समुद्र जणुं कांहीं आपली मर्यादा ओलांडून उचंबळूं लागला. जातकर्मादि सगळे संस्कार आश्रमांतून आलेल्या वसिष्ठ पुरोहितांनीं यथासांग उरकले. राजपुत्राच्या जन्मोत्सवाचे मंगल निनाद पृथ्वीप्रमाणेंच देवलोकींसुद्धां उमटले. हा मुलगा शास्त्रांत निपुण आणि युद्धांत शत्रूला जिंकणारा होईल, हें शब्दार्थज्ञ दिलीपानें ताडलें. आणि ‘ गतिमान् ’ असा ज्या शब्दाचा धात्वर्थ आहे असें रघु हें नांव त्यानें आपल्या मुलाचें ठेवलें.

बालचंद्राप्रमाणें रघु दिवसेंदिवस शरिरानें वाढूं लागला. उमाशंकरांचा जसा कार्तिकेय किंवा शचींद्रांचा जसा जयंत तसा हा सुदक्षिणा-दिलीपांचा रघु शोभूं लागला. अस्फुट असा एकादा शब्द उच्चारणारा; दासीचें बोट धरून एकादें पाऊल चालणारा; शिकविलेल्या गोष्टींचा नम्रतेनें स्वीकार करणारा रघुबाळ हा मातापित्यांची उत्सुकता वाढवीत होता. अमात्यांच्या मुलांबरोबर रघूनें अक्षरओळख करून घेतली. आणि अशा रीतीनें वाङ्मय-रूपी विशाल सागराच्या प्रवेशद्वारांत त्यानें पहिलें पाऊल टाकलें.

अकराव्या वर्षी रघूचें उपनयन उरकल्यावर विद्वान् गुरु त्याला शिक्षण देऊं लागले. योग्य विद्यार्थ्याला दिलेलें शिक्षण कधीं वांया जात नसतें.[६] बुद्धिमान् रघु सगळ्या विद्यांत प्रवीण झाला. त्यानें अस्त्रविद्या पण त्यांच्या मंत्रांसह संपादिली. बाल्यांतून तारुण्यांत पाऊल टाकलेला रघु सर्व आवश्यक शास्त्रांची, त्यांच्या उपयोगितेची, क्षात्रवृत्तीला आवश्यक असलेल्या शस्त्रास्त्र-विद्यांची संपादणी मोठ्या चतुराईनें करीत होता. त्याचे बाहू लांब आणि मांसल होते. त्याची मान पुष्ट होती. या सर्व गोष्टींत दिलीपापेक्षांहि तो वरचढ असला तरी त्याच्या नम्र वागणुकीनें तो बापापुढें लहानगाच दिसे. राजानें रघूला युवराजपदीं स्थापून त्याचा गौरव वाढविला. दरम्यान त्याचें एका अनुरूप राजकन्येशीं लग्न पण उरकलें.

### रघूची इंद्राशीं लढाई

नव्याण्णव यज्ञ यशस्वी रीतीनें पार पाडलेल्या दिलीपानें शंभराव्या अश्व-मेधाकरितां घोडा मोकळा सोडला. आणि त्या अश्वाचें रक्षण युवराज रघूवर सोंपविलें. घोड्यामागें रक्षक सैनिकांना घेऊन रघू जात असतांना वाटेंत एके ठिकाणीं गुप्त वेष धारण केलेल्या इंद्रानें अश्वाचें रक्षण करणाऱ्यांच्या डोळ्यांदेखत तो यज्ञीय घोडा पळविला. रघु आणि त्याचें सैन्य या घटनेनें गोंधळून गेलें. पुढें काय करावें हें त्यांना समजेना. अंतर्ज्ञानानें वसिष्ठधेनूला ही सर्व घटना कळतांक्षणीं ती तेथें उपस्थित झाली. रघूनें पवित्रशा गोमूत्रानें आपले डोळे धुतल्यावर त्याला दिव्य अतींद्रिय दृष्टि प्राप्त झाली. पूर्व दिशेकडे आपल्या रथाला अश्वमेधाचा घोडा बांधून घेऊन चाललेला इंद्र रघूच्या दिव्य दृष्टीनें पाहिला. हिरवट रंगाच्या घोड्यांच्या रथांत बसून चाललेल्या त्या अश्वचोर, उद्धट इंद्राला उद्देशून धीरगंभीर वाणीनें रघु म्हणाला,

" देवेंद्रा, अश्वमेध यज्ञाच्या हविर्भागाचा पहिला मान तुझा असतो, असें जाणते लोक म्हणतात. आणि तूं या यज्ञासाठीं दीक्षा घेतलेल्या माझ्या वडिलांच्या यज्ञक्रियेमध्यें अश्वमेधाचा घोडा पळवून विघ्न उत्पन्न करतोस ? तूं त्रैलोक्यनाथ आणि दिव्यचक्षु आहेस. वास्तविक पाहतां यज्ञाच्या शत्रूंना

---

६. क्रिया हि वस्तूपहिता प्रसीदति ।

तूंच शिक्षा करायला हवी. असें असतां तूंच धर्माचरणी सज्जनांच्या यज्ञ-कर्मांत संकटें उभीं करतोस ! यावरून धर्म लोपला असें मानायचें कीं काय ? तरी हे देवेशा, अश्वमेधाच्या घोड्याला तूं सोडून दे. वेद-शास्त्रमार्गाचा उपदेश करणाऱ्या तुझ्यासारख्यांनीं तरी दुष्ट मार्गाचा अवलंब करतां कामा नये." ७ त्याच्या या स्पष्ट, परखड बोलण्यानंतर आपला रथ थांबवून इंद्रानें त्याला उत्तर दिलें,

"तूं म्हणतोस हें सगळें खरें. पण आमच्यासारख्या यशोधनांनीं स्वतःच्या यशाचें रक्षण दुसऱ्यापासून नको का करायला ? अरे, तुझा पिता तर हा शंभरावा अश्वमेध यज्ञ पार पाडून माझें लोकसंमत असलेलें सगळेंच यश हिरावून घेऊं पहात आहे ! पुरुषोत्तम हें नांव जसें एकट्या विष्णूचेंच किंवा त्र्यंबक हें जसें केवळ शंकराचेंच नांव आहे, तसा 'शतक्रतु' म्हणून थोरमोठे मुनी मला एकट्यालाच ओळखतात. शतक्रतु म्हणजे इंद्रच. दुसरा त्याचा अर्थच होऊं शकत नाहीं, समजलास ?९ म्हणून मी शंभराव्या यज्ञाकरितां सोडलेला हा दिलीपाचा घोडा हरण केला. मुकाट्यानें तूं अश्वरक्षणाचा प्रयत्न सोडून दे कसा. नाहींतर फुकट मरशील !"

या धमकावणीनें रघु घाबरला नाहीं. इंद्राच्या बोलण्याचा उपहास करून रघु उत्तरला, "घोडा न सोडण्याचा तुझा आग्रहच असेल तर मग शस्त्र हातीं घे. मी जिंकला जाईपावेतों हा यज्ञाश्व तुला नेतां येणार नाहीं."१०

असें म्हणून लगेच त्यानें आपल्या धनुष्याला बाण लावला आणि देवेंद्राच्या छातीचा त्यानें अचूक वेध घेतला. रागावलेल्या इंद्रानेंहि उलट दिव्य धनुष्यास जोडलेल्या आपल्या अमोघ बाणानें रघूच्या छातीवर प्रहार केला आणि त्यांतून रक्त वहावयाला लावलें ! छोट्या रघूनें इंद्राच्या बाहूवर दुसरा बाण मारून तेथें जणुं आपल्या नांवाची खूणच खोदली. त्याच घाईत तिसऱ्या शरानें इंद्राचा ध्वज रघूनें कापून खालीं पाडला. यामुळें रघूवर इंद्र खूपच चिडला. त्यानेंहि रघूवर अनेक बाण सोडले. अशा रीतीनें या दोघां

---

७. यशस्तु रक्ष्यं परतो यशोधनैः।

८. पथः श्रुतेर्दर्शयितार ईश्वरामलीसामाददते न पद्धतिम्।

९. द्वितीयगामी न हि शब्द एष नः।

१०. न खल्वनिर्जित्य रघुं कृती भवान्।

शस्त्रास्त्रपंडितांमध्यें चाललेलें भयंकर असें संकुल युद्ध उभय पक्षांचे सैनिक तटस्थपणें आश्चर्यचकित होऊन पहात होते. रघूनें इंद्रावर शस्त्रांची नुसती धार धरली होती. त्याचे तेजस्वी शस्त्रप्रहार इंद्र मोठ्या कष्टानें सोशीत होता. पण त्याला हरविणें कांहीं इंद्राला जमेना. तेवढ्यांत रघूनें घनगर्जना करणारें इंद्राचें धनुष्यच तोडलें. यामुळें संतापलेल्या इंद्रानें मोडकें धनुष्य टाकून दिलें आणि प्रज्वलित असें, पर्वतांचा चुरा करणारें आपलें आवडतें वज्र हातीं घेतलें आणि रघूच्या वक्षःस्थलावर त्याचा प्रहार करून त्याला भूमीवर लोळविलें. पण क्षणार्धांतच सैनिकांच्या हर्षगर्जनांसह रघु पुन्हां युद्धाकरतां सिद्ध झाला. शस्त्रव्यवहारांतल्या रघूच्या निर्भय निपुणतेनें इंद्र संतोष पावला. श्रेष्ठ गुणांचें संकीर्तन सर्वत्र त्याच्या वरचढपणामुळें होत असतें.[11]

" रघू, तूंच म्हणून माझ्या वज्राचा प्रखर प्रहार सोसलास ! या तुझ्या पराक्रमानें मी तुजवर संतुष्ट झालों आहें. अश्वमोचनाखेरीज दुसरें कांहींहि तूं मजजवळ माग, मी तें तुला निश्चयानें देईन. " असा इंद्रानें रघूपुढें प्रश्न टाकला. रघूनें आपला जोडलेला बाण सावरीत इंद्राला म्हटलें, " जर घोड्याला सोडणें तुला जमत नसेल तर माझ्या दीक्षित पित्याच्या पदरांत अश्वमेधाचें सगळें पुण्यफळ पडेल, त्यांत कोणतीहि कमतरता असणार नाहीं, असें कर. आणि ही सगळी वार्ता राजाच्या कानीं तुझ्या दूताकरवीं जाऊं दे."

" तथास्तु, " म्हणून इंद्रानें रघूच्या म्हणण्यास लगेच रुकार दिला.

यानंतर फारसा आनंदित न होतां रघु राजधानींत सैन्यासह परतला. इंद्र व रघु यांच्यांत झालेला युद्धप्रसंग अगोदरच देवेंद्रदूतांकरवीं राजाला समजला होता. त्यानें रघूचें त्याच्या पाठीवरून हात फिरवून अभिनंदन केलें. अश्वमेधाची समाप्ति पण नंतर त्यानें यथासांग पार पाडली.

राजकर्तव्यकुशल असा दिलीप राजा आतां म्हातारा झाला होता. म्हणून त्यानें रघूच्या शिरावर राज्याचें सर्व दायित्व शास्त्रोक्तरीत्या सोंपविलें. आणि तो स्वतः पत्नीसह ऋषीमुनींनीं वस्ती केलेल्या वनांत जाऊन राहिला. वृद्धापकाळीं असेंच रानांत जाऊन राहण्याचें इक्ष्वाकु वंशांतल्या राजपुरुषांचें कुलव्रतच होतें.[12]

---

११. पदं हि सर्वत्र गुणैर्विधीयते।

१२. गलित वयसां इक्ष्वाकूणां इदं हि कुलव्रतम्।

: २ :

# दानशूर दिग्विजयी रघुराज

* * * * * * * * * * * * *

## रघूचा दिग्विजय

रघुराजानें वडिलार्जित राज्य शत्रूंना धाकांत ठेवून आणि प्रजेला अधिक सुखी करून मोठ्या आत्मविश्वासानें चालविलें. आवश्यक त्या त्या ठिकाणीं कडक निःस्पृहपणा वा सौम्यपणा वापरून त्यानें शासनाचा सम-तोल राखला. एकदां झाडाला आंबे लटकूं लागले कीं मग मोहराची जशी आठवण बुजून जावी, तशी अनेक गुणांनीं वरचढ असलेल्या रघूनें पित्याच्या स्मृतिविषयींची प्रजेची उत्कंठा बरीच कमी केली. त्याचें सर्व क्षेत्रांतलें वागणें समाजनीतीला धरून असे. शत्रूविषयींचें त्याचें धोरणहि राजनीतीला पोषक असेंच तो ठेवी. " प्रजेचें रंजन करतो तो राजा, "[१३] अशी राजा या शब्दाची अर्थफोड करतात. रघूनें ही आपली राजपदवी सार्थ असल्याचें प्रत्यक्ष त्याप्रमाणें वागून सिद्ध केलें. त्याची दृष्टि अत्यंत सूक्ष्म, खोलवर पाहणारी आणि दूरदर्शी होती. त्याचें धनुष्य विजयी; त्याचें ऐश्वर्य विकसलेल्या कमळाप्रमाणें सुगंधित व शोभायमान; आणि त्याचा चेहरा चंद्राप्रमाणें प्रसन्न आणि प्रभावान् होता. त्याच्या डोळ्यांत तेज होतें तशी करुणा पण होती. त्याचें यशहि अत्यंत धवल असे. त्यानें आपल्या प्रभावानें शत्रूंचा पराक्रम फिका पाडला. त्याची विक्रमशालिता पूर आलेल्या नदीप्रमाणें उन्मत्त, विरोधकांचा निःपात करणारी आणि सहज होती. त्याच्या नियमित यज्ञशीलतेमुळें अग्नि त्याच्यावर नेहमीं प्रसन्न असे.

इंद्रतुल्य अशा रघूनें दिग्विजयाकरितां आपली सहा प्रकारची मोठी सेना सिद्ध करून प्रथम पूर्वेकडे आपला मोहरा वळविला. त्याचा सैन्यसंभार इतका प्रचंड होता कीं त्याच्या हालचालींतून उसळलेल्या धुरळ्यानें सगळ्य

---

१३. राजा प्रकृतिरंजनात्।

शस्त्रास्त्रपंडितांमध्यें चाललेलें भयंकर असें संकुल युद्ध उभय पक्षांचे सैनिक तटस्थपणें आश्चर्यचकित होऊन पहात होते. रघूनें इंद्रावर शस्त्रांची नुसती धार धरली होती. त्याचे तेजस्वी शस्त्रप्रहार इंद्र मोठ्या कष्टानें सोशीत होता. पण त्याला हरविणें कांहीं इंद्राला जमेना. तेवढ्यांत रघूनें घनगर्जना करणारें इंद्राचें धनुष्यच तोडलें. यामुळें संतापलेल्या इंद्रानें मोडकें धनुष्य टाकून दिलें आणि प्रज्वलित असें, पर्वतांचा चुरा करणारें आपलें आवडतें वज्र हातीं घेतलें आणि रघूच्या वक्षःस्थलावर त्याचा प्रहार करून त्याला भूमीवर लोळविलें. पण क्षणार्धांतच सैनिकांच्या हर्षगर्जनांसह रघु पुन्हां युद्धाकरतां सिद्ध झाला. शस्त्रव्यवहारांतल्या रघूच्या निर्भय निपुणतेनें इंद्र संतोष पावला. श्रेष्ठ गुणांचें संकीर्तन सर्वत्र त्याच्या वरचढपणामुळें होत असतें.[११]

" रघू , तूंच म्हणून माझ्या वज्राचा प्रखर प्रहार सोसलास ! या तुझ्या पराक्रमानें मी तुजवर संतुष्ट झालों आहें. अश्वमोचनाखेरीज दुसरें कांहींहि तूं मजजवळ माग, मी तें तुला निश्चयानें देईन." असा इंद्रानें रघूपुढें प्रश्न टाकला. रघूनें आपला जोडलेला बाण सावरीत इंद्राला म्हटलें, " जर घोड्याला सोडणें तुला जमत नसेल तर माझ्या दीक्षित पित्याच्या पदरांत अश्वमेधाचें सगळें पुण्यफळ पडेल, त्यांत कोणतीहि कमतरता असणार नाहीं, असें कर. आणि ही सगळी वार्ता राजाच्या कानीं तुझ्या दूताकरवीं जाऊं दे."

" तथास्तु, " म्हणून इंद्रानें रघूच्या म्हणण्यास लगेच रुकार दिला.

यानंतर फारसा आनंदित न होतां रघु राजधानींत सैन्यासह परतला. इंद्र व रघु यांच्यांत झालेला युद्धप्रसंग अगोदरच देवेंद्रदूतांकरवीं राजाला समजला होता. त्यानें रघूचें त्याच्या पाठीवरून हात फिरवून अभिनंदन केलें. अश्वमेधाची समाप्ति पण नंतर त्यानें यथासांग पार पाडली.

राजकर्तव्यकुशल असा दिलीप राजा आतां म्हातारा झाला होता. म्हणून त्यानें रघूच्या शिरावर राज्याचें सर्व दायित्व शास्त्रोक्तरीत्या सोंपविलें. आणि तो स्वतः पत्नीसह ऋषीमुनींनीं वस्ती केलेल्या वनांत जाऊन राहिला. वृद्धापकाळीं असेंच रानांत जाऊन राहण्याचें इक्ष्वाकु वंशांतल्या राजपुरुषांचें कुलव्रतच होतें.[१२]

---

११. पदं हि सर्वत्र गुणैर्विधीयते।

१२. गलित वयसां इक्ष्वाकूणां इदं हि कुलव्रतम्।

: २ :

# दानशूर दिग्विजयी रघुराज

* * * * * * * * * * * * *

## रघूचा दिग्विजय

रघुराजानें वडिलार्जित राज्य शत्रूंना धाकांत ठेवून आणि प्रजेला अधिक सुखी करून मोठ्या आत्मविश्वासानें चालविलें. आवश्यक त्या त्या ठिकाणीं कडक निःस्पृहपणा वा सौम्यपणा वापरून त्यानें शासनाचा सम-तोल राखला. एकदां झाडाला आंबे लटकूं लागले कीं मग मोहराची जशी आठवण बुजून जावी, तशी अनेक गुणांनीं वरचढ असलेल्या रघूनें पित्याच्या स्मृतिविषयींची प्रजेची उत्कंठा बरीच कमी केली. त्याचें सर्व क्षेत्रांतलें वागणें समाजनीतीला धरून असे. शत्रूविषयींचें त्याचें धोरणहि राजनीतीला पोषक असेंच तो ठेवी. "प्रजेचें रंजन करतो तो राजा,"[१३] अशी राजा या शब्दाची अर्थफोड करतात. रघूनें ही आपली राजपदवी सार्थ असल्याचें प्रत्यक्ष त्याप्रमाणें वागून सिद्ध केलें. त्याची दृष्टि अत्यंत सूक्ष्म, खोलवर पाहणारी आणि दूरदर्शी होती. त्याचें धनुष्य विजयी; त्याचें ऐश्वर्य विकसलेल्या कमळाप्रमाणें सुगंधित व शोभायमान; आणि त्याचा चेहरा चंद्राप्रमाणें प्रसन्न आणि प्रभावान् होता. त्याच्या डोळ्यांत तेज होतें तशी करुणा पण होती. त्याचें यशहि अत्यंत धवल असे. त्यानें आपल्या प्रभावानें शत्रूंचा पराक्रम फिका पाडला. त्याची विक्रमशालिता पूर आलेल्या नदीप्रमाणें उन्मत्त, विरोधकांचा निःपात करणारी आणि सहज होती. त्याच्या नियमित यज्ञशीलतेमुळें अग्नि त्याच्यावर नेहमीं प्रसन्न असे.

इंद्रतुल्य अशा रघूनें दिग्विजयाकरितां आपली सहा प्रकारची मोठी सेना सिद्ध करून प्रथम पूर्वेकडे आपला मोहरा वळविला. त्याचा सैन्यसंभार इतका प्रचंड होता कीं त्याच्या हालचालींतून उसळलेल्या धुरळ्यानें सगळय

---

१३. राजा प्रकृतिरंजनात्।

भूभागाला आकाशाचें रूप आणलें. त्याच्या सैन्याची गति ही विशाल गंगेच्या ओघाप्रमाणें भासत असे. शत्रूंना जिंकीत, त्यांना शरण आणीत रघूच्या सेनासागरानें पूर्व महासागराचा कांठ गांठला. सह्यदेशीय राजांना शरण आणून गंगेच्या मुखाशीं त्यानें जयस्तंभ उभारला. रघूच्या विजयाचा एक विशेष होता. तो असा कीं, वंग-राजांचा त्यानें पराभव केला खरा पण लगेच त्यांना अभय देऊन त्यांचीं राज्यें त्यांना परतहि केलीं.

त्यानें पुढें हत्तींचा पूल उभारून कपिशा नदी ओलांडली आणि उत्कल देशाच्या राजानें दाखविलेल्या रस्त्यानें जाऊन त्यानें कलिंग देशाकडे आपलें तोंड फिरविलें. कलिंग राजानें अस्त्रें सरसावून रघूला रोखलें. त्याच्या नाराच नांवाच्या बाणांच्या वर्षावाला दाद न देतां महेंद्रनाथ कलिंगावरहि त्यानें शेवटीं जय संपादिला. कलिंगराजाचें यश तेवढें धर्मविजयी रघूनें हिरावून घेतलें, पण त्याचें राज्य त्याला परत देऊन टाकलें.

तेथून सुपारीच्या झाडांनीं भरलेल्या पूर्वसमुद्राच्या काठाकांठानें अगस्त्य ऋषींची वस्ती असलेल्या दक्षिण दिशेकडे रघुराजा आपलें सेनादल घेऊन निघाला. वाटेंतली कावेरी नदी ओलांडून मिऱ्यांच्या मळ्यांनीं व्यापलेल्या वनप्रदेशापलीकडे रघु-बल गेलें. त्यानें मलयपर्वताच्या पायथ्याशीं छावणी ठोकून थोडा वेळ विश्रांति घेतली. पुढें दक्षिणदेशीय पांड्य राजावर चालून जाऊन त्याला त्यानें माघार घ्यायला लाविली. पांड्य राजांनीं ताम्रपर्णी नदीच्या मुखांशीं सांपडणाऱ्या निवडक अशा मौक्तिकांच्या मालांनीं रघुसम्राटाचा आदरसत्कार केला. दक्षिण दिशेकडचे प्रदेश चंदनाच्या वृक्षांनीं समृद्ध होते. त्या प्रदेशांत थोडे दिवस घालविल्यावर त्याचा मोहरा पश्चिमेकडे वळला.

सह्यगिरीच्या लगतचा सागर मागें हटवून परशुरामानें तेथें एक भूमीचा पट्टा निर्माण केला होता त्या भूमीवरून रघूचें अफाट सैन्य जातांना जणुं पुन्हा पश्चिम सागर सह्यपर्वताला येऊन भिडला असल्याचा आभास झाला. केवड्यांच्या बेटांनीं समृद्ध असलेला केरळ प्रदेश जिंकून आणि पश्चिम राजांकडून करभार घेत घेत रघु पुढें पुढें सरकत होता. त्रिकूट पर्वतापर्यंत रघुराजा विजयी होऊन पोहोचल्यानें तो पर्वतच रघूचा विजयस्तंभ

बनला ! पायरस्त्यानें चालून जाऊन पारसिकांचा त्यानें पराभव केला. यवनांबरोबर त्यानें दोन हात करून त्यांना शरण यावयास लाविलें.

येथून उत्तर दिशेला निघालेल्या रघु-सैन्यानें सिंधुनदीच्या कांठीं बराच वेळ विश्रांति घेतली. हूणांना जिंकल्यावर रघूनें कंबोज राजांचा समाचार घेतला आणि उत्तम उपजाऊ घोड्यांची खंडणी त्यांच्याकडून वसूल केली. हिमाद्रीच्या पठारावर रघुराजा पोहोंचतो तोंच त्याला पर्वतवासी गणसैनिकांनीं अडविलें. पण रघूच्या तीक्ष्ण बाणांपुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं. तेथून खालीं उतरून त्यानें लोहित नदी ओलांडली. नंतर प्राग्जोतिषेश्वराचा पाडाव केल्यावर कामरूप देशाच्या राजाकडून हत्तींची दक्षिणा आणि रत्नपुष्पोपहारांची पूजा रघूनें स्वीकारली.

अशा प्रकारें रघूनें चारहि दिशांना विजय मिळविले आणि राजधानींत परतल्यावर विश्वजित् नांवाचा यज्ञ करण्याची त्यानें योजना आंखून ती यथासांग पार पाडली. या यज्ञांत यजमानानें सर्वस्वाचें दान करावयाचें असतें. सज्जनांचें संपत्तिसंपादन हें दानासाठींच असतें.[१४] रघुराजानें सर्व संपत्तीचें दान करून आपलें सत्त्व राखलें. यज्ञाला उपस्थित असलेले सगळे राजे आणि इतर पाहुणे रघुराजाला अभिवादन करून आणि राजानें केलेला मानसन्मान आदरपूर्वक स्वीकारून आपापल्या देशाकडे जाण्यासाठीं परतले.

**रघूची सत्त्वपरीक्षा**

रघूनें विश्वजित् यज्ञांत सर्वस्वाचें दान केल्यानें त्याचा सगळा कोश रिकामा झाला. इतक्यांत मुनि वरतंतूचा शिष्य कौत्स हा राजाजवळ गुरुदक्षिणा मागण्यासाठीं आला. त्यानें गुरुगृहीं शिक्षण घेतलें होतें. पण गुरूची दक्षिणा देण्याचें त्याचेंजवळ कांहींच साधन नसल्यानें तो उदारधी रघूकडे गेला. असाधारण स्वभावाच्या आतिथ्यशील रघुराजानें मातीच्या भांड्यांत पूजासाहित्य भरलें आणि वेदशास्त्रपारंगत अशा त्या अतिथीला तो सामोरा गेला. त्याची यथाविधि पूजा केल्यावर हात जोडून तो त्या ब्राह्मण शिष्यासमोर उभा ठाकला. त्या दोघांमध्यें मग प्रश्नोत्तरें झालीं.

" कुशाग्रबुद्धीच्या कौत्सा, ज्याच्याजवळ तूं संपूर्ण विद्याध्ययन केलेंस तो तुझा मंत्रद्रष्ट्यामध्यें अग्रणी असलेला गुरु कुशल आहे ना ? "

---

**१४. आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव।**

" होय, कुशल आहेत माझे गुरु " कौत्स उत्तरला.

" तुझ्या गुरूनें कायावाचामनानें संपादन केलेलें तीन प्रकारचें तप नीट सुरक्षित आहे ना ? त्यांत कोणी विघ्नं आणलीं नाहींत ना ? "

" नाहीं, तसें कांहीं झालें नाहीं. "

" मोठ्या परिश्रमानें लाविलेल्या, जोपासलेल्या झाडाझुडपांना रानपशू, रोगराई, झंझावात वगैरेपासून त्रास नाहीं ना पोहोंचला ? "

" नाहीं. "

" माणसाळून गेलेलीं आश्रमांतील हरिणहरिणी आणि तिचीं पाडसें पण सुरक्षित असतीलच ? "

" होय. "

" नित्यनियमानें देवपितृकार्याकरितां ज्यांच्या पवित्र जलांचा उपयोग बारमास आश्रमवासीयांना होतो, तीं तीर्थें कोणी दुष्टांनीं दूषित तर केलीं नाहींत ? "

" नाहींत. "

" तुझें गृहस्थाश्रम स्वीकारण्याचें आतां वय झालेलें दिसतें. पण त्यापूर्वीं तूं ब्रह्मचर्यकालांत संपादावयाची सर्व विद्या संपादल्यावर मगच गुरूंच्या अनुज्ञेनें आश्रम सोडून घरीं निघाला आहेस ना ? "

" हो. विद्यासंपादन सगळें पुरें करून मगच मी गुरूंच्या अनुमतीनें आश्रम सोडला. "

" तूं जो मजकडे आलास तो काय काम घेऊन आलास, हें समजून घेण्याची माझी इच्छा आहे. मजकडे, तूं तुझ्या स्वतःच्या कामासाठीं आलास कीं गुरूंनीं सांगितलें म्हणून आलेला आहेस ? "

" राजा, तुझ्या राज्यांत सर्व कुशल आहे. सूर्य वर आकाशांत तळपत असतांना तेथें अंधाराचा मागमूस कसा राहील ?[१५] पूज्य सज्जनांच्या ठायीं भक्तिभाव ठेवणें, या बाबतींत तूं तुझ्या पूर्वजांना मागें टाकलेंस. अशा तुझ्याकडे सध्यांच्या तुझ्या निष्कांचन परिस्थितींत मला याचक म्हणून यावें लागलें, याबद्दल मला खेद वाटतो. विश्वजित् यज्ञांत सर्व संपत्तीचें तूं दान केलें असल्यानें तुझें हें दारिद्र्य कृपण आणि स्वार्थी राजाच्या श्रीमंतीपेक्षां जास्त शोभून

१५. सूर्ये तपत्यावरणाय दृष्टेः कल्पेत लोकस्य कथं तमिस्रा।

दिसतें. अनन्यगातिक असा जरी चातक झाला, तरी तो कांहीं शरद् ऋतूंतल्या रिकाम्या ढगांतल्या पाण्याची याचना करीत नाहीं. तसा रिकामा कोश झालेल्या तुझ्याकडून गुरुदक्षिणेकरितां धन मागणें मला शोभणार नाहीं. ''

याप्रमाणें कौत्सानें आपली गुरुदक्षिणा राजाकडे मागण्यासाठीं दर्शविलेली अनिच्छा रघुराजाला रुचली नाहीं. तो कौत्साला म्हणाला,

" गुरुदक्षिणा म्हणून तूं आपल्या गुरूला काय देऊं इच्छितोस ? ''

राजानेंच पृच्छा केलेली पाहून तो ब्राह्मण त्याला सांगूं लागला, " जेव्हां मी गुरूंना काय दक्षिणा द्यावी, यासंबंधीं विचारलें तेव्हां त्यांनीं 'तुझी अनन्य भक्ति हीच मी दक्षिणेजागीं मानतों ' असें सांगितलें त्यांनीं मला ! पण माझें या उत्तरानें समाधान झालें नाहीं. मी पुन्हा पुन्हा गुरूंना म्हटलें कीं, 'मला तुम्ही मी दक्षिणा काय द्यावी, तें सांगाच. ' माझा हा आग्रह पाहून गुरु थोडे रागावले. आणि त्यांनीं मागचा पुढचा कांहीं एक विचार न करतां मज गरिबापाशीं चौदा कोटींचें धन गुरुदक्षिणा म्हणून मागितलें ! ही विद्या-दक्षिणा कांहीं थोडीथोडकी नाहीं ! आणि राजा, तुझा कोश तर कोरडा ! म्हणून तुजपाशीं विद्यादक्षिणा मागण्याचें मी सोडून देत आहें.''

कौत्साचें हें बोलणें संपतें तोंच रघु त्याला म्हणाला, " गुरुदक्षिणेप्रीत्यर्थ धन मागणारा विद्वान् ब्राह्मण हा रघुराजापाशीं तें मिळालें नाहीं म्हणून दुसऱ्या दात्याच्या दारीं गेला, असा अपवाद होतां कामा नये ! म्हणून तूं माझ्या पवित्र अग्निशाळेंत दोनतीन दिवस रहा. तोंपावेतों मी तुझ्या अपेक्षित गुरुदक्षिणेची पूर्ति करण्याचा यत्न करून पहातों. '' रघूच्या दृष्टीसमोर एकदम कुबेर आणि त्याची अमाप संपदा उभी राहिली. कारण चौदा कोटी इतकें विपुल धन त्याच्याजवळ होतें. म्हणून कुबेराला जिंकून त्याच्या-कडून पाहिजे असलेलें द्रव्य आणण्याचें त्यानें ठरविलें.

वसिष्ठांकडून शिकलेल्या मंत्रांच्या साहाय्यानें रघुराजाला समुद्र, पृथ्वी, आकाश या तीनहि ठिकाणीं वायूच्या साहाय्यानें रथ घेऊन जातां येणें शक्य होतें. सायंकाळीं शस्त्रांनीं सज्ज केलेल्या रथांत शुद्धांतःकरणाचा रघु जाऊन झोंपला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुबेराच्या प्रदेशीं निघण्याच्या सिद्धतेंत रघुराजा असतांना त्याला दूतांकरवीं वार्ता कळली कीं, आपल्या कोशागारांत आकाशांतून सोन्याच्या नाण्यांची वृष्टि झाली. लगेच

रघुराजानें कोशांत जमलेली सगळीच्या सगळी संपत्ति कौत्साला देऊन टाकली. कौत्सानें मात्र त्याला पाहिजे तेवढी म्हणजे चौदा कोटींचीच दक्षिणा स्वीकारिली. बाकीची रघूला परत केली. उदार दाता आणि निःस्पृह याचक या उभयांची अयोध्यावासीयांनीं प्रशंसा केली.

### आशीर्वाद आणि सुखप्राप्ति

" आपल्या कर्तव्यपालनांत तत्पर असलेल्या राजा, तुझा प्रभाव वर्णन करण्यास फार कठीण आहे. तुझ्या इच्छेच्या पूर्तीसाठीं तूं स्वर्गांतूनहि संपदा प्राप्त करून घेतलीस मग पृथ्वी तुझ्या कामना पुरविते, यांत आश्चर्य तें कसलें ? सर्व प्रकारचें ऐश्वर्य तुझ्या पायाशीं लोळण घेत आहे ! तेव्हां तुझ्यासारख्याला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद देणेंच मला योग्य वाटतें. म्हणून तुझ्या स्वतःच्या व पित्याच्या गुणांनी युक्त असा तुला मुलगा होवो, असा मी तुला आशीर्वाद देतों. "

असें म्हणून कौत्सानें शेकडों उंटांवर व घोड्यांवर गुरुदक्षिणेचें चौदा कोटींचें धन घातलें आणि तो गुरूच्या आश्रमाकडे निघून गेला. राजाला ब्राह्मणाच्या आशीर्वादाप्रमाणें मुलगा झाला. एके दिवशीं ब्राह्म मुहूर्तावर राणीनें पुत्राला जन्म दिला. ' अज ' असें त्याचें नांव ठेवण्यांत आलें. अजाला शरीर, शौर्य, भव्यता हीं सगळीं पित्याप्रमाणेंच लाभलीं. गुरुकडून यथाशास्त्र सर्व विद्या मिळाली. नंतर त्याचा यौवराज्याभिषेक पण झाला.

### विदर्भाच्या वाटेवर अस्त्रप्राप्ति

( क्रथकैशिक ) विदर्भ देशच्या भोजराजानें आपली भगिनी इंदुमति हिचें स्वयंवर आरंभिलें होतें. त्यासाठीं त्यानें रघूकडे आपला एक विश्वासू दूत धाडला. त्याची इच्छा अशी होती कीं, रघुराजानें अजाला स्वयंवरासाठीं पाठवावें. रघुराजानें त्याप्रमाणें अजाची पाठवणी सैन्यासह विदर्भ देशच्या राजधानीकडे केली. वाटेंत अजाला कोणताहि त्रास होऊं नये, त्याच्या राजयोग्यतेला साजेशी त्याची सगळी व्यवस्था रहावी, म्हणून ठिकठिकाणीं तात्पुरतीं प्रवासी घरें, विहारस्थानें, विश्रांतिस्थळें विदर्भराजानें उभारलीं होतीं. मजल दरमजल करतां करतां नर्मदातीरीं थोडा वेळ अज युवराज

विश्रांति घेत असतांना नदींतून एक रानटी हत्ती वर आला. त्या उन्मत्त हत्तीनें अजाच्या सैन्याला अडविलें. वन्य हत्तीचा वध करणें, हें युद्धांतच क्षम्य असतें, इतर वेळीं त्याला ठार मारण्याला शास्त्राज्ञा नाहीं, म्हणून राजपुत्रानें त्या माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळावर बाणाचा लहानसा प्रहार करून त्याला परतविलें. इतक्यांत आपलें गजरूप टाकून त्याच्या जागीं देवशरीर घेतलेली एक प्रकाशमान पुरुषाकृति सैन्यासमोर उभी राहिली. त्यानें अजाच्या अंगावर स्वर्गीय फुलें उधळलीं. नंतर ती पुरुषाकृति रघुनंदनाला म्हणाली, " हे राजपुत्रा माझ्या उद्दाम वागण्यानें चिडून जाऊन मतंग ऋषीनें मला शाप दिला कीं, तूं मस्तवाल हत्ती होशील म्हणून ! प्रियदर्शन गंधर्वाचा मी प्रियंवद नांवाचा मुलगा. मी त्या मुनींजवळ अपराधाची क्षमा मागितली. मुळांत शांत स्वभावाच्या त्या तपोनिधीनें मला " इक्ष्वाकु वंशांत जन्मलेल्या अज नांवाच्या पुत्राकरवीं तुझ्या मस्तकीं जेव्हां बाण बसेल तेव्हां तुला तुझें पूर्वींचें रूप लाभेल " असा शापाचा उतारा सांगितला. साहजिकच आहे; अग्नि-सूर्याच्या उष्णतेमुळें पाणी थोडें तापलें तरी तें स्वभावानुरूप थंड होणारच ![१६] तुझ्या कृपेनें मला पूर्वजन्मींचें गंधर्वपण मिळालें. या तुझ्या उपकाराबद्दल कृतज्ञता दाखविणें, हें माझें कर्तव्य आहे. मित्रा, मजजवळ शत्रूला संमोहित वा मूर्छित करणारें एक 'संमोहन' नांवाचें गांधर्वास्त्र आहे, तें मी तुला देतों. तूं त्याचा स्वीकार कर. त्या अस्त्राच्या साहाय्यानें तुला शत्रूची हिंसा करायला नको. त्यानें शत्रु नुसते मूर्छित पडतील आणि तूं सहज विजयी होशील. तें अस्त्र स्वीकारतांना रघुनंदनानें कांहीं आढेवेढे घेतले नाहींत. नर्मदेच्या पाण्यानें आचमन करून तो स्वतः पवित्र झाला आणि नंतर मग त्यानें प्रियंवदानें दिलेल्या संमोहनास्त्राचा स्वीकार केला.

### अजाचें थाटाचें स्वागत

टायीटायींचा पाहुणचार सुखानें घेत युवराज अजानें आपला प्रवास संपविला आणि तो विदर्भांत पोहोंचला. राजधानीच्या सीमेवर येऊन थांबलेल्या राजपुत्राचें यथोचित स्वागत करण्यासाठीं विदर्भराजा त्याला सामोरा

---

१६. उष्णत्वं अग्न्यातपसंप्रयोगात् शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य ।

गेला. आणि मोठ्या नम्रभावानें त्याचें वास्तव्य एका नव्यानेंच बांधलेल्या राजवाड्यांत करविलें. तो राजपुरुष त्या जागीं सुखानें झोपीं गेला.

दुसऱ्या दिवशीं पहांटे त्याला त्याच्या गाढ झोपेंतून जागें करण्याकरितां त्याच्या वयाचेच बंदिपुत्र भाट झाले. त्यांनीं राजपुत्राला आळविण्याला आरंभ केला. " हे विद्वद्वर्या, राजपुरुषा, रात्र संपून गेली. जागा हो. आतां तूं अंथरूण सोडणें बरें. ब्रह्मदेवानें जगाचा भार दोन ठिकाणीं वांटला आहे. पैकीं एकाची जबाबदारी तुझ्या जागरूक पित्यानें स्वीकारली असून दुसरीचें दायित्व तुझ्या शिरावर आहे. आकाशांतला चंद्र निस्तेज होऊं लागला असून प्रभातींचा सुगंधित असा मंद आणि थंड वारा वाहूं लागला आहे. अरुणोदय होऊन त्यानें सूर्याच्या आगमनाची सूचना दिली आहे. तुझ्या स्वागतासाठीं आणलेल्या पुष्पहारांतलीं फुलें सुकूं लागलीं आहेत. दिव्यांचे प्रकाशकिरण मंदावले आहेत. पिंजऱ्यांतले पोपट जागे होऊन आपल्या गोड वाणीनें तुला हांक मारीत आहेत. "

**स्वयंवरमंडपांत**

वंदीजनांचा हा स्तुतिपाठ ऐकत असतांना अजाची साखरझोंप संपली. तो मंचकावरून खालीं उतरला. प्रातःकाळचे सगळे विधि त्यानें यथासांग उरकले. स्वयंवराच्या प्रसंगासाठीं केलेल्या शोभादायक वेषानें त्यानें स्वतःला शृंगारलें आणि स्वयंवरमंडपांत ज्या ठिकाणीं राजसमूह होता त्यांत तो जाऊन बसला.

रघुपुत्राला त्या प्रशस्त मंडपांत वेगवेगळे मनोहर वेष केलेले, विमानांतून प्रवास करणारे, उंच आसनावर थाटांत बसलेले आकर्षक, उंची पोशाखांनीं नटले-सजलेले राजेलोक दिसले. त्या राजपुत्रांच्या दृष्टीला जेव्हां तो मदनसदृश सुंदर तेजस्वी रघुनंदन पडला, तेव्हां विदर्भराजकन्या इंदुमतीच्या प्राप्तीविषयींची त्यांची आशा पार मावळली ! विदर्भराज भोजानें दाखविलेल्या शोभायमान आसनावर रघुपुत्र बसत असतांना त्यांना तो अज सिंहशावकाप्रमाणें पराक्रमी आणि निर्भय वाटला. त्या रत्नजडित मृगासनावर आरूढ झालेली अजाची मूर्ति अत्यंत आकर्षक दिसत होती. अनेक मेघांच्या पंक्तींत विद्युत्प्रकाश जसा खुलून दिसतो

त्याप्रमाणें त्या सहस्रों राजपुरुषांमध्यें वैभव आणि पराक्रम या दोहोंच्या बाबतींत अज हा सर्वांत अधिक तेजःपुंज दिसत होता. सर्वसामान्य प्रेक्षकांचे डोळे इतर राजगणापेक्षां अजाच्या देखणेपणावर अधिक खिळले होते.

**राजपुत्रांचे चाळे–त्यांची ओळख**

पुढें स्तुतिपाठकांचा तांडा गाण्याच्या गोड सुरांत स्तुतिसुमनें उधळीत चालला आहे. मागून सभोंवार सुगंधाची पेरणी करीत वैजयंती पताका पुढें पुढें सरकत आहे; त्यामागून मंगल वाद्यांचे ध्वनि काढीत वाद्यवृंद मंद पावलें टाकीत येत आहे. अशा थाटांत त्यामागून परिवारानें वेढलेली आणि नानालंकारांनीं सजविलेली राजभगिनी इंदुमति पालखींत बसून तेथें सावकाश प्रवेशली. तत्क्षणीं सर्वांच्या नजरा त्यांच्या अंतःकरणांतील भावनांसह राजकन्येच्या सौंदर्यावर खिळून गेल्या.

प्रत्येक राजपुत्राच्या मनांत इंदुमतीनें आपणाला वर म्हणून निवडावें, असें साहजिकच होतें. म्हणून जो तो आपल्या परीनें डोळे, हात, पाय, अलंकार यांच्या साहाय्यानें कांहीं हालचाली करीत होता. हेतु हा कीं इंदुमतीचें लक्ष स्वतःकडे वेधलें जावें. कोणी आपल्या हातीं असलेलें कमल फिरवून दाखविलें. कोणी एकानें बाहूवरील दागिन्यांचीं तोंडें फिरवून उगीचच हालचाल केली. तर कोणी आपल्या पायाच्या नखांनीं रत्नखचित भूमीवर कांहींतरी खरवडूं लागला. एकानें डाव्या बाजूस बसलेल्या मित्राकडे वळून त्याच्याशीं बोलत असल्याचा आविर्भाव आणला. एकानें केवड्याचें पान आपल्या नखांनीं उगीचच कुरतडलें. एका राजपुत्रानें आपल्या हातांतले फांसे लीलेनें वर फेंकले. एकानें आपल्या माथ्यावरच्या किरिटांतलीं रत्नें उगीचच चाचपून पाहिलीं. अशा प्रकारें कळत न कळत नृपपुत्रांनीं राजकन्या स्वतःसमोर आली असतांना वेगवेगळे चाळे करून दाखविले !

त्याच्या त्याच्या समोर जाऊन प्रत्येक राजपुत्राच्या कुलाची माहिती इंदुमतीला देणाऱ्या सुनंदा नांवाच्या चतुर द्वारपालिकेनें तिला प्रथम मगध-राजाजवळ नेलें. आणि " शरणागतांना आसरा देणारा; खोल स्वभावाचा; प्रजेच्या रंजनांत प्रवीण असल्याचा ज्याचा नांवलौकिक आहे असा; शत्रूंना पीडा

देणारा असल्यानें ‘ परंतप ’ हें नांव ज्याला शोभून दिसतें; असा हा मगध देशचा राजा होय ” अशा शब्दांत त्याची ओळख सांगितली. पुढें ती आणखी म्हणाली, “ देवी, हा राजा परंतप सतत कोणता ना कोणता तरी यज्ञ करीत असतो आणि त्यांतून अग्निद्वारा इंद्राला आहुति देत असतो. त्यामुळें इंद्राला स्वर्ग सोडून एकसारखें भूलोकींच रहावें लागतें. याचा परिणाम असा झाला आहे कीं, इंद्रपत्नी शचीला आपला सगळा काल वेणीफणी न करतां किंवा मंदारवृक्षाच्या दिव्य कुसुमांनीं केशसंभार न शृंगारतांच पतिविरहाचे दिवस कंठावे लागतात. अशा पाटलिपुत्राच्या राजाला वरण्याची तुझी इच्छा असेल तर तूं त्याची पत्नी हो. आणि त्या देशच्या सुंदर स्त्रियांच्या दृष्टीची भूक भागव. ” या सुनंदेच्या शिफारशी· नंतर ओझरत्या दृष्टीनें इंदुमतीनें परंतपाकडे पाहिलें. आणि लगेच भावशून्य होऊन ती दुसरीकडे पाहूं लागली. मानससरोवरांतल्या एका कमळावर बसलेली राजहंसी वाऱ्यानें तें कमल जास्त आंदोळूं लागलें म्हणजे जशी दुसऱ्या कमळाचा आसरा घेते, त्याप्रमाणें परंतपाकडून सुनंदेनें तिला अंगदेशच्या राजाकडे नेलें. त्याचा परिचय सांगतांना ती म्हणाली, “ या राजाच्या तारुण्यश्रीनें देवांगनादेखील मोहित होतात. हा जरी पृथ्वीवरील अंग देशांत राज्य करीत असला तरी त्याची स्वर्गलोकीय राजाबरोबर मैत्री असल्यामुळें स्वर्गलोकींचे सगळे सुखोपचार तो येथेंच उपभोगीत असतो. आपल्या शत्रूंना सतत हार खायला लावून यानें त्यांच्या स्त्रियांच्या हृदयावर दुःखाश्रूंच्या माळा एकसारख्या रुळत ठेवल्या आहेत ! हा जसा वैभवशाली श्रीमान् आहे तसाच विद्यावान् पण आहे. क्वचितच एके ठिकाणीं नांदणाऱ्या श्री आणि सरस्वति या सवती या राजाच्या ठिकाणीं सुखानें राहिल्या आहेत. सौंदर्य आणि सत्यवादिता या गुणांनीं अनुरूप असलेली तूं, या अंगराजाची तृतीय पत्नी होऊन राहूं शकतेस. ” ही सुनंदेची शिफारस राजकन्येला रुचली नाहीं. तिनें पुढें दुसऱ्या राजाकडे जाण्यासाठीं तिला खुणाविलें. प्रत्येकाची आवडनिवड वेगवेगळी असते; [१७] म्हणूनच केवळ या गुणी अन् सुंदर अशा अंगराजाचा इंदुमतीनें अव्हेर केला असावा !

---

१७. भिन्नरुचिर्हि लोकः ।

द्वारवतीनें नंतर इंदुमती देवीला दुसऱ्याहि पराक्रमी राजांकडे नेऊन त्यांची माहिती तिला ऐकविली. "लांब हाताचा, रुंद छाती असलेला आणि हातीं तेजस्वी चक्र असलेला हा अवंतीचा राजा पहा. हा फार पराक्रमी असून जलक्रीडेचा याला फार शोक आहे." तिनें अवंतीच्या राजाची पण अशी ओळख करून दिली. त्यावरहि उपवर इंदुमतीचें मन बसलें नाहीं.

तिला मग अनूप देशाच्या राजा प्रतीपापुढें सुनंदेनें नेली. "कार्तवीर्य नांवाचा राजा संग्रामामध्यें सहस्र हात असल्यासारखा उग्र आणि चपळ होता. त्यानें आठ द्वीपांवर आपल्या पराक्रमाच्या खुणा रोवल्या होत्या. तेथें विजयस्तंभ उभारून त्यानें आपलें सार्वभौमपद निश्चित केलें होतें. कार्तवीर्य या नांवानें प्रसिद्ध असलेल्या या योगीराजावर ईश्वराची पूर्ण कृपा असून त्यानें सर्वभूतमात्राचें रंजन करून अनन्यसाधारण अशी स्वतःची राजपदवी सार्थ करून दाखविली होती. या कार्तवीर्याचा दरारा लोकांवर इतका विलक्षण होता कीं, त्यांपैकीं कोणीहि मनांतल्या मनांतसुद्धां त्याच्या अपराधाची नुसती आठवण करण्याला सुद्धां धजला नाहीं! याच्या कारावासांत दशमुख रावण कितीतरी दिवस होता; शेवटीं क्षमा मागून त्याला आपली सुटका करून घ्यावी लागली. अशा कार्तवीर्याच्या वंशांतल्या प्रतीपाला तूं वरीत असल्यास पहा." पण प्रतीपानेंहि इंदुमतीच्या अंतरीं आश्रय केला नाहीं.

सुनंदेनें मग इंदुमतीला सुषेण नांवाच्या नीपवंशीय शूरसेन देशाच्या राजासमोर नेलें. "याच्या राज्यांत सिद्धांचे असे कांहीं आश्रम आहेत कीं, तेथें शांतता आणि प्रसन्नता हीं सदैव नांदतात. आणि त्या आश्रमांच्या आश्रयाला आलेले सिंह, वाघ आदि हिंस्र प्राणी आपलें क्रूरपण टाकून देतात व अहिंसाप्रिय बनून इतर ग्रामीण पशूंसह सुखासमाधानानें व्यवहारतात. त्याचा पराक्रम चंद्राची शीतलता आणि आल्हादकता धारण करून स्वराज्यांत नांदतो. पण तोच पराक्रम शत्रुप्रदेशाच्या बाबतींत उग्र तेजस्वितेचें रूप घेऊन तेथलें वैभव धुळीला मिळवितो. तुझी इच्छा असल्यास अशा या तरुण राजाची तूं पट्टराणी होऊं शकतेस." सुनंदेनें इंदुमतीला पुरविलेली ही माहिती शूरसेन देशाच्या राजाविषयींहि तिच्या मनांत प्रेम उत्पन्न करूं शकली नाहीं. उलट समुद्राच्या दिशेनें धांवत निघालेल्या

नदीच्या वाटेंत जर एकादा उंचवटा आला तर ती जशी त्याला वळसा घालून पुढें निघून जाते त्याप्रमाणें इंदुमती पुढें चालूं लागली.

नंतर मग बाहूवर अंगदालंकार घातलेल्या, शत्रूच्या नाशानें अजिंक्य बनलेल्या कालिंग देशच्या हेमांगद नामक राजाकडे नेऊन सुनंदेनें इंदुमतीला म्हटलें, " हा राजा महेंद्र पर्वताप्रमाणें धीरगंभीर असून याच्या सैन्यांत पर्वतप्राय प्रचंड हत्तींचा मोठा भरणा आहे. धनुर्धारी योध्द्यामध्यें अग्रणी असून तो सव्यसाची आहे. याची झोपमोड करण्यासाठीं याच्या राजवाड्याचा अगदीं पायथ्याशींच समुद्र घनगर्जना करीत सारखा उभा आहे. " हें सुनंदेनें केलेलें वर्णनसुद्धां भोजकन्येच्या अंतःकरणाचा ठाव घेऊं शकलें नाहीं. प्रतिकूल दैव असलेल्या माणसापासून लक्ष्मी जशी दूर जाते, त्याप्रमाणें हेमांगदाकडे पाठ फिरवून ती पुढें निघाली.

नंतर पांड्यदेशच्या उरणपुरीच्या अधिपतीकडे त्या द्वाररक्षिकेनें भोज-पुत्रीला नेलें. एकदां अश्वमेध यज्ञ यशस्वी रीत्या संपविल्यावर या राजानें यज्ञ-समाप्तिदर्शक अवभृतस्नान केलें. तेव्हां त्याचें कुशल मोठ्या प्रेमानें अगस्ति ऋषींनीं विचारलें होतें. ब्रह्मशिर नामक एक दुर्मिळ अस्त्र या राजानें शंकरा-पासून मिळविलें असल्यानें याच्या समोर येण्याला लंकापति रावणहि धजला नाहीं. त्यानें याच्याबरोबर युद्ध करण्याऐवजीं याच्याशीं तह केला. याची होतेस तूं पट्टराणी ? याचा रंग सावळा आहे. तूं गौरीप्रमाणें गोरी आहेस. हा तुम्हां उभयतांचा लग्नयोग मेघ-विद्युल्लतेप्रमाणें परस्परांची शोभा वाढविणारा होईल." पण, या सुनंदाकृत स्तुतीचा परिणाम इंदुमतीवर थोडाहि झाला नाहीं. सूर्यविकसिनी कमलिनी चंद्रापुढें उमलते थोडीच !

रात्रीच्या वेळीं मशालीनें प्रकाशित झालेले चेहरे हे मशाल नसल्यावर निस्तेज होतात, त्याचप्रमाणें ज्या ज्या राजपुत्रापुढून भोजकन्या निघून गेली तीं राजमुखें उतरून गेलीं !

**अजाची निवड**

आतां अज युवराजाची पाळी आली. इंदुमती आपल्याला वरील कीं वरणार नाहीं, अशा संशयांत असलेला तो अज उजव्या बाहूवरल्या केयूरावर आपले जलद चालणारे उच्छ्वास सोडीत बसला होता. त्याच्यावर

भोजकन्येनें आपली दृष्टि खिळवून स्थिर केलेली पाहिल्यावर सुनंदा तिला सांगूं लागली, "मनुपुत्र इक्ष्वाकु वंशांत राजश्रेष्ठ आणि सुविख्यात ककुत्स्थ नांवाचा राजा होऊन गेला. त्याच्या विजयी वंशांतल्या राजपुरुषांना ककुत्स्थ या नांवानें ओळखतात. त्यांचें राज्य उत्तरकोशलांत आहे. त्या ककुत्स्थानें एकदां देवदानवांच्या युद्धांत दैवांच्या बाजूनें भाग घेतला होता. आणि त्या संग्रामांत महोक्षाचें रूप धारण केलेल्या महेंद्रावर बसून त्यानें राक्षसकुलाचा संहार पिनाकपाणी शंकराच्या पराक्रमानें केला होता. त्या ककुत्स्थाच्या कुलांत दिलीप नांवाच्या कुलदीपक राजा होउन गेला. त्यानें नव्याण्णव यज्ञ केले आणि शंभरावा यज्ञ केवळ इंद्राच्या सांगण्यावरून अपुरा ठेवला. त्या दिलीपाची प्रत्यक्ष वायूलाहि भीति वाटे. त्या थोर दिलीपाचा रघु नांवाचा मुलगा सध्यां उत्तरकोशलांत राज्य करीत आहे. त्यानें विश्वजित नांवाचा एक महान् यज्ञ पार पाडला. त्या यज्ञांत त्यानें जितकी संपदा स्वपराक्रमानें चारहि दिशाकडून संपादिली होती आणि जी आणखी वाढली होती ती सगळीच्या सगळी संपत्ति दान करून त्यानें मातीच्या भांड्यां-शिवाय कोशागारामध्ये कांहीं उरूं दिलें नाहीं. त्या रघुपतीचें यश समुद्र आणि पर्वत यांच्या सीमा ओलांडून पलीकडेहि पसरलें आहे ! त्या यशाच्या सुगंधानें स्वर्ग आणि पाताल हीं दोन्ही दरवळून गेलीं आहेत. अशा त्याच्या यशाला दिशा किंवा काळ हीं मर्यादा घालूं शकत नाहींत; इतकें तें दिक्कालातीत झालें आहे. अशा थोर रघुराजाचा मुलगा अज हा इंद्रकुमार जयंताप्रमाणें पराक्रमांत पित्याचा भाऊ शोभतो. त्यानें पृथ्वीचें राज्य करण्याचें अतीव महत्त्वाचें दायित्व पत्करलें आहे. कुलत्व, कांति, नव-तारुण्य, विद्वत्ता, चारित्र्य इत्यादि गुणांनीं तुझ्या अंगच्या गुणांशीं तुलनेनें शोभून दिसणाऱ्या या रघुनंदनाशीं तूं विवाहबद्ध हो. रत्न आणि सोनें यांची मैत्री शोभून दिसते, नाहीं ?"

सुनंदेच्या या अजस्तवनानें इंदुमती लाजेनें संकोचली. मनप्रसन्नतेच्या संतोषलेल्या डोळ्यांनीं तिनें राजकुमार अजाचा पति म्हणून स्वीकार केला. अजाविषयींची तिची अभिलाषा शालीनतेमुळें शब्दांत ती प्रगट करूं शकत नव्हती परंतु तिच्या आंतरिक भावांतून ती इच्छा लोकांना सहज समजली. सुनंदा थोडी थट्टेखोर होती. तिनें इंदुमतीला म्हटलें, " आर्ये, चलायचें आहे ना पुढें दुसरा

राजपुत्र निवडायला ?" या सुनंदेच्या चेष्टेचा इंदुमतीला मनापासून राग आला. तिनें सुनंदेच्या हातांनीं अजाच्या गळ्यांत मंगलमाला घातली. चंद्राला चांदण्या रात्रीनें किंवा सागराला जान्हवीनें वरावें त्याप्रमाणें इंदुमतीनें रघुनंदनाला वरिलें. सर्व जनता या तुल्यगुण पतिपत्नींच्या संगमानें संतोषली. अजपक्षीय मंडळींत एकच आनंद उसळला. इंदुमतीच्या आशेनें आलेल्या राजपुरुषांचीं तोंडें मात्र पार उतरून गेलीं होतीं ! भगिनी इंदुमतीला स्वतःच्या तोडीचा लाभलेला पति अज युवराज याला बरोबर घेऊन विदर्भराज भोजानें राजधानीकडे आपला मोहरा वळविला. आणि निराश झालेल्या इतर राजपुत्रांनीं मनांतल्या मनात जळफळत स्वतःच्या शिबिरांकडे आपलीं उतरलेलीं तोंडें फिरविलीं. वधूवरांचा राजमार्ग नवनव्या साधनांनीं सजविलेला होता. इंद्रधनुष्याच्या विविध रंगांनीं मार्गावरचीं तोरणें आणि पताका भूषविल्या होत्या. जातांना ऊन लागूं नये म्हणून आवश्यक तें आच्छादनहि पसरलें होतें त्यांच्यावर. भवनांतल्या सुंदरींनीं आपलीं नित्याचीं कामें हातचीं टाकून दिलीं व त्या सुशोभित केलेल्या जाळ्या-खिडक्यांपाशीं येऊन आतुरतेनें नव पतिपत्नींची वाट पहात बसल्या होत्या. कित्येक स्त्रियांना आपल्या वेणींतलीं बंधनें सुटून त्या मोकळ्या झाल्याची पण शुद्ध राहिली नव्हती, इतक्या त्या वधूवर-दर्शनाला उत्सुक झाल्या होत्या. एकीनें फक्त उजव्या डोळ्यांत अंजन घातलें आणि डाव्यांत घालायचेंच ती विसरून गेली. माला ओंवणारी एक स्त्री अर्धवट ओंवलेली माला तशीच हातीं घेऊन गवाक्षाकडे धांवली. राघवाला मोठ्या आतुरतेनें बघणाऱ्यांच्या नजरा इतक्या तद्रूप झाल्या होत्या कीं, त्यांचीं बाकीचीं इंद्रियें देखील आपापलें ऐकणें–हुंगणें–चाखणें आदि व्यापार विसरून डोळ्यांतच येऊन जणुं बसलीं होतीं ! अशा प्रकारें दोन्ही बाजूंचीं गवाक्षें अन्यान्य पौररमणींनीं नुसतीं फुलून गेलीं होतीं. त्यांच्या दृष्टींचे आणि मनोमन धन्योद्गारांचे सुखद आशीर्वाद स्वीकारीत रघुनंदन अज इंदुमतीसह राजवाड्यापाशीं येऊन ठेपला. मग उभयतां खालीं उतरलीं.

**लग्नाचा सोहळा**

कामरूपराजानें अजाचा हात धरला होता आणि भोजराजा पुढें वाट दाखवीत चालला होता. तें जोडपें शेवटीं अंतःपुरांत मोठ्या समारंभानें

प्रवेशले, त्यांना सिंहासनावर बसविण्यांत आल्यावर विदर्भराजानें दिलेल्या रत्नमंडित मधुपर्काचा त्यांनीं स्वीकार केला. भोजराजाच्या पुरोहितानें तूप इत्यादि द्रव्यांनीं अग्नींत हवन केलें आणि त्या प्रज्वलित अग्नीच्या साक्षीनें त्यानें वधूवरांचा पवित्र आणि दैवी असा पतिपत्नी-संगम घडवून आणला. पत्नीचा हांत आपल्या हातीं घेतलेला अज अशोकलतेचा आधार असलेल्या आम्रवृक्षासारखा शोभून दिसत होता. नंतर सप्तपदी, लाजाहोम आदि विधी झाले.

अशा रीतीनें भगिनीचा लग्नविधि उरकल्यावर भोजराजानें उपस्थित राजांचें व्यक्तिशः आगतस्वागत करण्याकरितां अधिकाऱ्यांना आज्ञा दिली. त्या सर्व राजांनीं बाह्यतः संतोषित झाल्याचा आविर्भाव आणला आणि विदर्भ-राजाचा पाहुणचार स्वीकारल्यासारखें दाखवून तोच पुन्हां स्वतःचा म्हणून त्याला परत केला. आणि मग ते स्वगृहीं परतले.

या राजेलोकांनीं अगोदरच एक कट रचला होता. अजराजा इंदुमतीला स्वतःच्या नगरींत घेऊन जात असतांना ह्याला वाटेंत एकटें गांठावयाचें असें त्यांनीं ठरविलें होतें. त्याप्रमाणें नववधूसह अजराजाचा रस्ता अडवून ते सगळे त्याची वाट पहात राहिले.

क्रथकैशिक देशच्या राजानें अजाला भरपूर संपदा कन्यादानाबरोबर दिली आणि त्याची सन्मानानें पाठवणी करून तो स्वतः त्याच्या मागोमाग निघाला. कुंडिनपुरचा राजप्रमुख भोजराजा हा राघवाबरोबर तीन दिवस-रात्र राहिला आणि तेथून मग तो स्वगृहीं परतला.

### विघ्न आणि त्याचा परिहार

रघुराजानें दिग्विजयाच्या वेळीं इतर सर्व राजांची संपदा जिंकली होती त्यामुळें अगोदरच त्याच्यावर त्यांचा राग झाला होता. आतां त्याच्या मुलानें इंदुमतीचें पाणिग्रहण केल्यानें त्या रागाचें द्वेषांत रूपांतर झालें. संतापलेल्या त्या राजसंघानें पत्नीला राजधानीस घेऊन जाणाऱ्या अजाचा रस्ता रोखला. पत्नीचें रक्षण करण्यासाठीं बरोबर असलेल्या सैन्याला विरोध करणाऱ्या शत्रूंवर चालून जाण्यास रघुकुमारानें सांगितलें. त्याबरोबर दोन्ही बाजूंनीं युद्धाला तोंड लागलें. पदाती, रथी, अश्वारूढ आणि गजरूढ अशा

त्या त्या लढवय्या सैनिकांमध्यें द्वंद्वयुद्धें पेटलीं. बाणांची धुमश्चक्री सुरू झाली. युद्धाच्या रणधुमाळींतून उफाळलेल्या धुळीच्या प्रचंड लोटांनीं सूर्यहि आच्छादला गेला. आपला-परका ओळखणेंहि कठीण झालें. बराच वेळ हें द्वंद्वयुद्ध चालल्यावर अजाला प्रियंवद गंधर्वाकडून मिळालेलें मोहनास्त्र त्यानें शत्रुसैन्यावर सोडलें. त्यामुळें राजसमूहाची सगळी सेना गाढ झोपेली. कुमार अजानें लगेच विजयी मुद्रेनें शंख फुंकला. राणी इंदुमती अगोदर भ्यायली होती ती पण सुखावली. तिच्या सखीच्या करवीं अजराजाचें तिनें अभिनंदन केलें. नंतर अज ससैन्य स्वगृहीं येऊन पोहोंचला.

रघुराजाला अजविवाहाची आणि राजधानींत परततांना त्यानें केलेल्या पराक्रमाची सगळी वार्ता अगोदरच समजली होती. सपत्नीक आलेल्या मुलाचें रघूनें मनापासून अभिनंदन केलें. अज युवराज आतां राज्य करायला समर्थ झाला आहे, असें रघुराजानें ताडलें. म्हणून त्याच्या शिरावर कोशल-राज्याचें दायित्व सोपवून स्वतः वानप्रस्थाश्रम स्वीकारावा अशी आतुरता त्याच्या मनोमंदिरांत खेळूं लागली. एकदां संतान हें कुळाचें सर्व दायित्व सांभाळण्यासारखें झालें म्हणजे मग सूर्यवंशीय राजे गृहस्थाश्रमांतून काढता पाय घेतात.[१८]

## : ३ :

# प्रेमळ अयोध्याधिपति अज

* * * * * * * * * * *

### कर्तव्यबुद्धीनें पत्करलेला राज्यभार

पित्यानें सोंपविलेल्या राज्यभाराचा स्वीकार अज राजानें कर्तव्यबुद्धीनें केला. त्याच्या मनामध्यें राज्योपभोगाची लालसा मुळींच नव्हती. अजाचा हा राज्याधिकाराचा स्वीकार सर्व प्रजाजनांनीं मोठ्या आनंदानें मानला.

१८. न हिसति कुलधुर्यं सूर्यवंश्या गृहाय ।

कारण योग्य राजा लाभल्यामुळें त्यांना कृतार्थ झाल्यासारखें वाटलें. वसिष्ठ ऋषींनीं अथर्ववेदांत सांगितलेल्या विधीप्रमाणें अजाला राज्याभिषेक केला. राज्याभिषेकाच्या निमित्तानें झालेला वसिष्ठ-अजाचा हा ब्रह्म-क्षत्र संयोग अग्नि-वायूच्या मैत्रीप्रमाणें शत्रूंच्या मनांत धाक उत्पन्न करणारा झाला. अजानें आपल्या वडिलांची केवळ राज्यश्रीच संपादिली नव्हती तर त्यांच्या ठिकाणच्या इतर सर्व गुणांनीं पण तो परिपूर्ण होता. अजाचें नवतारुण्य हें त्याच्या अंगच्या विनयानें अधिकच शोभून दिसलें. त्यानें प्रजेची इतकी मर्जी संपादन केली होती कीं, प्रत्येकाला ‘ मीच काय तो राजाचा आवडता आहें ’ असें वाटे. कोणाच्याहि मनांत त्याच्याविषयीं थोडासाहि द्वेषभाव नव्हता.

समकालीन राजांबरोबरची अजाची वागणूक ही नेमस्त होती. तो त्यांच्याशीं अति निष्ठुरतेनें जरी वागला नाहीं तरी त्यांना त्यानें सैलहि सोडलें नव्हतें. वारा झाडांना उलथून टाकीत नसला तरी पण त्यांना तो गदगदा हलवून आपल्या अस्तिवाचा विसर पडूं देत नाहीं, त्याप्रमाणें अजानें इतर राजांचा निःपात केला नसला तरी स्वतःच्या प्रभावानें त्यांना नमविलें होतें मात्र निश्चित.

**रघु आणि राघव**

रघुराजानें गृहस्थाश्रमांतून वानप्रस्थाश्रमांत जाण्याचा निश्चय केला. पितापुत्रांनीं ऐकमेकांचा भरल्या, जड अंतःकरणानें निरोप घेतला. टाकून दिलेल्या त्वचेकडे साप जसा पुन्हां ढुंकूनहि बघत नाहीं त्याप्रमाणें विरागी बनलेल्या रघूनें राज्यश्रीची स्वतःला नुसती आठवणहि होऊं दिली नाहीं. तो नगरीबाहेर जाऊन राहिला. चंद्र आकाशांत असतांनाच सूर्याचा उदय झाला म्हणजे आकाशाची जी अवस्था होते तशी त्या इक्ष्वाकु वंशाची स्थिति यावेळीं झालेली होती. मोक्षार्थी बनलेला संन्यस्त रघु आणि राजैश्वर्यां-वर आरूढलेला अज राजा अशा राजजीवनाच्या दोन्ही अवस्था प्रजेला अनु-भवावयास मिळाल्या. सर्वत्र अजिंक्यपद लाभावें म्हणून कुशल मंत्र्यांची योजना अजानें केली होती, तर वैराग्यशील रघूनें निरामय अशा मोक्ष-पदाच्या प्राप्तीसाठीं भोंवतालीं योगीजन एकत्र केले होते. तरुण अजानें प्रजेच्या रक्षणाकरितां आणि प्रगतीकरितां राज्यपदाचा स्वीकार केला होता,

तर वृद्ध रघूनें चित्ताची एकाग्रता अभ्यासण्यासाठीं निर्जन ठिकाणीं दर्भांनीं पवित्र झालेलें आसन पत्करलें होतें. एकानें कोशदंडादि राजसामर्थ्यानें नृपतींना वश केलें होतें तर दुसऱ्यानें योगशक्तीचा उपयोग करून पांच प्राण हस्तगत केले होते. राघव हा शत्रूंच्या कारवाया हाणून पाडण्यांत दक्ष होता आणि रघु हा वैराग्याग्नींत स्वतःची कर्मे जाळून टाकण्यांत गढून गेला होता. संधि, विग्रह, आक्रमण, उपेक्षा, भेद आणि आश्रय हे जे राजनीतिशास्त्राचे सहा गुण त्यांचा आवश्यक त्या ठिकाणीं रघुनंदन उपयोग करीत होता. आणि अजपिता हा स्वतः सत्त्व-रज-तम या तीन गुणांना जिंकून समबुद्धि बनला होता. नवराजा अज हा धिमेपणानें हातीं घेतलेलीं कामें यशस्वी केल्याविना कधीं विश्रांती घेत नसे; तर दृढ निश्चयाचा पुराणपुरुष रघु हा परमात्मदर्शन होईपावेतों योगविधी सतत आचरीत रहात असे. शत्रूंची स्वार्थपरता रोखून धरण्यांत अज आणि इंद्रियांचा स्वैराचार बांधून ठेवण्यांत रघु हे डोळ्यांत तेल घालून सावध राहिले होते. अशा रीतीनें अजानें अभ्युदय आणि रघूनें निःश्रेयस किंवा मोक्ष हीं आपापलीं उद्दिष्टें तत्परतेनें साध्य करून घेतलीं.

**पुत्रप्राप्ति**

कांहीं वर्षांनंतर रघु हा जड देह टाकून सायुज्य मोक्षाप्रत गेला. अजानें नंतर यतीला योग्य अशीं त्याचीं क्रियाकर्मांतरें पार पाडलीं. पुढें मोठ्या दक्षतेनें अज राजा राज्यकारभार हाकारीत होता. त्याच्या अनुशासनाच्या काळांत भूमी धनधान्यांनीं समृद्ध झाली. तसेंच त्याच्या पत्नीनें पण सुपुत्राला जन्म दिला. भावी काळांत तेजस्वी आणि यशस्वी झालेल्या या मुलाला ‘ दशरथ ’ या नांवानें विद्वान लोक आणि जनता ओळखूं लागली. राज्यांत झालेल्या अध्ययन-अध्यापनानें ऋषिगणांच्या, यज्ञयागांनीं इंद्रादि देवगणांच्या आणि संततीनें पितरांच्या ऋणांतून अज राजा मुक्त झाला. अजाची संपदा जशी प्रजेच्या कल्याणासाठींच उपयोजिली जाई तसे त्याचे गुणसुद्धां तिच्यासाठींच खर्चीं पडत. पीडितांची भीतीपासून सुटका करण्यासाठीं त्याच्या पराक्रमाचा उपयोग होई. त्याचा बहुश्रुतपणा तो विद्वानांच्या सत्काराकरितां वापरीत असे.[१९]

---

१९. बलं आर्तभयोपशांतये विदुषां सत्कृतये बहुश्रुतम् ।

प्रजेला सुखी आणि भयमुक्त केल्यानंतर अजराजानें मुलावर राज्य-भाराचा कांहीं अंश सोपविण्याला सुरुवात केली. आणि तो स्वतः देवी इंदुमतीसह राजधानीच्या उपवनामध्यें कांहीं काळ घालवूं लागला.

**इंदुमतीचें निधन**

दक्षिण समुद्राच्या तीरावर गोकर्ण नांवाचें शिवालय वसलें आहे. शंकरा-समोर आपल्या वीणावादनाची सेवा रुजू करण्याकरितां एकदां नारद आकाशमार्गानें तेथें गेले. त्यांच्या वीणेवर सुगंधित फुलांची एक दिव्य माला घातलेली होती. ही माला वीणेवरून हिसकल्यामुळें ती खालीं भूमीकडे धांव घेऊं लागली. त्याबरोबर भुंग्यांचा समुदाय पण खालीं खालीं येत होता. ती दिव्य सुगंधित पुष्पमाला अकस्मात् इंदुमतीच्या हृदयावर येऊन आदळली. राणीनें क्षणभर त्या मालेकडे बघितलें आणि लगेच ती भूमीवर मूर्च्छित होऊन पडली. अज पण घाबरला. त्यानेंहि अंग खालीं टाकलें. इंदुमतीचा प्राण तिच्या शरिराला सोडून गेला ! आसपास सेवाशुश्रूषेकरितां अस-लेले दासदासी आक्रोश करूं लागले. त्यांचें रडणें ऐकून भीतीनें हंसादि पक्ष्यांनीं पण क्रंदनाला सुरुवात केली. राजाचें दुःख हळू हळू कमी होऊन तो उठून बसला; पण राणी गेली ती कायमची गेलीच. आयुष्याची दोरी बळकट असली तरच रोगप्रतिकारासाठीं केलेली औषधयोजना फलदायी होते.'' [२०]

त्या अतीव प्रेमळ राजानें मृत राणीला आपल्या मांडीवर घेतलें. त्याचा धीर सुटला. त्याचा कंठ दाटून आला. करुण स्वरांत तो रडूं लागला. दुःख त्याला आवरेनासें झालें. अग्नीनें तापविल्यानें कठीण लोखंडदेखील जेथें मऊ पडतें तेथें दुःखाग्नीपुढें शरिराचा तो काय पाड ![२१] अज विलाप करूं लागला. “ नुसत्या कोमल फुलांच्या आघातानें देखील प्राण जाऊं लागला, त्या अर्थीं दैव हें कोणत्याहि साधनानें आयुष्य हरण करूं शकतें असें दिसतें.[२२] नाजुक वस्तूचा नाश कोमल वस्तूकरवींच करण्याचा कालाचा हेतु असेल यांत कदाचित् ! पाण्याच्या नुसत्या तुषारांनीं कमलिनीचा नाहीं का नाश

**२०. प्रतिकारविधानमायुषः सति शेषेहि फलाय कल्पते ।**

**२१. अभितप्तमयोपि मार्दवं भजते कैव कथा शरीरिषु ।**

**२२. वा भविष्यति हंत साधनं किमवान्यत् प्रहरिष्यतो विधेः ।**

होत ? फुलांची माळ ही जर जीव घेणारी असती, तर तिला मी माझ्या हृदयावर ठेवली असतां तिनें मला जिवंत ठेवलें नसतें! ईश्वराची इच्छा असेल तर विषाचेंहि अमृत होईल आणि त्या इच्छेच्या अभावीं अमृतालाहि विषपणा प्राप्त होईल ![23] नाजुक आणि कोमल अशा पुष्पमालेच्या अंगीं विजेची दाहकता आणि घातुकपणा उत्पन्न करून विधात्यानें झाडाच्या ऐवजीं आश्रयाला असलेल्या वेलीचा नाश करावा त्याप्रमाणें त्यानें माझ्या पत्नीचे प्राण घेतले, हें माझें दुर्भाग्य होय ! हे देवी, मागें माझ्या हातून कितीहि चुका घडल्या तरी तूं त्या कधीं मनावर घेतल्या नाहींस किंवा माझी कधीं अवज्ञा केली नाहींस. आणि आतां मात्र माझ्या हातून कोणताच अपराध घडला नसतांना माझ्याशीं नुसतें बोलण्यालाहि तूं तयार नसावीस ? हे सुहासिनी, माझें तुझ्यावरचें प्रेम हें खरोखर कपटी आणि लबाड माणसाचें प्रेम होतें, असें समजून तर तूं मला न विचारतां, कायमची सोडून गेली नाहींस ना ? तूं गेलीस तसा मी मूर्च्छित झालों. त्या वेळीं माझा जीवहि तुझ्यामागोमाग गेला होता. पण पुन्हां तो परत येऊन मला त्यानें शुद्धीवर आणून माझ्या दुःखांत त्यानें अधिकच भर घातली आहे. स्वतःच्या हातानें ओढवून घेतलेलें हें दु.ख मला सोसणें भाग आहे. हे सुभगे, मी मनानें देखील तुला न आवडणारी गोष्ट केली नाहीं. अशा मला टाकून तूं कां बरें निघून गेलीस ? माझें खरेंखुरें सहज, प्रेम तुझ्यावरच होतें. आतां मी केवळ नांवाचा राजा राहिलों आहे.[24] तुझे निळेभोर केश मधून मधून वाऱ्यानें हेलकावतात. तें पाहून तूं पुन्हां हालचाल करूं लागशील अशी वेडी आशा माझ्या मनांत उगीचच डोकावते ! प्रिये, तू लवकरच जागी हो आणि माझें विरहदुःख दूर कर. निःशब्द झालेलें तुझें म्लान मुख मला अधिकच त्रास देत आहे. थोड्याशा विरहानंतर चंद्राला रात्र येऊन भेटते. चक्रवाक पक्ष्यापासून दूर गेलेली चक्रवाकी ही पण त्याच्याजवळ कांहीं काळानंतर येते. त्या दोघांची अल्पकालीन विरहावस्था आठवली म्हणजे मग तुझी माझ्याशीं कायमची झालेली ताटातूट माझें दुःख अधिकच वाढविते. ज्या शरिराला कोवळीं

---

२३. विषमप्यमृतं क्वचिद्भवेत् अमृतं वा विषमीश्वरेच्छया।

२४. ननु शब्दपतिः क्षितेरहम् ।

लुसलुशीत पानें सुद्धां ताप देत असत, तें शरीर ओबडधोबड चितेवरची निद्रा कशी सहन करूं शकेल? हें कृपा करून मला तूं सांगूं शकशील का? कोकिळांशीं होत असलेलें तुझें तें गोड गोड बोलणें; हंसांच्या संगतींतलें तुझें तें तुरतुर चालणें; हरिणासारखी तुझी ती चंचल दृष्टि; आणि लतिकांच्यासारखा तुझा तो हळुवार कंप; हे सगळे तुझ्या अंगचे गुण माझ्या मनाला झालेल्या दुःखाच्या वेदना दूर करूं शकत नाहींत. आपल्या उद्यानांतला त्या लतेचें तूं आम्रवृक्षाशीं लग्न लावायचें ठरविलें होतेंस. हा लग्नविधि न उरकतांच निघून जाणें तुला शोभतें का? तू वाढविलेला अशोक आतां लवकरच फुलें देऊं लागेल. त्या फुलांनीं मी तुझा केशसंभार कसा शोभवूं? त्या अशोकाला तुझ्या पायांतल्या नूपुरांचा मंजुळ ध्वनी ऐकायला न मिळाल्यामुळें तो पुष्पाश्रु गाळून तुझ्याविषयीं शोक करीत बसेल! अर्धवट ओवलेली ही बकुलफुलांची माळ पुरी ओवण्या-अगोदरच झोपी जाणें तुझ्यासारखीला शोभतें का? तुझे सेवकजन तुझ्या सुखदुःखाशीं नेहमीं एकरूप होणारे असे आज्ञाधारक आहेत. तुझा गोजिरवाणा मुलगा द्वितीयेच्या चंद्राप्रमाणें आतां कोठें बाळसें धरूं लागला आहे. आणि माझी तुझ्या ठिकाणची प्रीति किती एकरूप होती याची पण तुला चांगली कल्पना आहे. अशा स्थितींत तूं आम्हांला सोडून जावेंस यांत निष्ठुरपणाचा तूं अगदीं शेवट गांठलास! तुझ्यावांचून माझा धीर खचला; खेळकरपणा संपला; गाण्यांतली हौस मावळली; ऋतूंमधला उत्साह निस्तेजला; सौंदर्यांतली गोडी आटली; आणि शय्यागृह भयाण वाटूं लागलें.

प्रिये, तूं माझी धर्मपत्नी होतीस. तुझें मला मंत्र्याप्रमाणें साहाय्य होत असे. उत्तम मित्र पण तूंच होतीस माझा. माझ्यापासून किती तरी वेगवेगळ्या कला तूं शिकलीस. अशा अनेक प्रकारच्या नात्यांनीं तुझा माझ्याशीं संबंध जडला असतांना त्या क्रूर मृत्यूनें तुला उचलून नेऊन माझें सर्वस्वच हिरावून घेतलें आहे! तुझ्याबरोबरच माझीं सगळीं उपभोगांतलीं सुखें पण संपलीं. माझे सगळे भोगविषय हे तुझ्या सहवासावरच अवलंबून होते."

**अजाचें सांत्वन**

अजराजानें केलेला हा विलाप इतका करुण होता कीं, आसपासच्या वृक्ष-वेली देखील त्याच्या शोकानें दुःखित झाल्या. नंतर नातेवाइकांनीं आणि

मित्रांनीं इंदुमतीच्या शरिराचें चंदनाच्या काष्ठांत दहन केलें. दहा दिवस लोटल्यानंतर त्या तेजस्वी स्त्रीचें क्रियाकर्मांतर त्या उपवनांतच अजानें पार पाडलें. आणि मग जड अंतःकरणानें परिवारासह तो नगरींत परतला.

दीक्षित वसिष्ठ आपल्या आश्रमांतच होते. ध्यानमग्न होउन त्यांनीं अजराजाच्या दुःखाचें कारण तेव्हांच ताडलें. लगेच राजाचें सांत्वन करण्याकरितां त्यांनीं शिष्याला पाठविलें आणि त्याच्याबरोबर निरोप दिला कीं, "तुझ्या पत्नीच्या निधनाची दुःखद वार्ता समजली असतांनाहि वसिष्ठ मुनींना तुझ्या सांत्वनासाठीं येतां येत नाहीं; कारण त्यांच्या यज्ञाची समाप्ति अजून व्हायची आहे. हे सदाचारी राजा, मजपाशीं त्यांनीं एक लहानसा सूत्ररूप संदेश तुला देण्यासाठीं दिला आहे. तो शांतपणानें आणि धीरानें ऐक आणि त्याची सांठवण आपल्या हृदयांत करून ठेव. वसिष्ठ मुनींना भूत, वर्तमान आणि भविष्य या तीनहि काळांतील प्रसंग पहाण्याची दिव्य दृष्टि आहे.

" पूर्वी तृणबिंदु नांवाचा एक ऋषि रानांत दुर्धर तप करीत होता. त्याचा तपोभंग करण्याकरितां इंद्रानें हरिणी नांवाची अप्सरा त्याच्याकडे पाठविली. तिनें त्या तपस्व्यासमोर मनोहर हालचाली करण्यास सुरुवात केली. त्यामुळें त्याच्या तपांत अडथळा उत्पन्न झाला. ऋषि संतापला आणि त्यानें त्या सुरांगनेला ' तूं पृथ्वीवर मनुष्यरूपानें जन्मास येशील,' असा शाप दिला. तेव्हां ' हे भगवन्, मी अप्सरा देवांच्या सर्वस्वीं आधीन असतें. त्यांच्याच सांगण्यावरून मी तुमचा समाधिभंग करण्याचा यत्न केला. या माझ्या अपराधाची क्षमा करा,' असा हरिणीनें तृणबिंदूपाशीं उःशाप मागितला. ऋषीनेंहि ' दिव्यपुष्पांचा स्पर्श होईपावेतों तूं पृथ्वीवर मनुष्यरूपांत रहाशील; तो होतांक्षणीं पुन्हां तुझें पूर्वीचें रूप तुला लाभेल,' असा उःशाप दिला. ती हरिणी या पृथ्वीवर क्रथकैशिक कुलामध्यें जन्माला आली. इंदुमती राणी म्हणून तुझ्याबरोबर जिनें अनेक वर्षें सुखानें राज्य केलें, ती हीच अप्सरा. दिव्य स्वर्मालेचा तिला स्पर्श झाल्यामुळें तिला परत स्वर्लोकीं जाणें भागच होतें. म्हणून राजा, राणीच्या मृत्यूचा शोक करणें आतां सोडून दे. जो जन्माला आला त्याला केव्हां ना केव्हां तरी हें जग सोडून जावेंच लागतें. तुला जरी पत्नी नसली तरी या पृथ्वीचें तूं नीट पालन कर. कारण वसुमती पृथ्वी हीच राजे लोकांची पत्नी असते. धीर धर. शोक टाकून दे. तूं

अभ्यासिलेल्या अध्यात्मज्ञानाचा प्रकाश तुझ्या अंतःकरणांत पडूं दे. कितीहि शोक केलास तरी मृत झालेली पत्नी तुला कांहीं आतां परत मिळायची नाहीं ! कारण परलोकांत निघून गेलेल्या प्राण्यांचे रस्ते त्यांच्या कर्मानुसार वेगवेगळे असतात. [२५] राजा तूं दुःख सोडून दे. आणि पत्नीची पिंडोदकक्रिया यथासांग करीत जा. स्वबांधवांच्या दुःखाश्रूंनीं मृत जीवात्म्याला त्रास पोहोंचतो असें म्हणतात. शरीर धारण करणाऱ्या प्राण्यांना केव्हांना केव्हां तरी मरण येणें ही त्यांची नैसर्गिक स्थिति आहे आणि जगणें हीच त्यांची विकृती आहे, असें जाणते लोक सांगतात. [२६] म्हणून प्राण्यानें अल्पकाळ जगणें ही गोष्ट देखील अलभ्य लाभाची मानावी आणि त्याचा सदुपयोग करावा. मूढ माणूस प्रिय माणसाचा मृत्यु हा हृदयांतल्या शल्यासारखा वाईट मानीत असतो. पण ज्ञानी जो असतो तो मेलेला माणूस स्वर्गांत जायला मोकळा झाला, या जाणिवेनें दुःखमुक्त झाल्याचा आनंद उपभोगतो ! शरीर आणि जीव यांचे संयोग-वियोग होत असतात, हें तूं ऐकले आहेस. असें असतांना बाह्य विषयांपासून होणाऱ्या विरहामुळें ज्ञान्याला दुःख होण्याचें कांहींच कारण नाहीं. हे जितेंद्रिय राजा, सामान्य माणसाप्रमाणें तूं शोकाच्या आधीन होऊं नकोस. ”

अजराजानें वसिष्ठशिष्याकरवीं मुनींचा आलेला संदेश शांतपणें ऐकून घेतला, आणि ‘ बरें आहे ’ असें म्हणून त्याला निरोप दिला.

राजपुत्र लहान म्हणून अजानें पत्नीविरहाचें दुःख कसेंबसें गिळलें आणि आठ वर्षें राज्यकारभार हांकला. तो आतां स्वतःच्या दायित्वावर प्रजेचें रक्षण करील अशी निश्चिति झाल्यावर अजानें राजपुत्र दशरथाला यथाविधि युवराज्याभिषेक केला. आणि पत्नीविरहानें पीडलेल्या शरिराची दुःखापासून सुटका व्हावी, यासाठीं प्रायोपवेशन करून जीविताचा शेवट करण्याचा विचार त्यानें केला. शेवटीं त्यानें गंगासरयूच्या संगमतीर्थामध्यें जलसमाधि घेतली.

---

२५. **परलोकजुषां स्वकर्मभिः गतयो भिन्नपथा हि देहिनाम् ।**

२६. **मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।**

: ४ :

# राजगुणसंपन्न दशरथ

* * * * * * * * *

**दशरथाची महति**

अजानंतर नव्यानें उत्तर कोसल जिंकून महारथी दशरथ त्याचाहि राजा झाला. त्याच्या कुलपरंपरेला शोभेसें त्याला नागरिक जनांचें सहकार्य लाभलें होतें. त्याच्या राज्यांत वेळच्यावेळीं पाऊस पडे आणि लोक करभारहि वेळच्यावेळीं देत असत. म्हणून विद्वान् लोक इंद्र आणि दशरथ या उभयांची कर्तव्यतत्पर म्हणून वाखाणणी करीत. त्याच्या राजवटींत प्रजा आरोग्यसंपन्न होती. शत्रूपासून तिला त्रास होत नसे. तसेंच भूमि पण भरपूर धान्य.आणि फळें प्रसवे. आजोबा रघु आणि पिता अज यांच्या वैभवांत आणि पराक्रमांत दशरथ हा थोडासुद्धां मागें राहिला नाहीं. धनधान्याचा यथायोग्य विनियोग करण्यांत आणि दुष्टांना ताब्यांत ठेवण्यांत राजा दशरथ हा कुबेर आणि यम यांचें अनुकरण करतो आहे, असें वाटे. तेजस्वितेंत तर तो प्रतिसूर्यच होता. मृगयेकडे त्याचा ओढा नव्हता. किंवा द्यूत, मद्य आणि मदिराक्षी यांच्या मोहजाळांतहि तो कधीं फसला नाहीं. राज्यांत दैन्य, दारिद्य नसल्यानें दीनवाणी भाषा कोठें ऐकू येत नसे. थट्टेंत देखील खोटें बोलण्याची किंवा रागाच्या भरांत निष्ठुर भाषा वापरण्याची संवय त्याच्या प्रजेला नव्हती. या अजनंदनाच्या आज्ञेंत जे राजे वागत त्यांच्याशीं तो मैत्रीनें वागे. पण त्याच्याशीं उन्मत्तपणानें वागणाऱ्यांबरोबर तोहि पोलादी कणखरपणानें वागून त्यांचा नाश केल्याशिवाय रहात नसे. त्यानें स्वतःच्या एकट्याच्या पराक्रमावर समुद्रवेष्टित सगळी पृथ्वी जिंकली होती. राजाच्या विजयाचा जयजयकार करणें, एवढेंच काम त्याच्या चतुरंग चमूला उरत असे.

अशा या उत्तरकोसलाधिप विजयशाली दशरथाला कोसल, मगध आणि केकय या देशांच्या राजांनीं आपापल्या कन्यका दिल्या. प्रभाव, उत्साह आणि मंत्र या तीन शक्तींनिशीं इंद्रच जणुं पृथ्वीवर राज्य करीत आहे, असा भास दशरथाच्या राज्यकारभारानें होई.

दशरथानें कित्येक वेळां इंद्राला युद्धांत साहाय्य केलें. तमसा आणि शरयू या दोन नद्यांच्या संगमावर त्यानें व्रतस्थ राहून अनेक यज्ञ केले; दाही दिशांकडून संपत्ति मिळविली आणि यज्ञाच्या स्मरणार्थ तेथें सोन्याचे यूपस्तंभ उभारले. एवढ्या थोरल्या राजवैभवाच्या शिखरावर असतांनाहि दशरथ राजा हा जेव्हां यज्ञासाठीं दीक्षा घेई तेव्हां मौल्यवान् वस्तूऐवजीं हरणाचें कातडें, औदुंबराचा दंड, कुश गवताची मेखला वगैरे साध्या वस्तू वापरीत असे. जलवृष्टि करणाऱ्या इंद्राखेरीज दुसऱ्या कोणाहिपुढें त्यानें आपलें शीर नमविलें नाहीं.

**वसंतागम**

अशा रीतीनें कालक्रमणा चालू असतांना त्या सार्वभौम राजाची सेवा करण्यासाठीं नवनव्या फुलांचा आहेर घेऊन वसंत ऋतु त्याच्या राज्यांत अवतरला. कुबेराच्या उत्तर दिशेकडे सूर्यानें आपलें तोंड फिरविलें. वातावरणांतली थंडी कमी होऊं लागली. झाडागणिक फुलें बहरलीं. नवी पालवी फुटलीं. भ्रमरांचा गुंजारव आणि कोकिळांचीं कूजनें ठायीं ठायीं ऐकूं येऊं लागलीं. जलाशयांतील कमलिनींकडे भुंगे आणि राजहंस मोठ्या आतुरतेनें धांव घेतांना दिसले. अशोक वृक्ष तर उमललेल्या फुलांनीं ओसंडूं लागले. कुरबक वृक्षावरील फुलांमधला मध लुटण्यासाठीं भ्रमरांनीं गुंजारवाचा नुसता पाऊस पाडला. बकुल वृक्ष फुलांनीं बहरून गेले. कळ्यांच्या असंख्य झुबक्यांनीं पळस झांकून गेले. हवेंत गोडसर थंडपणा तरळत होता. झाडांभोंवतीं वेटाळलेल्या वेलींचीं पानें-फुलें मलयागिरीवरच्या वाऱ्यानें कंपित झालेलीं बघून मनाला आल्हाद वाटत होता नाना प्रकारच्या फुलांच्या सुगंधामधून मध्येंच कोकिळांचें कूजन ऐकायला मिळूं लागले. त्यामुळें सर्व ज्ञानेंद्रियांची भूक भागूं लागली. वसंत ऋतूच्या या सुखदायी सहवासांत नगरवासी स्त्रियांनींहि आपल्या सौंदर्यानीं भर घातली. त्यांचीं स्मित हास्यें, त्यांचीं सुंदर मुखकमलें, त्यांनीं कमरेभोंवतीं गुंडाळलेल्या सैलशा मेखला, रुमझुमणारे त्यांच्या पायांतले नूपुर, फुलांनीं शोभलेला त्यांचा केशसंभार, त्यांच्या डोळ्यांतलीं काजळें, भालीं धारण केलेले कुंकुमतिलक आणि अनेक रंगाचीं त्यांनीं धारण केलेलीं वस्त्रें, या सगळ्या गोष्टी वसंताच्या सोहळ्यांत भर घालीत होत्या.

स्त्रिया या वसंतोत्सवांत नवीन बांधलेल्या झोंपाळ्यावर बसून झोके घेत. "ताठा, आळस सोडून आणि भांडणें संपवून आलेल्या वसंताचा मन मानेल तसा उपभोग घ्या " असा कोकिलांनीं आपल्या कूजनांतून संदेश दिला आहे जणुं, असें समजून पौरवासी नारी वसंतोत्सवांत दंग झाल्या होत्या.

## मृगयाविहार

अशा या वसंताची उन्मत्त हालचाल होत असतांना दशरथाच्या मनांत मृगयाविहार करण्याची इच्छा झाली. चालत्या लक्ष्याचा अचूक वेध घेणें, भीतीच्या आणि क्रोधाच्या अगदीं लहानसहान छटांचाहि अनुभव येणें; आणि कितीहि शरीरश्रम झाले तरी त्याचा थकवा न वाटतां शिकारीचा उत्साह कायम रहाणें; या गोष्टी मृगयाविहारांत शिकायला मिळतात. म्हणून दशरथानें मंत्र्यांची संमति घेतली आणि रानावनांत तो शिकारीसाठीं निघून गेला.

त्यानें शिकाऱ्याला साजेसा वेष केला होता. मानेजवळ बाणांचा भाता लटकावून वेगवान रथांतून तो दौडत निघाला. त्यानें डोक्यावरचा केश-संभार वनमाळेनें बांधला होता. अंगांत हिरवें चिलखत घातलें होतें. शिकारी कुत्रे आणि फासेपारधी त्यानें आपल्याबरोबर घेतले होते. तस्करांचा बंदोबस्त करून घोड्यांना जातां येईल अशा वाटा त्यानें तयार करून घेतल्या होत्या. वाटमाऱ्यांचा किंवा वणव्याचा त्रास होऊं नये याची पण त्यानें काळजी घेतली होती. जेथें पाण्याची विपुलता आहे आणि हरीण, पक्षी आणि रानें यांनीं जें समृद्ध आहे, अशा वनांत राजा शिरला.

प्रथमच त्याला एक हरिणांचा कळप दिसला. मत्त झालेला काळवीट त्या कळपापुढें गवताचा घांस चघळीत डौलानें चालला होता. त्याच्या मागून हरिणी जात होती. त्या हरिणीच्या दोन्ही बाजूला तिचीं शावकें स्तनपान करण्यासाठीं धडपडत असल्यामुळें मधून मधून त्या हरिणीला थबकावें लागे. वेगवान् घोड्यावर बसलेल्या शिकारी राजानें बाण बाहेर काढलेला पाहून त्या हरिणकळपाची गाळणच उडाली ! वाट फुटेल तिकडे ते हरिण सैरावैरा धांवूं लागले ! राजाच्या मनांत करुणा आली. त्यानें रोखलेला बाण आवरून मागें घेतला. ती शिकार त्यानें सोडून दिली. नंतर

त्यानें रानडुक्कर, रानरेडा यांची शिकार साधली. त्याला एक गेंडा आढळला. त्याचीं त्यानें आपल्या बाणांनीं शिंगेंच तेवढीं मोडलीं. शत्रूचा उन्मत्तपणा उतरविण्यांतच राजाला भूषण वाटे; त्याचा सर्वस्वी नाश करून आयुष्य संपविण्याची त्याला आवड नव्हती. 'आ' पसरून चवताळून अंगावर तुटून पडलेल्या वाघाच्या तोंडांत सहजपणें कितीतरी बाण तो रोवीत असे. धनुष्याच्या भीषण टणत्कारानें तो रानजाळींत दडून बसलेल्या सिंहाला चवताळून उठवी. चमर नांवाच्या हरिणाच्या शेपटांचे गोंडे तेवढे आपल्या भल्ल नांवाच्या बाणांनीं तो उडवीत असे. या शिकारीच्या नादांत राजा इतका गढून जाई कीं सबंध तोंड घामानें डबडबून गेल्याचेंहि त्याला भान रहात नसे. वाऱ्यानें तो घाम जेव्हां सुकेल तेव्हां सुकेल. राजाला त्याची पण दाद नसे!

### शिकारीचा दु:खद शेवट

राजाला शिकारीचें वेडच लागलें! राज्याची त्याला शुद्ध राहिली नाहीं. परिवाराशिवाय कित्येक रात्री तो रानांतच काढूं लागला. असाच एकदां रुरु जातीच्या हरिणाचा पाठलाग करीत तो तमसा नदीच्या कांठावर येऊन ठेपला. त्या ठिकाणीं तपस्व्यांची बरीच वस्ती होती. त्या नदीच्या पात्रांत कोणी प्रवासी भांडें भरून घेत होता. त्याचा झालेला मधुर पण गंभीर आवाज राजाला हत्तीच्या चीत्कारासारखा वाटला. हत्तीच पाणी पीत असल्याची त्यानें कल्पना बांधली. शब्दवेधी राजानें तत्काल त्या दिशेनें बाण सोडला. क्षत्रियानें वास्तविक युद्धाखेरीज हत्तीचा वध करतां कामा नये, असा शास्त्रांचा दंडक आहे. राजानें हा नियम उल्लंघिला आणि शास्त्रविरुद्ध गोष्ट करण्यास तो सिद्ध झाला. रजोगुणांनीं मोहित झाल्यामुळें पंडित देखील कधीं कधीं चुकीचा मार्ग चोखाळतांना आढळतात.[२७]

इतक्यांत 'हा तात' अशी करुण किंकाळी राजाला ऐकूं आली. शोध घेऊन पहातो तों घायाळ झालेला श्रवण नांवाचा एक मुनिपुत्र हातांत भांडें घेऊन विव्हळत असलेला त्याला आढळला. राजाच्या हृदयालाहि त्यामुळें

---

२७. अपथे पदमर्पयन्ति हि श्रुतवंतोऽपि रजोनिमीलिता: ।

शल्य टोंचल्याप्रमाणें वेदना झाल्या. राजा खिन्न मनानें घोड्यावरून खालीं उतरला; आणि मुनिकुमारापाशीं जड पावलांनीं जाऊन त्यानें त्याला विचारलें,

" तुझें नांव काय? कोणत्या कुळांत झाला तुझा जन्म ? "

" मी एका तपस्व्याचा एकुलता एक मुलगा. " अडखळतच कुमार उत्तरला. पुढें तो म्हणाला,

" माझे अंध आईबाप जवळच आहेत. त्यांना पिण्यास पाणी नेण्यासाठीं मी नदीकांठीं आलों होतों. माझें नांव श्रवण. "

राजानें तसेंच त्या मुलाला उचललें आणि त्याच्या आईवडलांजवळ नेलें. " अजाणपणानें तुमच्या मुलाची हत्या माझ्या हातून झाली, " राजानें त्यांना सांगितलें.

त्या पतिपत्नींनीं कमालीचा शोक केला. पुत्रहृदयांतला बाण त्यांनीं राजाकरवीं काढून घेतला. मुलाचा प्राण केव्हांच निघून गेला होता. मुलाच्या मृत देहावरून त्यांनीं हात फिरविले. पुत्रवियोगाचें दुःख त्यांच्या हृदयांत मावेनासें झालें. अश्रुरूपानें तें सारखे बाहेर ओघळत होतें. त्यांनीं राजाला शाप दिला :

" आमच्याप्रमाणें तुलादेखील म्हातारपणीं पुत्रशोकामुळें मरण येईल. "

राजानें नम्रपणानें त्या मातापितरांसमोर हात जोडले. त्यांना तो म्हणाला, " मला अद्याप संतति झालेली नाहीं. पण तुमच्या शापावरून असें अनुमान निघतें कीं, मी पुत्रवान् होणार आहें. म्हणून तुमचा हा शाप मी अनुग्रहच मानतों. निखाऱ्यांनीं जरी भूमी भाजून निघाली तरी तींतूनच उत्तम बीजांकुर निपजूं शकतात.[२८] मी तुमच्या मुलाचा घातकी आहे हें खरें; पण मी तुमच्यासाठीं काय करावें बरें ! "

राजाच्या या प्रश्नास त्यांनीं उत्तर दिलें.

" मुलाबरोबरच आमचीहि देहत्यागाची इच्छा आहे. म्हणून मुलाच्या शरिराबरोबरच आमच्या देहाचें पण तूं दहन कर ! ' अशी आपली इच्छा मुनीनें दर्शविली.

---

२८. कृष्यां दहन् अपि खलु क्षितिमिंधनेद्धो बीजप्ररोहजननीं ज्वलनः करोति ।

अ. क्र. १०८८५

राजानें परिवाराच्या साहाय्यानें मुनीची इच्छा पुरी केली आणि तो त्याचें शापशल्य मनांत तसेंच ठेवून राजधानींत परतला.

दशरथानें बरींच वर्षे राज्य केलें, पण पितृऋणांतून मुक्त होण्यासाठीं पाहिजे असलेला मुलगा त्याला नव्हता. म्हणून त्यानें जितेंद्रिय अशा ऋष्यशृंगादि मुनींचें साहाय्य घेतलें आणि संतानप्राप्तीसाठीं पुत्रकामेष्टि नांवाचा याग आरंभिला.

**विष्णूकडे देवांची धांव**

या संधीचा लाभ घेण्यासाठीं उन्मत्त रावणाच्या त्रासानें त्रस्त झालेले देव त्याचवेळीं विष्णूकडे गेले. उन्हानें पीडलेले पांथस्थ छायावृक्षाकडेच धांव घेणार. त्या सर्वांनीं देवदेव विष्णूला नमस्कार केला आणि त्याची ते स्तुति करूं लागले : : " विश्वाची उत्पत्ति, रक्षण आणि समाप्ति करणाऱ्या विश्वनाथा, तुला नमस्कार असो. वास्तविक पहातां तूं निर्विकारी आहेस; पण गुणांच्या उपाधींमुळें तूं निरनिराळीं रूपें धारण करतोस. तूं स्वतः अमेय असूनहि जगताचें मापन तूं केलें आहेस. तूं निःस्पृह खरा, पण प्रार्थना करण्यास योग्य आहेस. तूं अजिंक्य असून कोणासहि तूं जिंकूं शकतोस. तूं स्वतः अव्यक्त असूनहि व्यक्त सृष्टि तुझ्यापासूनच उत्पन्न होते. तूं सर्वांच्या अंतरीं वसतोस. जाणण्यास कठीण, इच्छेच्या पलीकडचा, तपस्वी, दयाळू, दुःखरहित, पुरातन, अजर, सर्वज्ञ, स्वयंभू, विश्वनाथ, म्हणून तूं ओळखला जातोस. सात साम, सात समुद्र, सप्ताग्नि, सप्तलोक, चतुवर्ण हीं सगळीं तुझ्याचसाठीं कष्टत असतात. योगाभ्यासी लोक एकाग्र मनानें ज्योतिर्मय अशा तुझा आपल्या हृदयांत शोध घेतात. तूं जन्मरहित असतां-नाहि जन्म घेतोस. व्यापाररहित असतांना शत्रूंचा नाश करतोस. योगनिद्रेंत असूनहि नेहमीं जागरूक असतोस. यामुळें तुझें नेमकें स्वरूप कळणें फार कठीण आहे. तूं सर्वसमर्थ आहेस. ज्यांनीं आपलीं मनें तुला वाहिलीं; ज्यांनीं आपल्या सगळ्या क्रिया तुला अर्पिल्या; किंवा जे विरागी आहेत; अशांची गति तूंच आहेस. केवळ स्मरणानेंहि तूं साधकांना पापमुक्त करतोस. तूं स्तुतीच्या आटोक्यांत मुळींच गवसत नाहींत. तुला मिळवायचें असें कांहींच नाहीं. लोकांवर अनुग्रह करणें एवढेंच काम करण्यासाठीं तूं अवतरतोस. तुझे गुण अमर्याद आहेत; त्यांची वाणीनें स्तुति करणें शक्य नाहीं."

अशा रीतीनें देवांनीं विष्णूचें मनोभावानें स्तवन केलें. नंतर त्यांनीं रावणापासून त्यांना होत असलेली पीडा निवेदिली. त्यावर विष्णु बोलूं लागले :

## विष्णूचें देवांना आश्वासन

" देवांनो, तुमचा पराक्रम आणि तुमचें महत्त्व हीं रावणानें स्वतःच्या प्रभावानें झांकळून टाकलीं आहेत, त्याची मला कल्पना आहे. तुम्हांलाच केवळ नाहीं, तर त्या राक्षसानें तीनहि लोकांत धुमाकूळ घातल्याचें मला ठाऊक आहे. अग्नीला साहाय्य करणें हें जसें वायूचें कामच आहे, तसें मी तुमच्या साहाय्याला आलें पाहिजे. त्यासाठीं माझी प्रार्थना करण्याची जरुरी नव्हती. माझ्या हातून मरण्यासाठींच तो जगला आहे. प्रत्यक्ष ब्रह्म-देवाच्या वरदानामुळें हा रावण चेंढेल बनला असल्यामुळें आजपर्यंत मी त्याची गय केली. त्यानें ब्रह्म्याला तपस्येनें संतुष्ट करून घेतलें आणि ' दैवी प्राण्यापासून मला मरण येऊं नये, ' असा वर मागून घेतला. देवतांपासून निर्भय बनलेल्याला मर्त्य प्राण्यापासून भय असणें शक्य नाहीं अशा कल्प-नेनें ' मर्त्य प्राण्यापासून नाश नसावा' अशी मागणी त्यानें ब्रह्मदेवाजवळ केली नाहीं. ही त्याच्या वर-मागणींतली राहिलेली उणीव तुमच्या पथ्याचीच ठरणार आहे. मी आतां दशरथ राजाचा पुत्र ' राम ' होऊन मर्त्यलोकांत मनुष्य-रूपानें अवतार घेतों; आणि त्या स्वरूपांत असतांना मी राक्षस रावणाचा वध करीन. अशा रीतीनें तुमच्यावरील संकट लवकरच संपेल. तुम्ही तुमच्या मनांत दडलेली भीति आतां सोडा. " इतकें बोलून श्रीविष्णु अंतर्धान पावले. देवांनींहि मनुष्यलोकीं वेगवेगळे जन्म घेतले.

## पायसदान आणि पुत्रप्राप्ति

दशरथानें आरंभिलेला पुत्रकामेष्टि यज्ञ संपला. शेवटीं यज्ञकुंडांतून दिव्य-रूपधारी यज्ञपुरुष प्रगट झाला. त्यानें आपल्या दोन्ही हातांत सोन्याच्या भांड्यांत असलेलें पायसान्न घेतलें होतें. त्या पुरुषानें आणलेलें पायसान्न राजा दशरथानें मोठ्या आनंदानें नम्रतापूर्वक स्वीकारलें. आणि तें कौसल्या आणि कैकेयी या दोन पत्न्यांना वांटून दिलें. त्या दोघींनीं आपल्यांतला



यज्ञकुंडांतून पायसान्न घेऊन यज्ञपुरुष प्रकट झाला.

वांटा सुमित्रेला पण द्यावा, अशी त्यानें आपली इच्छा सांगितली. त्याप्रमाणें त्या दोघींनीं आपल्यांतला अर्धा अर्धा भाग सुमित्रेला दिला.

त्या तीनहि राण्या गरोदर राहिल्या. त्यांना मधूनमधून दिव्य स्वप्नें पडत असत. यथाकाल थोरली राणी जी कौसल्या तिच्या पोटीं एक तेजस्वी पुत्र जन्माला आला. दशरथानें त्याची मनोहर शरीररचना पाहून सर्व मंगलकारी ' राम ' असें त्या मुलाचें नांव ठेवलें. कैकेयीच्या उदरीं जन्मलेल्याचें भरत आणि सुमित्रादेवीच्या पोटीं जन्मास आलेल्या जुळ्या मुलांचीं लक्ष्मण-शत्रुघ्न अशीं नांवें राजानें योजिलीं. सर्व राज्यांतली जनता आनंदून गेली. रावणाच्या मुकुटांतलीं रत्नें त्याच वेळीं गळून पडलीं. हा रावणाला झालेला अपशकूनच होय.

दशरथानें चारहि मुलांचे जातकर्मादि संस्कार केले. मुलें हळूहळू वाढत होतीं आणि त्याचबरोबर दशरथाचा आनंदहि मोठा होत होता. त्यांना योग्य गुरूकरवीं शिक्षण देण्याची व्यवस्था पण करण्यांत आली. राम-लक्ष्मण आणि भरत-शत्रुघ्न ह्या जोड्या परस्परांवरील अतीव प्रेमामुळें लोकविख्यात झाल्या. त्यांच्यांतलें ऐक्य शेवटपर्यंत टिकून राहिलें. त्या चौघांनीं आपल्या अंगाच्या तेजानें, पराक्रमानें आणि विनयानें प्रजेचीं मनेंहि आपल्याकडे वेधून घेतलीं. पितृभक्तीमुळें त्यांनीं राजाची प्रीति पण संपादिली. राजा दशरथ अनुरूप पुत्रप्राप्तीमुळें कृतार्थ झाला.

मुलें थोडीं मोठीं झालीं. क्षात्रविद्येंतलें त्यांचें शिक्षण हळूहळू प्रगट होत होतें. त्यांतल्या त्यांत रामाची प्रगति तर डोळ्यांत भरण्यासारखी होती. रामाच्या पराक्रमाच्या कीर्तीचा सुगंध राज्यभर सगळीकडे दरवळत होता.

### ताडका-वध

इतक्यांत एके दिवशीं कौशिक विश्वामित्र अयोध्येस दशरथाकडे आले. आणि त्यांनीं ऋषिमुनींच्या यज्ञांचें राक्षसांच्या त्रासापासून रक्षण करण्यासाठीं रामाला कांहीं दिवस अरण्यांत पाठवून देण्याविषयीं राजाला विनंती केली. जे तेजस्वी असतात अशांचा उपयोग मोठ्या पराक्रमाच्या कामीं करतांना त्यांच्या लहान वयाकडे लक्ष न देणें हें अगदीं साहजिकच आहे.[२९] वास्तविक

२९. तेजसां हि न वयः समीक्ष्यते।

दशरथाला राम हा नव्या नवसानें झालेला मुलगा; पण त्यानें रामाला लक्ष्मणासह विश्वामित्राच्या स्वाधीन करतांना मागेंपुढें पाहिलें नाहीं. कारण प्राणांची याचना करणाऱ्या याचकाची देखील इच्छा पुरी करण्याची रघुकुलाची पद्धति पूर्वापार चालत आलेली होती.[३०] मातापित्यांना नमस्कार करून धनुर्धारी बंधु राम-लक्ष्मण तेजतपस्वी कौशिकामागोमाग रानांत जाण्यासाठीं निघाले.

वाट क्रमीत असतांना विश्वामित्रानें त्या दोघां राजपुत्रांना बला आणि अतिबला अशा दोन अस्त्रविद्या शिकविल्या. पुढें ते शंकरानें ज्या वनांत मदनाला जाळलें होतें, तेथें येऊन पोहोंचले. नंतर सुकेतु राक्षसाची मुलगी ताडका हिनें उजाड केलेल्या अरण्याच्या रस्त्याला ते लागले. तेव्हां सावधगिरीसाठीं त्या दोघांनीं धनुष्याच्या सोडलेल्या दोऱ्या बांधल्या आणि त्यांचा ते टणत्कार करूं लागले. तो निनाद ऐकून कपालकुंडलें घातलेली काळी कुळकुळीत ताडका राक्षसी त्यांच्यासमोर प्रकटली ! आणि त्या उग्र अक्राळविक्राळ ताडकेनें आरडाओरड करीत श्रीरामावर चाल केली. स्त्रीवधाविषयीं अनिच्छा असतांहि रामानें त्या क्रूर निशाचरीवर तीक्ष्ण बाण सोडून तिचा प्राण घेतला. या रामपराक्रमानें संतुष्ट झालेल्या मुनीनें राक्षसांचा वध करणारी एक अस्त्रविद्या रामाला दिली.

### राक्षसांपासून यज्ञरक्षण

पुढें ते वामनाश्रमीं जाऊन पोहोंचले. तेथून ते सगळे विश्वामित्रांच्या पर्णकुटींत आले. कौशिक मुनींच्या शिष्यांनीं आदरसत्काराची सगळी सिद्धता अगोदरच करून ठेविली होती. वनवृक्षांनीं आपल्या पानांच्या पुडांच्या ओंजळींनीं आणि हरिणांनीं आपल्या उत्सुक माना उंच उभारून त्या राजपाहुण्यांचें स्वागत केलें. आश्रमांतले कांहीं ऋषीमुनी हे शस्त्रास्त्रविद्येंत पारंगत होते; तरी पण त्यांनीं यज्ञदीक्षा घेतली असल्यामुळें युद्धहिंसा करणें त्यांना शक्य नव्हतें. यासाठीं विश्वामित्रानें त्या दोघां लढवय्या राजपुत्रांना यज्ञरक्षणासाठीं मुद्दाम आणलें होतें. आश्रमांत पोहोंचल्याबरोबर श्रीरामानें आपलें धनुष्य सज्ज केलें आणि यज्ञरक्षणाचें काम पत्करलें.

---

३०. अप्यसु प्रणयिनां रघोः कुले न व्यहन्यत कदाचिदर्थिता ।

इतक्यांत यज्ञवेदीवर राक्षसांनीं रक्ताचा शिडकाव करण्यास सुरुवात केली. ऋत्विज त्यामुळें घाबरले. त्यांची पार गाळण उडाली ! रामानें तत्काळ भात्यांतून एक तीक्ष्ण बाण बाहेर काढून वर आकाशांत पाहिलें तों त्याला तेथें राक्षसांचें भलें मोठें सैन्य दिसलें. त्यांच्या दोघां सेनानींचा अगोदर नाश करण्याचें रामानें योजलें. आणि त्याप्रमाणें त्या शस्त्रविद्या-पारंगत असलेल्या रामानें ताडकासुत मारीचावर वाय्वास्त्र सोडून त्याला अगोदर खालीं पाडलें. आणि दुसऱ्या क्षुरप्री नांवाच्या शस्त्रानें मायावी अशा सुबाहु राक्षसाचीं खांडोळीं करून तीं आश्रमाबाहेरच्या पक्ष्यांना खाण्यासाठीं वांटून दिलीं.

यज्ञकर्मावर ओढवलेलें राक्षसांचें मोठें संकट श्रीरामानें अशा प्रकारें दूर करून आश्रममुनींना संतोषित केलें. ऋषींनींहि आपापल्या यज्ञक्रिया यथाविधि पार पाडल्या. रामलक्ष्मणांचें अभिनंदन करण्यास मात्र ते विसरले नाहींत. यज्ञसमाप्ति झाली. कौशिकांनीं अवभृथस्नान करून आपलें मौन सोडलें. रामलक्ष्मणांनीं निरोप घेण्यासाठीं त्याला अभिवादन केलें. विश्वामित्रांनीं त्यांच्या पाठीवरून मोठ्या प्रेमानें हात फिरवून त्यांना आशीर्वाद दिले.

**अहिल्योद्धार व धनुर्भंग**

इतक्यांत मिथिलराज जनकाकडून यज्ञाकरितां कौशिकांना राजधानींत येऊन जाण्याविषयीं निमंत्रण आलें होतें. राम-लक्ष्मणांना पण जनकाच्या धनुष्याची ऐकीव माहिती होती; पण त्यांना तें प्रत्यक्ष पाहण्याची उत्कंठा होती. म्हणून तेहि विश्वामित्रांसह मिथिलापुरीला जाण्यासाठीं निघाले. जातांना वाटेंत सायंकाळ झाली म्हणून त्यांनीं एका विशाल अशा आश्रमवृक्षा-खालीं वस्ती केली. त्या जागीं गौतमपत्नी अहिल्या ही शापामुळें शिळेच्या स्वरूपांत बरींच वर्षें पडून होती. त्या शिळेला रामाच्या पायाची धूळ लागली आणि त्यामुळें लगेच ती शापमुक्त होऊन तिला तिचें सुंदर स्त्रीरूप परत मिळालें.

पुढें रामलक्ष्मण हे विश्वामित्रासह मिथिलानगरींत पोहोंचले. जनकानें त्यांचें मनापासून स्वागत केलें. त्या राजबिंड्यांच्या देखणेपणावर नगरवासी जनहि लोभून गेले. विश्वामित्रांनीं धनुष्याविषयींची रामाची उत्कंठा जनकाच्या कानीं घातली. तेव्हां 'हा कोमल बालक, वांकविण्याला कठीण असें तें अवजड

धनुष्य त्याला वांकवून दोरी कशी लावील' अशी शंका त्याच्या मनांत डोकाविल्याविना राहिली नाहीं. कारण कित्येक मोठमोठे धनुर्धारी क्षत्रियदेखील त्या धनुष्यापुढें नमले होते !

रामानें राक्षसवधानें नुकत्याच केलेल्या यज्ञरक्षणाचा पराक्रम कौशिकांनीं जनकाला सांगितला आणि जनकाच्या मनांतली ती शंका दूर केली. मग जनकानें आपल्या अनेक अनुचरांकरवीं तें साक्षात् शंकरानें वापरलेलें महाप्रचंड शिवधनु आणविलें. रामानें तत्काळ तें भयंकर धनुष्य लीलेनेंच उचलून घेतलें. आणि सर्व प्रेक्षकांसमक्ष बघतां बघतां त्या धनुष्याला लीलेनें दोरी चढविलीहि. लगेच खूप जोरानें तो तें ताणूं लागला. तो ताण सहन न झाल्यानें वज्राप्रमाणें गंभीर ध्वनि करीत त्या धनुष्याचे दोन तुकडे झाले. क्षत्रिय राजपुत्र रामानें शिवधनु मोडून क्षत्रिय वंशाचा अनेक वेळां नाश करणाऱ्या परशुरामाला जणुं आव्हानच दिलें.

### रामसीता-विवाह

जनकराजाची दुहेरी चिंता दूर झाली. अवजड असें शिवधनुष्य दिसण्यांत कोमल अशा रामानें मोडलें आणि रामासारख्या कुलशीलवानानेंच हें कृत्य केल्यामुळें योग्य जांवई त्याला लाभला. भूमिकन्या सीता जनकानें समारंभपूर्वक रामाला अर्पण केली. हा समारंभ त्यानें तेजस्वी कौशिक आणि अग्नि यांना साक्षी ठेऊन पार पाडला. लगेच त्यानें दशरथाकडे त्याला आणण्यासाठीं आपला पुरोहित पाठविला. दशरथ सुयोग्य सुनेच्या शोधांत असतांनाच त्याला ही शुभ वार्ता जनक पुरोहिताकडून कळली. पुण्यवान् माणसांचे मनोरथ हे कल्पवृक्षाच्या फळाप्रमाणें तत्काळ फळाला येणें स्वाभाविकच आहे.[३१]

सर्व सैन्यसंभारासहित दशरथ मिथिलेला येऊन थडकला. जनक-दशरथांनीं रामसीतेचा विवाहोत्सव आपल्या मोठेपणाला साजेल अशा थाटांत पार पाडला. या लग्नाबरोबरच लक्ष्मणाचा [illegible]शीं आणि भरत-शत्रुघ्नांचा कुशध्वजाच्या दोन कन्यकांशीं विवाह साजरा झाला.

---

३१. सद्य एक सुतां हि पच्यते कल्पवृक्षफलधर्मि कांक्षितम् ।

### भार्गवरामाचा पराभव

हे सगळे विवाहविधि उरकल्यावर दशरथराजा सर्व परिवारानिशीं अयोध्येला येण्याकरितां निघाला; परततांना सोसाट्याचें वादळ होऊन राजाचा ध्वज मोडून पडला; आणि त्या वाऱ्याचा राजसैन्यालाहि फार त्रास होऊं लागला. सूर्याभोंवतीं तेजाचें मोठें थोरलें खळें पडलें. तांबड्या धूसर ढगांनीं सगळ्या दिशा व्यापून गेल्या. सूर्याच्या दिशेनें भाल्र्ूंचा कर्णकर्कश भेसूर आवाज ऐकूं येऊं लागला.

हे अपशकून पाहून राजा वसिष्ठांकडे गेला आणि त्यानें त्यांना याचें कारण काय असावें, असें विचारलें. इतक्यांत सैनिकांचे डोळे दिपवून टाकणारी–एक तेजाकृति–समोर एक दिव्य पुरुष दिसायला लागला. त्या माणसाचा बाप ब्राह्मण असल्यानें त्याच्या अंगावर यज्ञोपवीत होतें. आणि क्षत्रिय मातेपासून तो झालेला असल्यानें त्याच्या खांद्यावर धनुष्य पण होतें. दशरथराजा मनांत घाबरून गेला. कारण ही मनुष्याकृति दुसरी कोणी नसून क्षत्रियांचा एकवीस वेळां पराभव करणारा तो परशुराम होता! दशरथराजा मोठ्या नम्रतेनें ‘ अर्घ्य, अर्घ्य ’ असे शरणागतीचे शब्द उच्चारीत त्याच्या पुढें आला. पण परशुरामानें त्याची उपेक्षा केली. आणि आपली रागीट आणि क्षत्रियविरोधी दृष्टि श्रीरामावर रोखली. राम त्यामुळें थोडासुद्धां डगमगला नाहीं. त्यामुळें भार्गवराम अधिकच चिडून युद्धाच्या पवित्र्यांत उभ्या राहिलेल्या निर्भय रामाला म्हणतो, “ तुम्ही क्षत्रिय लोक माझे नित्याचे वैरी आहांत. या क्षत्रिय जातीला मीं अनेक वेळां पराभूत केलें असूनहि पुन्हां तुझ्या पराक्रमाच्या रूपानें ती जाति अस्तित्वांत असल्याचें मला समजलें. म्हणून मी तुजवर रागावलों आहे. आजवर राम म्हटला म्हणजे मलाच सर्व जग ओळखी. आतां या राम नांवाला तूं प्रतिस्पर्धी उत्पन्न झालास. ही गोष्ट मला लाज असणारी आहे. म्हणून जोपावेतों तुझा पराभव केला नाहीं तोंपावेतों मला समाधान वाटणार नाहीं. शिवधनुष्य मोडल्यामुळें तूं चढून गेला असशील. पण तुला हें माहीत नसेल कीं, तें धनुष्य मागेंच विष्णूनें निर्वीय करून टाकलें होतें. म्हणून माझें तुला आव्हान आहे कीं, तूं या माझ्या धनुष्याला दोरी चढव आणि त्यावर बाण लावून दाखव. येवढं जरी कलेंस तरी मी तुझ्या हातून

जिंकला गेलों असल्याचें मान्य करीन ! नाहून तुझा पराभव अटळच आहे. जर हें तुला जमत नसेल आणि माझ्या परशूच्या तीक्ष्ण धारेमुळें तुझ्यांत भीति उत्पन्न झाली असेल तर निमूटपणें माझ्यापुढें हात जोडून अभय-याचना कर कसा ! " रामानें भार्गवरामाच्या आव्हानाचा किंचित् हंसून स्वीकार केला. त्याच्या धनुष्याला दोरी चढवून त्यावर बाण रोखण्यासाठीं तो पुढें सरसावला. क्षणार्धांत दोरी मोकळी सुटलेले भार्गवाच्या हातचें धनुष्य त्यानें सहज लीलेनें उचललें. त्याला दोरी चढविली. त्यासरशीं भार्गवराम निस्तेज पडला.

रामाचें तेज सूर्याप्रमाणें वाढत होतें. आणि सूर्यप्रकाशांतल्या चंद्राप्रमाणें भार्गवरामाचें तेज क्षीण होत होतें. रामानें धनुष्यावर बाण रोखून तो भार्गवाला म्हणाला, " परशुरामा, तूं माझ्यावर चालून येऊन वास्तविक माझी आगळीक केली आहेस. परंतु तूं ब्राह्मण असल्यानें या अपराधाची मी तुला क्षमा करतों. पण मीं एकदां रोखलेला बाण केव्हांहि परत घेत नसतों. तेव्हां मी या बाणानें तुझ्या मृत्युचा मार्ग रोखूं कीं स्वर्गाचा ? "

" रामा, तूं कोण आहेस, हें मी केव्हांच ओळखलें. तूं साक्षात् पुराण-पुरुष विष्णु आहेस. पण भूतलावर तुझें तेज कसें दिसतें, हें पहाण्यासाठीं मीं तुला मुद्दाम राग आणला. तुझ्या हातून झालेला माझा पराजय मला माझ्या जयासारखाच स्तुत्य आहे; तूं माझा स्वर्गाचा रस्ता रोखून धरला तरी चालेल. पुण्यतीर्थांतरें करीत आयुष्य घालविण्याचा माझा विचार आहे," भार्गवराम रामाला विनंतीपूर्वक म्हणाला.

राघवानें भार्गवाला ' बरें ' म्हटलें आणि भार्गवाच्या विनंतीप्रमाणें पूर्वेकडे बाण सोडून त्याची स्वर्ग लोकाची वाट कायमची बंद करून टाकली. परशुरामानें रामाची क्षमा मागून त्याच्या पायाला त्या तपोनिधीनें स्पर्श केला. सज्जन बळवंतांच्या हातून जिंकलेल्यांनीं, अशा बळवंतांपुढें पतकरलेली शरणागति ही कीर्तीलाच कारण होत असते. [३२]

---

३२. निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये ।

रामाला ‘ तुझा देवकार्य साधण्याचा मार्ग निर्विघ्न होवो ’ अशी वाणी उच्चारून भार्गव अंतर्धान पावला.

भार्गवराम अदृश्य झाल्यानंतर दशरथराजानें त्या विजयशाली मुलाला प्रेमानें कडकडून मिठी मारली. त्याच्या हृदयांतला दुःखाग्नि संतोषाच्या ओलाव्यानें शांत झाला. कांहीं दिवसांच्या प्रवासानंतर दशरथ हा आपल्या कौटुंबिक आणि शासकीय परिवारासह अयोध्येस येऊन पोहोंचला.

: ५ :

## प्रजावत्सल पुरुषोत्तम राम

* * * * * * * * * * *

### दशरथाचें दुःखद निधन

राजा दशरथ आतां म्हातारा झाला होता. त्याच्या म्हातारपणानें त्याच्या कानांत हळूंच एक कानगोष्ट केली—‘ राजा, आतां तूं रामाच्या स्वाधीन राज्यकारभार कर. ’ पण ही गोष्ट त्याला कैकेयीच्या कानीं जाऊं द्यायची नव्हती. कारण त्यामुळें मुलांत भांडणें उत्पन्न होतील, अशी त्याला भीति वाटली. रामराज्याभिषेकाच्या वार्तेनें सगळे नागरिक आनंदले. पण कैकेयीनें मात्र दशरथाजवळ आयत्या वेळीं वरमागणी करून त्याच्या दुःखाश्रूंनीं रामराज्याभिषेकाकरितां ठरविलेल्या उत्सवाचा विरस करून टाकला.

एका वरानें तिनें रामाला चौदा वर्षें वनवास घडविला, आणि दुसऱ्या वरानें तिनें स्वतःला वैधव्य देणारी राज्यलक्ष्मी भरतासाठीं मागून घेतली. रामानें वनवासांत जाण्याची पित्याची आज्ञा आनंदानें स्वीकारली. राज्याभिषेकाकरितां मौल्यवान वस्त्रें रामानें ज्या आनंदानें परिधान केलीं होतीं त्याच आनंदित मनानें तो वनवासासाठीं लागणारीं वल्कलें नेसला. पित्याचें वचन पूर्ण करण्यासाठीं लक्ष्मणसीतेसह रामानें दंडकारण्यांत प्रवेश करून त्यायोगें सत्पुरुषांच्या मनोमंदिरांत कायमचें वास्तव्य साधलें. राजा दशरथाला श्रावणाच्या पित्यानें दिलेला शाप आठवला आणि आतां, मरण अटळ आहे अशी खात्री पटल्यानें त्यानें शरीरत्याग केला.

## भरताचा राज्यकारभार

राजा मरण पावलेला, रामलक्ष्मण वनवासाला निघून गेलेले आणि भरत-शत्रुघ्न दूरदेशीं असलेले ही संधि कोसलवर स्वारी करण्यास चांगली आहे असें शत्रुंना वाटणें साहजिकच होतें. सचिवांच्या कानावर ही कुणकुण जातांक्षणीं त्यांनीं भरताला त्याच्या मामाच्या घरून त्वरित अयोध्येंत आणविलें. भरताला पित्याच्या मरणाची सगळी हकीकत समजून आल्यावर तो खूपच संतापला ! त्यानें नुसत्या आईचाच नव्हे तर राज्यलक्ष्मीचा पण त्याग केला. इतकेंच नव्हे तर रामाला वनवासांतून परत आणून राज्यावर बसविण्याच्या हेतूनें तो रामाचा माग काढीत दुःखित अंतःकरणानें बरोबर सैन्य घेऊन निघाला.

चित्रकूट पर्वतावर भरत रामाला भेटला. पित्याच्या मृत्यूची हकीकत त्यानें रामाच्या कानीं घातली आणि अयोध्येच्या राज्यसिंहासनाचा स्वीकार करण्याची त्याला विनंती केली. परंतु राम परतत नाहीं, हें निश्चित झाल्यावर त्यानें रामाजवळून त्याच्या पादुका मागून घेतल्या. रामाचा निरोप घेऊन तो परत फिरला खरा. पण तो राहिला मात्र अयोध्येबाहेर नंदीग्रामांत. आणि त्यानें राज्यकारभार हांकारला तोहि स्वतःचें राज्य म्हणून नव्हे तर रामाचा विश्वस्त म्हणून !

## पंचवटींत निवास

यापुढें चित्रकूटावर आपण राहिलों तर वरचेवर भरत आणि इतर अयोध्यावासी आपल्या भेटीस येत राहतील, या शंकेनें रामानें दक्षिण दिशेकडे प्रस्थान ठेवलें. वाटेंत त्याला विराध राक्षसानें अडविलें. एवढेंच करून तो थांबला नाहीं. दोघांच्या देखत तो सीतेला उचलून घेऊन पळूं लागला. तेव्हां रामलक्ष्मणानें त्याचा पाठलाग करून त्याला ठार केलें आणि त्याचें प्रेत भूमींत गाडून टाकलें. नंतर ते अगस्त्य मुनींच्या सूचनेवरून पंचवटींत वस्ती करून राहिले.

तेथें रावणाची धाकटी बहीण शूर्पणखा उपस्थित झाली. सीतेच्या समक्षच तिनें रामाला स्वतःचें कुलगोत्र सांगितलें आणि रामाची आपण पत्नी झालों असें सांगूनहि ती मोकळी झाली. तेव्हां राम तिला म्हणाला, " बाले

माझें लग्न झालें असल्यानें आतां माझी पत्नी होणें तुला शक्य नाहीं. तरी-पण माझ्या धाकट्या भावाकडे जा. ''

त्याप्रमाणें शूर्पणखा लक्ष्मणाकडे गेली. पण त्यानेंहि तिला थारा दिला नाहीं. म्हणून पुन्हां ती रामाकडेच परत आली. या शूर्पणखेच्या बालिश चाळ्यांकडे पाहून सीतेला हंसें आवरलें नाहीं. या तिच्या हंसण्यानें शूर्पणखा चिडली. तिनें मुद्दाम घेतलेलें मानवीरूप टाकून दिलें आणि मूळचें खरें राक्षसिणीचें स्वरूप धारण केलें. सीता त्या स्वरूपाला घाबरून गेली. लक्ष्मणाच्याहि दृष्टीला शूर्पणखेचा मायावीपणा आल्याविना राहिला नाहीं. त्यानें आपली तलवार उपसली. पर्णकुटींत जाऊन त्यानें तिचे नाककान कापलें आणि तिला विद्रूप करून टाकली. विद्रूप शूर्पणखा तशीच वर आकाशांत उडून गेली आणि तेथून तिनें रामलक्ष्मणाला मुठी वळून धमकावणी दिली. लगेच जनस्थानांत जाऊन रामाच्या हातून तिचा झालेला अपमान खरादि राक्षसांना तिनें सांगितला.

हें ऐकून राक्षसांच्या मोठ्या संख्येनिशीं खर-दूषण रामावर चालून आले. तरी पण राक्षसांच्या संख्येइतकीं रामाचीं रूपें त्यांना दिसलीं. रामचंद्रानें खरें, दूषण आणि त्रिशिरस् या राक्षससेनानींवर बाणांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. आणि थोड्याच वेळांत त्यांना यमाच्या घरीं पाठवून दिलें. इतर राक्षसांची पण रामबाणांनीं तीच दशा केली !

**सीताहरण**

खर-दूषणादि सर्व राक्षससैन्याचा रामानें संहार केल्याची वार्ता शूर्पणखेनें आपल्या भावाला—रावणाला—जाऊन सांगितली. रावणाला हा शूर्पणखेचा झालेला अपमान सहन झाला नाहीं.

सुवर्णकांति हरणाचें सोंग घेऊन त्यानें रामलक्ष्मणाला फसविलें. पर्ण-कुटीबाहेर बऱ्याच दूर अंतरावर ते गेले आहेत, ही संधि साधिली आणि सीतेला पळविली. सीतेला रावण घेऊन जाऊं लागला. तेव्हां जटायूनें त्याला अडविलें, पण त्याला घायाळ करून रावण पुढें निसटला.

पर्णकुटींत सीता नाहीं असें पाहून रामलक्ष्मण तिच्या शोधासाठीं निघाले. वाटेंत त्यांना जखमी जटायू भेटला. 'सीतेला रावणानें पळवून

नेतांना मीं समक्ष पाहिलें आहे, ' अशी महत्त्वाची वार्ता रामलक्ष्मणांना त्यानें सांगितली आणि मग सुखानें प्राण सोडला. त्यांना नंतर सुग्रीव भेटला. त्याच्याशीं त्यानें सख्य साधलें. त्याच्या इच्छेनुसार रामानें वालीचा वध केला आणि सुग्रीवाला राज्यावर बसविलें. सुग्रीवानें मग आपल्या हाताखालच्या सर्व वानरांना सीताशोधासाठीं सर्व दिशांकडे पाठविलें.

### सीतेचा शोध

संपातीकडून सीता लंकेमध्यें असल्याचें कळल्यावरून हनुमान—मारुती—समुद्र ओलांडून लंकेंत गेला. तेथें अशोकवनांत राक्षसिणींच्या पहाऱ्यांत खिन्न मनानें बसलेली सीता त्याला आढळून आली. मारुतीनें तिचें दर्शन घेऊन रामाची खुणेची आंगठी तिला दाखविली. सीतेनें ती आपल्या हृदयाशीं घट्ट धरली आणि तिला आपल्या अश्रूंनीं न्हाऊं घातलें. रामाचा निरोप मारुतीनें सीतेला सांगितला. त्याच्यानंतर त्यानें अशोकवनाची राखण करणाऱ्या अक्ष नांवाच्या राक्षसाला ठार मारला आणि लंकेचा बराचसा भाग जाळून टाकला. अखेर सीतेचा शोध लागल्यामुळें कृतकृत्य झालेला मारुती लंकेतून परत येऊन रामाला भेटला. सीतेची परत–भेट त्यानें रामाला दिली.

### लंकेवर स्वारी

रामानें वानरसैन्यानिशीं लंकेवर चालून जाण्याचें योजलें. त्यानें समुद्र-कांठीं सैन्याचा तळ टाकला. तेथें त्याची बिभीषणानें लंकेंतून येऊन भेट घेतली. रावणाला मारून लंकेचें राज्य बिभीषणाला देण्याचें आणि बिभीषणानें पण देतां येईल तें साहाय्य रामाला देण्याचें मान्य केलें. सहस्रों वानरांची शक्ति आणि युक्ति वापरून रामानें समुद्रावर मोठा पूल बांधला आणि त्या पुलावरून सगळी वानरसेना समुद्र पार करून त्यानें लंकेला वेढा घातला.

काकुत्स्थ राम आणि पौलस्त्य रावण यांच्या सैन्यांमध्यें भयंकर रणकदन झालें. रावणानें एक कपटी डाव टाकला. रामाचें म्हणून खोटेंच तुटलेलें शिर दाखविण्यांत आलें. त्यामुळें सीता प्राणत्याग करण्यास सिद्ध झाली; इतक्यांत

त्रिजटा नांवाच्या राक्षसीनें ती राक्षसी माया असल्याचें सीतेला समजावून सांगितलें. नंतर रावणानें एका प्रचंड शक्तीनें लक्ष्मणाला मूर्च्छित केलें. त्यामुळें राम अतिशय दुःखी झाला. मारुतीनें तेवढ्यांत वैद्याच्या सांगण्यावरून एक महौषधी आणली आणि तिच्यायोगें लक्ष्मणाला सावध केलें.

**रावण वध**

रावणसैन्याचें आधिपत्य पतकरून रावणाचा मुलगा मेघनाद रामसैन्यावर चालून आला. त्याला लक्ष्मणानें यमसदनास पाठविलें. मग कुंभकर्ण सेनानी बनून युद्धाला सरसावला. रामबाणांनीं त्याला कायमची झोंप घेण्याला भाग पाडलें ! तेव्हां मात्र रावणाचा राग अनावर झाला. 'आज पृथ्वी रावणरहित तरी होईल किंवा रामरहित तरी होईल,' या निर्धारानें तो रथांत बसून रणांगणाकडे निघाला. राम मात्र पायींच लढत होता. ही गोष्ट इंद्राच्या लक्षांत येतांच त्यानें लगेच स्वतःचा दिव्य रथ रामाकडे पाठवून दिला. इंद्र-कवच पण इंद्रसारथी मातलीनें रामाच्या अंगावर चढविलें. रामरावणाच्या द्वंद्वयुद्धास तोंड लागलें. संतापलेल्या रावणानें रामाच्या उजव्या दंडाचा वेध घेतला. उलट रामानें त्याच्या हृदयाचा ठाव घेऊन त्याचा पुरेपूर बदला घेतला. शब्दास प्रतिशब्द, अस्त्रावर दुसरें तोडीचें अस्त्र, असें दोघांमध्यें घनघोर युद्ध पेटलें होतें. जयश्रीलाहि संदेह वाटावा इतकी परस्परांची एकमेकांवर मात करण्याची चढाओढ लागली होती. दोघांनीं सोडलेल्या बाणांनीं सर्व वातावरण धुंद होऊन गेलें होतें. रावणानें रामावर एक गदा फेंकून मारली. रामानें मध्येंच ती गदा अर्धचंद्र बाणानें तोडून टाकली. रामानें शेवटीं अमोघ असें ब्रह्मास्त्र धनुष्यावर चढविलें जेव्हां तें आकाशांतून रावणाच्या रोखानें पुढें सरकत होतें, तेव्हां तें शंभर तेजस्वी मुखांनीं भीषण विष ओकीत धावणाऱ्या शेषनागाप्रमाणें भासत होतें. त्या मंत्रयुक्त ब्रह्मास्त्रानें रावणाचीं सगळीं शिरें क्षणार्धांत भूमीवर उतरविलीं. वर आकाशांतून देवांनीं रामावर पुष्पवृष्टि केली. मातलीनें रामाचा निरोप घेतला आणि रथ घेऊन तो स्वर्गलोकीं परत निघून गेला.

सीतेनें अग्निदिव्य केलें आणि स्वतःचें पावित्र्य सिद्ध करून दाखविलें. रामानें बिभीषणाला रावणाच्या जागीं लंकेच्या सिंहासनावर बसविलें. आणि

सुग्रीव, बिभीषण या सर्वांना घेऊन लक्ष्मण सीतेसह विमानांत बसून राम अयोध्येकडे निघाला. हें पुष्पक नांवाचें कुबेराचें विमान रावणानें कुबेराकडून हिरावून घेतलें होतें. आणि तो स्वतः त्याचा वापर करीत होता. रावण-वधानंतर तें विमान पुन्हा कुबेराचें कुबेराला देण्याच्या अगोदर त्याच्याच अनुज्ञेनें रामानें त्यांतून मित्र परिवारासह अयोध्येपावेतों शीघ्रगतीनें प्रवास केला.

**विमानांतून अयोध्येकडे परत**

पुष्पक नांवाच्या विमानांतून रामाचा प्रवास चालू होता. लंकेंतून अयोध्येकडे परत जातांना प्रथम त्यांना साहजिकच खालीं महासागर दिसला. तो पाहून राम सीतेला म्हणूं लागला, वैदेही, मलयपर्वतापर्यंत पसरलेला हा प्रचंड लाटांचा विशाल जलनिधि पहा. अशा या समुद्रांत मोठा थोरला पूल मीं तुझ्यासाठीं बांधविला आणि त्यावरून वानरांची विजयी सेना लंके-मध्यें आणून उतरविली. आमचे पूर्वज जे सगरपुत्र त्यांनीं हा समुद्र खूपच रुंदविला असल्यानें त्याविषयीं आम्हाला अधिक आपुलकी वाटते. सूर्यकिरण याच सागराचें पाणी शोषून वर त्यांचे ढग बनवितात. याच्याच पोटांतून रत्नांच्या राशीच्या राशी निपजतात. आल्हाददायक चंद्रमा हा याचेंच अपत्य असल्याचें लोक सांगतात. त्याचा व्याप, विविधता आणि खोलीं यांना मोजमाप किंवा मर्यादा अशी नाहींच. कल्पान्त झाला असतांना याच्याच जलाशयांत भगवान् विष्णु योगनिद्रा घेत पहुडतात. नद्यांच्या पाण्यांनीं याची सारखी भरती होत असते आणि मेघांच्या द्वारा हाहि नद्यांना सतत पाण्याचा पुरवठा करीत असतो.

बोलतां बोलतां सीते, हा रत्नाकर पार मागें पडला. अरण्यांनीं समृद्ध अशी ही भूमि समुद्रांतूनच जणुं बाहेर पडत असलेली आतां आपण पहातों ! आहोंत. या पुष्पकाची चाल कशी गमतीची आहे, लक्षांत आलें का तुझ्या. तें कधीं खूपच उंचावरून म्हणजे जणुं तें स्वर्गलोकांतूनच जातें आहे, तर क्षणार्धांत तें ढगांच्या गर्दींतून आपला रस्ता काढीत असतांना दिसतें आहे. इतक्यांत तें भूमीच्या इतकें जवळ जातें कीं, पक्षी उडणाऱ्या मार्गावरून त्याचा प्रवास चालू होतो. एकूण मनाच्या लहरीप्रमाणें या विमानाची गति चालू आहेसें दिसतें.

आतां हें जनस्थान ( कृष्णा–गोदावरी मधील प्रदेश ) दिसूं लागलें. राक्षसांचा त्रास कायमचा नाहींसा झाला असल्यानें फार दिवस ओसाड पडलेल्या या ठिकाणीं तापसांनीं नव्यानेंच उभारलेल्या झोपड्या दिसत आहेत. तुझ्या वियोगामुळें तुला शोधीत हिंडत असतांना तुझ्या पायांतला गळून पडलेला एक नूपुर याच जागीं मला आढळला.

हें दुसरें ठिकाण पहा. या ठिकाणच्या लतावेलींनीं आपल्या पल्लवांच्या खुणांनीं, ज्या रस्त्यानें तुला रावण पळवून नेत होता, तो रस्ता मला दाखविला. आपले डोळे दक्षिणेकडे फिरवून हरिणींनीं पण मलां येथेंच तुझ्या शोधाच्या खुणा सांगितल्या.

कृष्णाकांठालगतच्या मौल्यवान् पर्वताचें आकाशाला भिडलेलें हें शिखर आतां दृष्टीच्या टप्प्यांत आलें. ही जागा किती निसर्गरम्य आणि डोळ्यांना तोषविणारी आहे ! पण त्यावेळीं तेथला सुगंधी वायु, घनगर्जना, करीत किंवा मोरांच्या केका यांपैकीं कांहींहि माझ्या मनाला सुखदायक होण्या-ऐवजीं त्यांचा मला उलट तापच झाला होता.

दाट झाडींनीं झांकून गेल्यामुळें क्वचितच दृष्टीस पडणारें तें पंपा सरोवर दूर अंतरावरून आतां दिसूं लागलें होतें. फुलांच्या झुबक्यांनीं शोभिवंत असलेल्या अशोकाच्या फांदीला सीता समजून मी कवटाळण्याकरितां याच सरोवराच्या कांठीं धांवलों होतों ! लक्ष्मणानें मला त्यावेळीं ' ही लता आहे, सीता नव्हे ' असें सांगून भानावर आणलें.

हें गोदावरीचे तीर दिसूं लागलें. ही ती पहा पंचवटी. येथें तूं स्वतः पाणी घालून वाढविलेलीं आंब्याचीं झाडें आहेत. त्यांची आठवण होतांच मनाला आतांहि आनंद वाटतो. हा येथें असलेला अगस्त्य ऋषींचा आश्रम. शातकर्णी मुनींचें हें पचाप्सर नांवाचें क्रीडासरोवर. ही पलीकडे चारित्र्य-वान् अशा सुतीक्ष्ण नामक तपस्व्याची पर्णशाला. हें दिसतें तें शरभंग नांवाच्या मुनींचें तपोवन

हा पलीकडचा चित्रकूट माझी दृष्टि खेचून घेतो आहे. त्या पर्वताच्या शिखररूपी गळ्यांत मंदाकिनी नदी ही मुक्तावलीप्रमाणें शोभून दिसते आहे. हें शेजारींच दिसतें तें अत्रिऋषींचें वन. या आश्रमांत रानटी पशूहि नम्र होतात. येथल्या झाडांना फुलांशिवायच एकदम फळें येतात !

**गंगा-यमुना संगम**

"हे शोभने सीते, हा बघ गंगायमुनेच्या मनोहर संगमाचा देखावा. एके ठिकाणीं तो इंद्रनील मण्यांनीं गुंफलेल्या माळेसारखा भासतो. दुसरीकडे तो नीलकमलांचा हार असावा असा वाटतो. मध्येंच तेथें राजहंसांची रांगच्या रांग बसली असल्याचें दृश्य दिसूं लागतें. क्वचित् जागीं चांदण्याच्या ठिपक्यांचें प्रतिबिंब तरळत असल्याचें दृष्टीला दिसतें. हिंवाळ्यांतल्या मेघपंक्तींचें दर्शन त्यांत कोठें होतें. आणि कोठें करड्या रंगाच्या शरिरावर काळ्या सर्पाचें भूषण चढविलेल्या भस्मधारी शंकराची तर ती तनु नसेल ना, असें वाटल्यावांचून रहात नाहीं.

जानकी, ही निषादाधिपति गुहाची नगरी. त्या पलीकडे ही आपल्य परिचयाची अयोध्यापुरीच्या शेजारून वाहणारी शरयु नदी. या नदींत आपल्या अनेक पूर्वजांनीं अश्वमेध यज्ञाच्या समाप्तीनंतरचीं अवभृतस्नानें केल्यानें ती अतीव पुण्यपावन झालेली आहे. जन्मच्याजन्म तिच्या अंगाखांद्यावर खेळल्यामुळें आणि तिचें गोड पाणी नेहमीं पिऊनच आमची वाढ झालेली असल्यानें आम्हां उत्तर कोसलाधिपांची सर्वांचीच ती आई ठरते! ती आपल्या लाटांचे हात उंचावून मला भेटूं इच्छित आहे.

हा जो तांबूस वर्णाचा धुळीचा लोट भर आकाशांत उडतांना दिसतो तो कदाचित् भरताच्या सैन्याचा असावा. हनुमानानें अगोदरच आपल्या आगमनाची वार्ता भरताला कळविल्यामुळें तो सैन्यासह आपल्याला सामोरा येत आहेसें दिसतें. वसिष्ठांना पुढें घालून वल्कलें धारण केलेला भरत अमात्यांसह आपल्या स्वागतासाठीं पुढें येत आहे. तो मला माझी निर्दोष राखलेली राज्यलक्ष्मी परत देऊन आपली प्रतिज्ञा खात्रीनें पुरी करील."

इतकें बोलणें होत आहे तों रामाच्या इच्छेप्रमाणें विमान खालीं भूमीवर उतरलें. सर्व पौरवासी जनता त्या विमानाकडे कौतुकानें पहात होती. सुग्रीवाचा हात धरून राम विमानांतून बिभीषणानें दाखविलेल्या जिन्यानें खालीं उतरला. वसिष्ठ गुरूंना त्यानें प्रथम नमन केलें. नंतर भरतानें आणलेल्या अर्घ्यादिकांचा स्वीकार केल्यावर त्यानें भरताला मिठी मारली आणि त्यांचें मस्तक अवघ्राणलें.

मग रामानें सुग्रीवबिभीषणांची भरताला त्यांनीं बजावलेल्या कर्तव्याची ओळख करून दिली. भरतानें नंतर त्यांनीं वंदन केलें. भरतानें लक्ष्मणाला खालीं वाकून नम्रभावानें नमन केलें असतांना लक्ष्मणानें त्याला वर उठविलें आणि आपल्या हृदयाशीं घट्ट धरून त्याला गाढ आलिंगन दिलें.

**अयोध्येच्या दिशेनें**

यापुढें मिरवणुकीनें ही सगळी मंडळी निघाली. वानरसेनापति सुग्रीव अंगद वगैरेंची पर्वतावर सहजपणें चढण्याची संवय ध्यानीं घेऊन, रामानें त्यांना गजरूपी पर्वतावर बसण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें गजारूढ वानर सर्वांपुढें चालले होते. त्यांमागून बिभीषणादींचे सुशोभित रथ चालूं लागले. त्यामागून इच्छेप्रमाणें संचार करणारे पुष्पक विमान राम-लक्ष्मण-भरताला घेऊन, अगदीं सावकाश आणि भुइलगत होऊन जात होतें. सीतामाई विमानांतच होती. तिला भरतानें लगेच वंदन केलें आणि मग तो रामाच्या बाजूस येऊन बसला. सीतादेवीच्या पायांवर जटाधारी भरताचें मस्तक वंदनासाठीं जेव्हां टेकलें तेव्हां पतिव्रतेचे चरण आणि भावाच्या अनन्य-भक्ताचें मस्तक अशा उभयतांनीं एकमेकांना पावन केलें.अशा रीतीनें ही राजे-शाही मिरवणूक अर्धा कोस चालून गेल्यावर एका उपवनांत येऊन पोहोंचली. शत्रुघ्नानें विस्तीर्ण तंबू तेथें उभारला होता.तेव्हां तेथेंच सर्वांचा मुक्काम झाला.

**रामाला राज्याभिषेक**

रामलक्ष्मणांनीं नंतर मातांची वंदनपूर्वक भेट घेतली. सीतेनें पण त्यांना नमस्कार केला. मातांनीं आपल्या डोळ्यांतल्या आनंदाश्रूंनीं पार पाडलेला रामाचा अपुरा राज्याभिषेक मंत्र्यांनीं पुण्यतीर्थांनीं उपवनांतच पार पाडला.

राज्याभिषेकानंतर वाद्यांच्या गजरांत पौरजन, मंत्री, त्यांच्यासह मोठ्या समारंभानें रामानें राजधानींत ससैन्य प्रवेश केला. लक्ष्मण शत्रुघ्न त्यावर चवऱ्या ढाळीत होते. भरतानें छत्र धरण्याचें काम केलें. साध्वांनीं सुंदर पोशाख चढविलेली सीता पालखींत बसून चालली होती. आपल्या घराच्या खिडक्यांतून सीतेला न्याहाळीत असलेल्या नागरी स्त्रिया मोठ्या प्रेमानें हात जोडून नमस्कार करीत होत्या. नंतर रामानें पत्नीसह मंगल वस्तूंनीं संपन्न असलेल्या पित्याच्या राजवाड्यांत प्रवेश केला. तेथें गेल्यावर

रामानें प्रथम कैकेयीची गांठ घेतली. ‘ तुझ्यामुळेंच दशरथाला सत्यव्रताचें पालन करतां आलें. म्हणून आम्हांला वनवासाला पाठविल्याबद्दल तुला कांहीं वाईट वाटायला नको,’ असें बोलून त्यानें शरमलेल्या कैकेयीची समजूत काढली.

राज्याभिषेकाचा आणि नगरप्रवेशाचा समारंभ संपल्यानंतर मग रामानें तपोधन मुनींची, तसेंच राक्षस आणि वानर यांच्या नायकांची उत्तम प्रकारें संभावना करून त्यांना निरोप दिला. रावणाकडून हिरावून घेतलेल्या पुष्पक विमानाची सुद्धां त्यानें कुबेराकडे पाठवणी केली. प्रजेविषयीं, मातांविषयीं, बांधवांविषयीं आणि शत्रूंविषयीं आपलीं जीं जीं कर्तव्यें होतीं, तीं तीं रामानें मोठ्या चतुराईनें पार पाडलीं. त्याच्या राज्यांत जनता धनिक, धार्मिक, सुखी आणि आपल्या कामांत दक्ष असे. अशा रीतीनें कांहीं काल लोटला. मध्यंतरींच्या काळांत सीता गरोदर राहिली

तें समजल्यावर रामाला आनंद वाटला. रामाजवळ तिनें आपले डोहाळे सांगितले. ती म्हणाली, “ गंगातीरावरील तपोवनांत जाऊन रहावेंसें वाटतें आहे मला. ” रामानें पण तिची इच्छा लवकरच पुरी करीन, असें तिला आश्वासन दिलें.

एकदां राम आपल्या राजवाड्याच्या उंचांतल्या उंच जागीं जाऊन बसला. आणि तेथून त्यानें सगळी अयोध्यापुरी न्याहाळिली आणि मग तेथें जमलेल्या हेरांपैकीं भद्र नांवाच्या हेराला, आपल्याविषयीं लोक काय काय बोलत असतात म्हणून विचारलें. तेव्हां त्यानें सगळे नगरवासी त्याच्या वर्तनाची स्तुति करीत असल्याचें सांगितलें. पण ‘ राक्षसाच्या घरीं बराच काल राहिलेल्या सीतेला रामानें कशी स्वीकारली, याबद्दल मात्र कांहीं जण शंका घेतात,’ असेंहि तो म्हणाला.

याप्रमाणें जनतेनें सच्चरित सीतेची निंदा करावी; आणि त्यायोगें स्वतःच्या वर्तनावरहि शिंतोडे उडविले जावेत, या गोष्टीचा फार मोठा आघात रामाच्या मनावर झाला. क्षणभर त्याला वाटलें कीं, या लोकनिंदेकडे लक्ष देऊं नये. पुन्हां त्याच्या मनाला विचार चाटून गेला कीं, जरी सीता ही दोषरहित असली तरी लोकापवादासाठीं तिला टाकून द्यावी. पण त्याचा कोणताच ठाम निश्चय होईना. त्याचें मन झोंपाळ्याप्रमाणें सारखें हेलकावे खात होतें ! शेवटीं लोकांनीं घेतलेला अपवाद हा सीतेचा त्याग

करूनच धुऊन टाकावा, असा त्यानें मनाशीं पक्का निर्धार केला. साहजिकच आहे यश हेंच ज्यांचें सर्वस्व असतें अशांना आपल्या शरीरापेक्षां यशाच मोठें वाटतें. मग शरीराच्या मानानें क्षुल्लक असलेल्या विषयांपेक्षां तें श्रेष्ठ वाटत असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.[३३]

### रामाचा निष्ठुर निश्चय

खिन्न झालेल्या रामानें आपल्या धाकट्या भावांना एके ठिकाणीं बोलाविलें. त्यांच्या कानांवर स्वतःची होत असलेली लोकनिंदा घातली. नंतर त्यांना तो म्हणाला, " हा लोकापवाद पाण्यावरल्या तेलाच्या ठिपक्याप्रमाणें हळूहळू सगळीकडे पसरेल.

तसा तो पसरण्याआधींच त्याला आवर घातला पाहिजे. आपल्या पवित्र कुलाला, सदाचारी परंपरेला या निंदेनें काळिमा फासला आहे ! म्हणून मी आतांच सीतेचा त्याग करण्याचें योजीत आहें. वास्तविक सीता ही साध्वी पवित्र असल्याची माझी खात्री आहे; पण त्यापेक्षांहि लोकापवादाला मी जास्त मानतों. तुमच्याहि मनांत निष्पाप सीतेविषयीं करुणा वाटत असल्याची मला जाणीव आहे. तरी पण तुम्ही माझ्या या ठरविलेल्या मार्गांत मोडता घालूं नका. "

रामाच्या या निष्ठुर निश्चयाविरुद्ध मत देण्यास जरी कोणी धजलें नसलें तरी पण त्यांनीं कोणी आपली अनुकूलताहि त्याला दर्शविली नाहीं. नंतर तिन्ही लोकांत कीर्ति पसरलेला यथार्थभाषी राम लक्ष्मणाकडे वळून त्याला म्हणाला," सौम्य डोहाळे लागलेल्या तुझ्या भावजयीला तपोवनांत राहण्याची इच्छा झाली आहे; म्हणून तें निमित्त तिला सांग आणि तिला त्याप्रमाणें वाल्मीकींच्या आश्रमांत सोडून परत निघून ये. "

### सीतात्याग व तिचा निरोप

लक्ष्मणानें थोरल्या भावाची ही कठोर आज्ञा मोठ्या कष्टानें मान्य केली. वडिलधाऱ्या लोकांच्या आज्ञेवर विचार न करतां ती पाळायची असते.[३४]

---

३३. अपि स्वदेहात् किमुतेंद्रियाऽर्थात् यशोधनानां हि यशो गरीयः ।
३४. आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया।

सीतेकडे जाऊन तिच्या कानावर ही गोष्ट लक्ष्मणानें घातली आणि त्याप्रमाणें तिला रथांत बसवून तपोवनाच्या दिशेनें तो निघाला. सुंदर मनोहर प्रदेशांतून प्रवास करीत असलेल्या सीतेला, ‘ माझा प्रिय पति माझ्या मनाप्रमाणें मला तपोवनांत पाठवीत आहे ’ असें वाटून ती आनंदित झाली होती. आपल्याशीं तो वेगळा डाव खेळून आपल्याला फसवीत असल्याचें साध्वी, निष्पाप, निरागस सीतेच्या अर्थातच लक्षांत आलें नाहीं. लक्ष्मणानेंहि या प्रसंगाच्या पोटांतला खरा भाव तिला समजूं देण्याचें टाळलें.

वाटेनें जात असतां तिचा डावा डोळा स्फुरूं लागल्यामुळें कांहींतरी अशुभ घडत असल्याचें तिच्या तात्काळ ध्यानीं आलें. म्हणून तिनें रामराजा सर्व भावंडासह सुखी असो, अशी अंतःकरणपूर्वक इच्छा व्यक्तविली. ठरलेल्या जागीं रथ जाऊन थडकला. त्यांतून सीतेसह लक्ष्मण खालीं वाळवंटांत उतरला आणि निषादानें आणलेल्या छानशा नावेंत बसून तो गंगापार झाला.

नंतर कंठ दाटून आलेला लक्ष्मण मोठ्या प्रयासानें सीतेला रामानें केलेली कठोर आज्ञा सांगता झाला, तेव्हां ध्यानीं मनींहि नसलेली ही भयानक आपत्ति आपल्यावर कोसळत असलेली ऐकून सीता धाडदिशी भूमीवर एकदम मूर्च्छित होऊन पडली. थोड्या वेळानें ती सावध झाली. अतीव दुःखामुळें तिच्या तोंडांतून शब्द उमटेना. अशाहि अवस्थेत त्या पतिव्रतेच्या तोंडून पतीला उद्देशून एकहि वावगा शब्द बाहेर पडला नाहीं. मात्र ती स्वतःचीच वारंवार निंदा करूं लागली.

लक्ष्मण त्या सती सीतेचें सांत्वन करीत तिला म्हणाला, “ माझ्या हातून वडील भावाच्या आज्ञेमुळें हें कठोर वर्तन घडलें आहे. हे देवी, त्याबद्दल तूं मला क्षमा कर. ” एवढेंच बोलून तो तिच्यापुढें खालीं मान करून निमूटपणें उभा राहिला. त्यावर सीता त्याला म्हणाली, “ हे सात्त्विका, मी तुझ्यावर प्रसन्न आहें. तूं चिरंजीव हो, तूं सर्वस्वीं आपल्या वडील भावावर अवलंबून असल्याची मला चांगली कल्पना आहे. घरीं गेल्याबरोबर माझा माझ्या सास्वांना नमस्कार सांग आणि त्यांना विनंती कर कीं, माझ्या गर्भांत वाढत असलेल्या संतानाचें कल्याण तुम्ही चिंता. ”

" तसेंच अयोध्येच्या राजाला माझा असा निरोप सांग कीं, सर्वां-समक्ष अग्निदिव्य करून मी पवित्र असल्याची खात्री पटविली असतांनाहि मला लोकापवादाच्या नांवाखालीं तूं टाकून दिलेंस, हें तुझ्या कुळाला किंवा विद्वत्तेला शोभलें का ? प्रजेचें नेहमीं कल्याण व्हावें, अशी तुझी मनो-धारणा आहे, हें मला ठाऊक आहे. तरीपण तूं मला आतां केवळ लहरी-खातर टाकून देत आहेस, याविषयीं मला थोडी सुद्धां शंका नाहीं. कदाचित् माझ्या पूर्वजन्मींच्या पापांचा हा अटळ परिणाम असेल; अथवा राजलक्ष्मीला लाथाडून तूं माझ्याबरोबर वनवासाला गेला होतास, त्याचा सूड म्हणून त्याच राजलक्ष्मीनें मला आतां राज्यांतून बाहेर हांकललें असेल ! जर माझ्या पोटांत रक्षणीय असें गर्भतेज नसतें तर तुझ्या कायमच्या होत असलेल्या विरहामुळें तुच्छ झालेलें हें जीवित मी केव्हांच संपवून टाकलें असतें. प्रसूत झाल्यानंतरहि मी सूर्याकडे दृष्टि लावून तपस्या करण्याचा यत्न करीन. कारण पुढच्या जन्मांतहि तूंच मला पति लाभावास; तुझा वियोग केव्हांहि होऊं नये, अशी माझी तीव्र इच्छा आहे. वर्णधर्मांचें रक्षण करणें, हा मनूनें सांगितलेला सनातन राजधर्म आहे. म्हणून तूं मला पत्नी म्हणून जरी टाकली असलीस तरी सामान्य तपस्विनी म्हणून माझें रक्षण करणें तुझें कर्तव्य आहे. "

**वाल्मीकींच्या पर्णकुटींत**

" बरें आहे, " असें म्हणून लक्ष्मणानें अखेर सीतेचा निरोप घेतला. तो दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेला मात्र, तोंच सीतासाध्वी दुःखातिशयानें पुनः मोठ्यानें रडूं लागली. त्या शोकाचा परिणाम असा झाला कीं, मोरांनीं आपलें नाचणें थांबविलें, वृक्षांना फुलांचा भारहि सहन न झाल्यानें त्यांनीं फुलांचा सडा भूमिवर टाकला. हरिणींना गवत खाणेंहि सुचेनासें झालें.

आसपास वनांत दर्भसमिधा गोळा करण्यास हिंडत असलेल्या वाल्मीकींच्या कानावर सीतेचें करुण क्रंदन पडलें. तेव्हां ते रडण्याचा माग काढीत सीतेपाशीं जाऊन पोहोंचले. तिनें लगेच आपलें रडणें थांबविलें; डोळ्याचें पाणी पुसलें आणि स्वतःला नीट सांवरून मुनींना तिनें वंदन केलें. मुनींनीं तिला " पुत्रवती भव, " असा आशीर्वाद देऊन म्हटलें, " खोट्या

लोकापवादापायीं तुझ्यावर रागावून पतीनें तुला रानांत टाकून दिली, हें मला अंतर्ज्ञानानें समजलें आहे. हे वैदेही, तूं या तपोवनांत जी आली आहेस ती आपल्या पित्याच्याच घरीं आली आहेस, असें समज. आपल्या स्वतःच्या घरीं आलेली असल्यानें तूं मुळींच कष्टी होऊं नकोस. रामाचे सगळे गुण मी जाणतों. पण तो तुझ्याशीं मात्र न्याय सोडून वागला आहे. यासाठीं माझा त्याच्यावर फार राग आहे. सीते, या तपोवनांत तूं निर्भय मनानें रहा. तुझ्या भावी संतानाचे सगळे संस्कार या तपस्व्याच्या झोपडींत चांगल्या रीतीनें होतील, याबद्दल तुला मुळींच काळजी नको. ''

मग त्या दयाशील अंतःकरणाच्या वाल्मीकींनीं सीतेला आपल्या आश्रमांत नेलें आणि तेथील तापसींना तिची सेवाशुश्रूषा करण्यासाठीं सांगितलें.

लक्ष्मणानें अयोध्येस परतल्यावर झालेली सगळी हकीकत आणि सीतेचा निरोपहि रामाला सांगितला. रामाला पण सीताविरहाचें दुःख सहन झालें नाहीं. त्याच्या डोळ्यांतून नकळत अश्रूंचा पूर लोटला. हें असें होणें अगदीं साहजिकहि होतें. कारण त्यानें सीतेला जी घराबाहेर लोटली ती मनापासून नव्हती, तर लोकापवादाच्या भीतीनें. पण मग रामानें विचारपूर्वक आपला पत्नीवियोगाचा शोक आवरता घेतला. आणि जणुं कांहीं घडलेंच नाहीं, असें भासवून तो राज्यशकट हांकारूं लागला. रामानें सीतेला रानांत टाकली खरी; पण दुसऱ्या स्त्रीशीं लग्न करण्याचें त्याच्या मनांत देखील आलें नाहीं. यज्ञासारख्या प्रसंगीं जेव्हां पत्नी जवळ असावी लागते, अशा वेळीं पत्नीची सुवर्णमयी मूर्ति शेजारीं बसवून यज्ञादि क्रिया राम पार पाडूं लागला. या गोष्टी सीतेच्याहि कानावर गेल्या. त्यामुळें पतिवियोगाचें दुःखहि तिला सह्य झालें.

**लवणासुराचा वध**

पत्नीचा परित्याग केलेला पृथ्वीपति राम समुद्रांनीं वेढलेल्या सगळ्या पृथ्वीचें राज्य करीत असतांना यमुनेच्या कांठीं रहाणारे कांहीं मुनिजन त्याच्याकडे आले. त्यांनीं लवण राक्षस यज्ञविध्वंस करीत असल्याची तक्रार रामाकडे आणली होती. रामराजानें 'विष्णु भूतलावर जो अवतार

घेतो तो धर्म रक्षणासाठींच घेतो '* असें म्हणून यज्ञरक्षणाचें त्यांना अभिवचन दिलें. त्यांनीं जातांना माहिती म्हणून रामाला सांगून ठेविलें कीं, लवणासुर हा जेव्हां शूलविरहित असेल, तेव्हांच तो जिंकला जाणें शक्य आहे.

लवणासुराचा मोड करण्याचें काम रामानें शत्रुघ्नावर सोंपविलें. त्याप्रमाणें बरोबर मोठें सैन्य घेऊन दाशरथी शत्रुघ्न फुलांनीं डंवरलेली आणि सुगंधानें दरवळलेली वनस्थळी पहात पहात चालला. मुनींनीं दाखविलेल्या रस्त्यानें जात असतांना वाटेंत वाल्मीकि ऋषींच्या आश्रमांत त्याचें एक दिवस राहणें झालें. त्याच रात्रीं सीतेनें दोन जुळ्या मुलांना जन्म दिला. तें समजल्यामुळें मनांतल्या मनांत आनंदित झालेला लक्ष्मणाचा भाऊ वाल्मीकींचा निरोप घेऊन पुढें निघाला. लवकरच तो मधुपघ्न नांवाच्या लवणाच्या नगरीला येऊन पोहोंचला. तोंच त्याला शिकारीहून परत येत असलेला लवण राक्षस दिसला. त्याच्या खांद्यावर त्यानें ठार मारलेल्या, त्यानें केलेल्या प्राण्यांची शिकार होती; परंतु त्या वेळीं त्याच्या हातीं शूल नव्हता. ही संधि उत्तम आहे असें समजून शत्रुघ्नानें त्याला लगेच तेथेंच अडविलें.

"वा छान! आज मी उपाशी असलेला पाहून देवानें तुझी माझ्या भोजनासाठीं पाठवणी केलेली दिसते," असें लक्ष्मणानुजाला धमकावून लवणानें एक भलें मोठें झाड मुळासकट उपटलें आणि तें घेऊन तो आपल्या शत्रूच्या अंगावर धांवला. सौमित्रानें तो वृक्ष स्वतःजवळ येऊन पोहोंचण्याच्या आंतच मध्येंच त्याचे तीक्ष्ण बाणानें तुकडे केले. राक्षसानें मग शत्रुघ्नावर मोठाले दगड फेकले. पण शत्रुघ्नानें एका विशेष अस्त्रानें त्या शिळांचें पीठ करून टाकलें. तेव्हां लवणासुर त्याच्यावर उजवा हात उगारून धांवला. शत्रुघ्नानें एका प्रबल बाणानें लवणाची छाती फोडून त्याला भूमीवर पाडलें आणि यज्ञाचें विघ्न पण त्याचबरोबर भुईसपाट होऊन नाहींसें झालें! लवणाच्या प्रेतावर आकाशांतून कावळ्याच्या टोळ्यांनीं धाड घातली; तर शत्रुघ्नाच्या मस्तकावर पुष्पांची दिव्य वृष्टि होऊं लागली.

---

३५. धर्मसंरक्षणार्थैव प्रवृत्तिः भुवि शार्ङ्गिणः ।

कृतकृत्य झालेल्या शत्रुघ्नाची जेव्हां मुनिजनांनीं स्तुति केली, तेव्हां त्याचें मस्तक विनयानें नम्र झालें. पराक्रमी, संयमी आणि देखण्या शत्रुघ्नानें पुढें कांहीं दिवस कालिंदीच्या कांठीं वस्ती केली. या काळांत त्यानें मधुरा नांवाची नगरी वसविली. नंतर तो अयोध्येला परत आला.

इकडे तपोवनामध्यें वाल्मीकींनीं सीतारामाच्या दोघाहि मुलांवर शास्त्राला अनुसरून संस्कार केले. कुश आणि लव अशींच त्यांचीं त्यांनीं नांवें ठेविलीं. मुलें थोडीं मोठीं झाल्यावर वाल्मीकींनीं त्यांना अगदीं नवीन पद्धतीनें रचलेलें ' रामायण ' काव्य गावयास शिकविलें. ते दोघे मुलगे या गोड रामकथेचें गायन मधुर सुरांत आपल्या आईपुढें करीत असत. त्यामुळें तिचें विरहदुःख थोडथोडें कमी होत गेलें.

**शंबुकाचा वध**

एकदां एक खेडूत ब्राह्मण आपल्या अल्पवयी मुलाचें शव घेऊन रामाच्या राजद्वारीं आला. मुलाच्या मरणा विषयींसारखा शोक करीत तो म्हणूं लागला, " पृथ्वीच्या पाठीवर अन्यायाचा प्रतिकार करणारा दशरथानंतर दुसरा कोणी राजा झालाच नाहीं कां ? " हा त्या शोकाकुल द्विजाचा बोचणारा प्रश्न ऐकून राम शरमला. कारण इक्ष्वाकूंच्या कारकीर्दींत पूर्वीं कधींहि अकालीं मृत्यु झाले नव्हते.

रामानें त्याला थोडा धीर धरायला सांगितलें आणि तो स्वतः विमानांत बसून यमाला जिंकण्यासाठीं हातीं शस्त्र घेऊन निघाला. परंतु वाटेंतच त्याला एका दिव्य वाणीनें सांगितलें कीं, " रामा तुझ्या राज्यांत कोठेंतरी अनाचार घडत आहे, तो तूं शोधून काढ म्हणजे तुझी चिंता दूर होईल " या अज्ञातवाणीवर विश्वासून राम सगळीकडे शोध करीत हिंडूं लागला तों एका झाडाच्या फांदीवर स्वतःला उलटें टांगून तपस्या करीत असलेला शंबुक नांवाचा अनाचारी त्याला आढळून आला. देवपदाचा लाभ व्हावा म्हणून तो हें अवघड तप स्वतःच्या अंगीं तपस्येची पात्रता नसतांनाहि करीत होता. पण त्यामुळें त्याच्यावर असलेल्या कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदारीकडे त्याचें दुर्लक्ष झालें होतें. रामानें या त्याच्या कर्तव्य-पालनांत चुकारपणा करण्याच्या अपराधाबद्दल त्याचा शिरच्छेद केला.

ब्राह्मण पुत्राचा अकालीं गेलेला प्राण परत येऊन तो जिवंत झाल्यामुळें ब्राह्मणाला झालेला आनंद त्यानें आशीर्वाद रूपानें रामाजवळ व्यक्तविला.

**रामाचा अश्वमेध यज्ञ**

रामाच्या मनांत एकदां अश्वमेध करण्याचें आलें. म्हणून त्यानें पृथ्वी-संचारासाठीं घोडा मोकळा सोडला. इकडे रामावर राक्षसांच्या, वानरांच्या आणि मानवांच्या अशा सर्व नायकांनीं देणग्यांचा नुसता पाऊस पाडला. स्वर्गांतून आणि भूलोकांतून निमंत्रिलेले ऋषि-मुनि अयोध्येंत यज्ञाकरितां एकत्र झाले. जमलेल्या पाहुण्यांसाठीं अयोध्येबाहेरहि उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. अश्वमेध यज्ञाचा यजमान राम हा यज्ञशाळेलगतच्या एका उपशाळेंत व्रतस्थ राहिला होता. त्या वेळीं त्यानें आपल्या पत्नीची-सीतेची-सोन्याची मूर्ति करून जवळ ठेवली होती.

नंतर शास्त्रांत सांगितलेल्या सर्व तपशिलानिशी तो महान् यज्ञ सुरू झाला. रामाला कोणी शत्रु असा उरला नसल्यानें त्याचे पूर्वींचे विरोधक जे राक्षस तेच मुळीं त्याच्या यज्ञाचे रक्षक बनले होते.

या प्रसंगाचा लाभ घेण्यासाठीं वाल्मीकींनीं आपले प्रिय शिष्य कुश-लव यांना बुद्धिपुरस्सर अयोध्या नगरींत पाठवून दिलें. गुरूनीं सांगितल्या-प्रमाणें वाल्मीकींनींच प्रथम रचलेल्या रामचरित्राचें गोड गायन करीत राजधानीच्या चौकाचौकांतून ते दोघे रामतनय हिंडत होते. रामासारख्या तेजस्वी राजपुरुषाचें उज्ज्वल चरित्र; आणि आद्यकवी वाल्मीकीसारख्या तपस्व्यानें त्याची रचना केलेली. अशी ती लोकप्रिय रामकथा आणि किन्नरासारखा मधुर आवाज असलेले लवकुश गायक तें मनापासून गात होते. तें असें रामचरित्र ऐकून कोणाचें बरें मन आकर्षिलें जाणार नाहीं !

ज्यांनीं ही रामचरित्र-कथा लवकुशांच्या तोंडून समक्ष ऐकली होती अशा जाणत्यांनीं हें वृत्त रामाच्या कानीं घातलें. रामाच्या आणि त्याच्या भावांच्याहि मनांत त्यामुळें कुतुहल उत्पन्न झालें. रामानें लगेच त्या दोघां मुनिशिष्यांना आपल्याकडे बोलावून घेऊन त्यांच्या तोंडून तें समग्र आत्मचरित्र सगळ्यांच्या मेळाव्यांत बसून एकचित्तानें ऐकलें. कुश-लवांचें रामकथागायन चालू अस-तांना सगळी सभा तल्लीन होऊन गेली होती; आणि पुतळ्याप्रमाणें स्तब्ध होऊन नकळत आनंदानें अश्रू गाळीत कथेचें श्रवण करीत होती.

लव–कुश आणि राम यांचीं वयें आणि वेष यांच्या बाबतींतच काय तो लोकांना फरक दिसला. बाकी त्या बालकांचें स्वरूप अगदीं रामाप्रमाणेंच हुबेहूब असल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. सगळे प्रेक्षक श्रोते त्यामुळें आश्चर्यचकित झाले. रामहि ह्या मुलांना पाहून पराकाष्ठेचा संतोषला आणि त्याचें त्यांना त्यांच्या गायनकलेंतील नैपुण्याबद्दल बक्षिसहि देऊं केलें. पण त्या निःस्पृह मुलांनीं त्यांचा स्वीकार केला नाहीं. यामुळें लोकांच्या विस्मयांत अधिकच भर पडली.

नंतर रामानें त्या तापसी बालकांजवळ चौकशी केली कीं, 'हें चरित्रगान तुम्ही कोणापासून शिकलां? या कथेची रचना कोणाची आहे?' तेव्हां त्यांनीं वाल्मीकीचें नांव रामाला सांगितलें.

**सीतेला भूमीनें पोटांत घेतलें.**

तेव्हां राम भावांसह तडक वाल्मीकींकडे त्यांच्या आश्रमांत गेला आणि त्यानें आपलें सगळें राज्य त्या मुनीला देऊन टाकलें. तो दयाळु अंतःकरणाचा थोर कवि वाल्मीकि रामाला म्हणाला, "रामा, हे दोघे सीतेच्या उदरीं जन्मलेले तुझेच मुलगे आहेत. तूं मला राज्य देण्याऐवजीं तूंच सीतेचा स्वीकार करावा, अशी मी तुझ्यापाशीं मागणी करतों." तेव्हां रामानें त्या कविमुनीला उत्तर दिलें, "हे तात, तुमची सून जी ही सीता ती वास्तविक आमच्या समक्ष अग्नींत मागेंच शुद्ध झालेली आहे. पण या गोष्टीवर कांहीं अयोध्यावासी नागरिकांचा विश्वास बसला नाहीं. म्हणून माझें असें म्हणणें आहे कीं, सीतेनें स्वतःच्या शुद्ध चारित्र्याची माझ्या प्रजाजनांना पुन्हां खात्री पटवून द्यावी म्हणजे मग तुमच्या आज्ञेनें मोठ्या आनंदानें मी तिचा स्वीकार करीन."

रामानें असें आश्वासन दिल्यावर वाल्मीकि ऋषींनीं आपल्या शिष्याकरवीं सीतेला आश्रमांतून अयोध्येला आणविलें. आणि दुसऱ्या दिवशीं रामानें सगळे नागरिक एके ठिकाणीं जमविले. सीतेला शुद्धीकरितां तेथें घेऊन येण्याविषयीं वाल्मीकींना त्यांनीं विनविलें. आपले दोघे शिष्यकुमार आणि सीता यांना घेऊन वाल्मीकि पौरजनांच्या मेळाव्यांत उपस्थित झाले.

सीतेनें त्या वेळीं लाल रंगाचें वस्त्र परिधान केलें होतें. ती आपल्या पायांकडे दृष्टि लावून शांतमनानें उभी होती. तिच्या शरीरावर तपस्विनीचें तेज

तळपत होतें. यावरून ती शुद्ध, पवित्र असल्याची कोणालाहि खात्री वाटत होती. जमलेले लोक मनांत शरमले आणि विरमलेहि. त्या सर्वांनीं लज्जेनें आपल्या माना खालीं घातल्या. कारण त्या तिच्या तेजाकडे तोंड वर करून बघण्यालाहि कोणी धजत नव्हतें.

नंतर आसनावर बसलेल्या वाल्मीकि मुनींनीं सीतेला म्हटलें, " वत्से सीते, येथें जमलेल्या लोकांच्या डोळ्यांदेखत स्वतःच्या शुद्धचारित्र्याविषयींचा त्यांचा संशय दूर कर. " हें बोलणें ऐकतांक्षणीं सीतेनें पुण्यतीर्थाचें प्राशन केलें आणि सत्यवाणीनें ती उद्गारली, " देवी भूमाते, शरीर, वाणी आणि मन या साधनांनीं माझ्या हातून पतिव्रताधर्माला मारक असा दुराचार जर घडला नसेल तर तूं मला तुझ्या उदरांत जागा दे. " हे शब्द पुरे होतात न होतात तोंच सीतेच्या जवळची भूमी दुभंगली. त्या भूमींत एक विवर निर्माण झालें. त्यांतून एक तेजःपुंज ज्योति बाहेर पडली. त्यांतून नागफणीचें छत्र असलेली आणि समुद्राचा कमरपट्टा नेसलेली साक्षात् वसुंधराच प्रकट झाली. रामावर दृष्टि खिळविलेल्या सीतेला तिनें उचलून आपल्या मांडीवर घेतलें आणि राम " नको, नको " म्हणत असतां त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून ती सीतेसह पाताळांत निघून गेली.

या घटनेमुळें राम भूदेवीवर अतिशय संतापला. कारण सीता आपल्याला परत मिळून तिच्या समवेत राज्य करतां यावें, ही त्याची अपेक्षा आतां भंग पावली होती. त्यानें भूदेवीला शासन करण्यासाठीं धनुष्य उचललें. पण या गोष्टी विधिलिखिताप्रमाणें दैववशात् घडायच्याच, असें सांगून गुरु वसिष्ठांनीं रामाची समजूत काढली आणि त्याचा राग शमविला.

पुढें रामानें प्रारंभिलेला अश्वमेध यज्ञ यथासांग पार पाडला. योग्य तीं संभावना करून ऋषींची आणि स्नेह्यांची त्यानें पाठवणी केली. सीतेसंबंधीचें सगळें प्रेम त्यानें आतां आपल्या दोघां मुलांवर एकवटलें.

रामानें भरताच्या मामाच्या सांगण्यावरून भरताला सिंधुदेशाचें राज्य दिलें. कांहीं काळ तेथें घालविल्यावर आपल्या दोघां मुलांना भरतानें तक्षशिला आणि पुष्कलावती या दोन राजधान्यांत अभिषेक केला आणि पुन्हां तो रामाजवळ अयोध्येंत येऊन राहिला. लक्ष्मणाला दिलेल्या राज्याची व्यवस्था पण त्यानें अशीच केली.

**अंतकाशीं रामाचा एकान्त**

अशा स्थितींत कांहीं काळ लोटला. ऐके दिवशीं साक्षात् मृत्यु मुनीचा वेष घेऊन रामाकडे आला. कांहीं गुप्त गोष्टी बोलण्यासाठीं तो रामाला एकान्तांत घेऊन गेला. आणि जो कोणी आपण बोलत असतांना या गुप्त जागीं येऊन आपल्याला बघेल त्याचा मी लगेच त्याग करीन असें रामाकडून अंतकानें वचन घेतलें.

त्या काळानें रामाला गुपित सांगितलें तें हें कीं, तूं आतां स्वर्गलोकीं चलावेंस, अशी विधात्याची असलेली इच्छा तुला सांगण्यासाठीं मी साक्षात् मृत्यूच मुनिवेषांत येथें आलों आहें.

लक्ष्मणाकडे द्वारपालाचें काम होतें. इतक्यांत रागीट दुर्वास ऋषि तेथें आले. आणि 'मला आत्तांच रामाला भेटायचें आहे' असें लक्ष्मणाला ते म्हणाले. एकान्तांत असलेल्या रामाची अट दुर्वासांना सांगण्याचें धैर्य शापाच्या भीतीनें लक्ष्मणाला झालें नाहीं त्यामुळें दुर्वासांच्या आगमनाचा निरोप सांगण्यासाठीं लक्ष्मण लगेच आंत गेला. अंतकांच्या ऐकान्तांत विघ्न आणण्याचा परिणाम राम-लक्ष्मणाला ठाऊक होता. तो त्याप्रमाणें आपण होऊनच शरयू नदीच्या कांठीं निघून गेला, आणि देहत्याग करून थोरल्या भावानें काळाला दिलेलें आश्वासन त्यानें पुरें केलें.

**स्वर्गारोहण**

रामानेंहि लव-कुशांवर राज्यभार सोंपविला आणि तो नागरिकांच्या समवेत उत्तरेकडे निघाला. कांहीं वानर व राक्षसहि त्याच्या मागोमाग निघाले. स्वतः राम बांधवांसह विमानानें स्वर्गाला निघून गेला आणि अयोध्यावासी इतर नागरिकांनींहि शरयूच्या पवित्र तीर्थांत स्नानें करून परमगति प्राप्त करून घेतली.

रामरूपांत अवतरलेल्या त्या भगवान् विष्णूनें याप्रमाणें रावणवधाचें पत्करलेलें कार्य संपविलें आणि बिभीषण व हनुमान या दोघांची दक्षिणेकडे व उत्तरेकडे विजयस्तंभाप्रमाणें स्थापना करून आपल्या मूळ स्वरूपांत तो लीन होऊन गेला.

: ६ :

# रामतनय कुश

## अयोध्येला पुन्हां वैभवप्राप्ति

रामचंद्राच्या निर्याणानंतर सातहि प्रवीरांनीं कुशाला तो वडील म्हणून राज्याचे सगळे अधिकार दिले. हा कुश एकदां आपल्या कुशावती नगरींत शयनगृहांत झोपला असतांना मध्येंच जागा होऊन पाहतो तों, त्याला पूर्वी कधींहि न पाहिलेली एक कष्टी स्त्री दिसली. हात जोडून समोर उभ्या असलेल्या त्या स्त्रीला उद्देशून कुशानें विचारलें, " हे शुभांगने, तू कोण आहेस ? कोणाची तूं पत्नी ? माझ्याकडे येण्याचें तुला काय कारण ? "

यावर त्या स्त्रीनें त्याला उत्तर दिलें, " राजा, अयोध्या नगरीची मी देवता. प्रभु रामचंद्र वैकुंठाला निघून गेले, तेव्हांपासून अनाथ नगरीसारखी माझी हीन-दीन दशा झाली. एके काळीं ऐश्वर्यांत अलकापुरीलाहि मी लाजविलें होतें. तिची आज ही अवनत दशा झाली आहे. तिच्या मुखावर तेज असें उरलें नाहीं. तेथलीं मंदिरें, मनोरे पार कोसळून गेलीं असून घरें आणि पडव्यादेखील पडून गेल्या आहेत. दिवसाढवळ्या त्या पुरीला रात्रीची अंधारी अवकळा प्राप्त झाली आहे. ज्या मार्गावरून उद्योगी लोकांची वर्दळ असायची, ते रस्ते भयाण आणि ओसाड बनले आहेत. शरयूचें पात्र तर वापराच्या अभावीं ओसाड अन् उजाड झालें आहे. म्हणून हे राजा, माझी तुला विनंती आहे कीं, तूं ही कुशावती राजधानी बदलून अयोध्याच आपल्या राज्याचें मुख्य ठिकाण कर. "

कुशराजाकडून अयोध्येला राजधानी नेण्याचें आश्वासन घेऊन ती नगरदेवता अंतर्धान पावली. राजानें ही सगळी हकीकत दुसऱ्या दिवशीं राजसभेंत सगळ्यांना सांगितली. मग चांगला मुहूर्त पाहून त्यानें कुशावतीचें दान केलें आणि सैन्य व परिवार यांसह तो अयोध्येला जाण्यासाठीं निघाला. कांहीं दिवसांनंतर कुशराजा शरयु नदीच्या तीरावर येऊन पोहोंचला. तेथें उभे असलेले पूर्वजांनीं उभारलेलें शेकडों यज्ञस्तंभ त्याच्या दृष्टीला पडले आणि त्यामुळें त्याचें हृदय पूर्वस्मृतींनीं भारावलें.

कुश राजानें नंतर कारागिरांकरवीं मोडकळीला आलेल्या अयोध्या नगरींत खूपच सुधारणा केल्या. थोड्याच अवकाशांत राजधानीची झालेली दुर्दशा पार नष्ट होऊन ती पूर्वीप्रमाणें भरभराटून नववैभवानें शोभूं लागली.

उन्हाळ्यांत एके दिवशीं राण्यांसह राजा कुश शरयुनदींत जलविहार करण्यासाठीं गेला असतांना त्याच्या दंडावरचा एक विजयालंकार नकळत पाण्यांत पडून बुडाला. तो दागिना अगस्तीकडून रामचंद्राला मिळाला असून, तोच रामानें राज्याभिषेकाच्या प्रसंगीं कुशाला दिला होता. रामानेंहि कांहीं काळ आपल्या बाहूवर धारण केलेला तो विजयालंकार व्यवहारांतहि खरोखर विजयी असाच होता. असा तो मौल्यवान दागिना सहजपणें गमवायला कुशाची तयारी नव्हती. लोभामुळें त्याला हें वाटलें असें नाहीं. कारण त्या धैर्यशाली कुशराजाला फुलें आणि दागिने या दोन्ही वस्तु सारख्याच किंमतीच्या होत्या ३६

राजानें तत्काळ पाण्यांत सर्व पटाईत पाणबुड्या कोळ्यांना तो अलंकार शोधून काढण्याची आज्ञा दिली. त्या पाणबुड्यांनींहि त्याप्रमाणें खूप धडपड केली, पण तो दागिना कांहीं त्यांच्या हातीं लागला नाहीं. तरीहि निरुत्साहित न होतां ते कोळी राजाला म्हणाले, “ आमच्या मतें राजा, हें नदींत पडलेलें तुझें आभरण डोहांत राहणाऱ्या कुमुद नांवाच्या नागानें लोभानें चोरलें असावें. ”

हें ऐकतांच संतापून कुशानें हातीं धनुष्य घेतलें व त्यावर गरुडबाणाची योजना करून तो बाण कुमुद नागावर सोडण्याच्या तयारींत तो उभा राहिला. इतक्यांत अकस्मात् त्या डोहांत लाटांची एकच खळबळ उसळली. क्षणभरांत त्यांतून बरोबर नागकन्या घेतलेला नागराज कुमुद पाण्यावरतीं आला. राजानें उगारलेलें गरुडास्त्र आवरलें. कारण सज्जन पुरुष नम्र झालेल्याशीं कधीं कठोरपणा दाखवीत नसतात. ३७

वर येतांक्षणीं त्या भुजंग राजानें मूर्धाभिषिक्त कुशाला वंदन केलें. नंतर तो राजाला म्हणाला, “राजा, मी तुझें मोठेपण चांगलें ओळखतों. तेव्हां तुला न

३६. स तुल्यपुष्पाभरणो हि धीर: ।

३७. प्रह्वेष्वनिर्बंधरुष: हि संत: ।

आवडणारी गोष्ट माझ्या हातून कशी घडेल बरें ! त्याचें असें झालें; डोहांतून एकाएकीं खालीं पडलेलें हें तुझें आभरण जवळच खेळत असलेल्या या मुलीनें पाहिलें आणि कौतुकानें तें उचलून घेतलें. तें भूषण तुझ्याच बाहूवर शोभून दिसतें. तेव्हां हे राजपुरुषा, या कुमुद्वती नांवाच्या माझ्या धाकट्या बहिणीचा पत्नी म्हणून तूं स्वीकार करावा अशी माझी इच्छा आहे."

असें बोलून त्या नागपतीनें तो विजयालंकार कुशाचा कुशाला परत दिला. राजानें त्या दागिन्याचा आणि त्या कुमुद्वतीचा दोघांचाहि मोठ्या प्रेमानें स्वीकार केला. मोठ्या समारंभपूर्वक तुताऱ्यांच्या गजरांत राजाचा नागभगिनीबरोबर थाटानें विवाह साजरा झाला.

### कुशाचा मृत्यु

कुश राजाला कुमुद्वतीपासून अतिथि नांवाचा मुलगा झाला. मुलाचें राजकुलाला शोभेल असें शिक्षण पुरें केल्यानंतर राजा कुशानें चांगल्या कुलांतल्या एका राजकन्येशीं अतिथीचें लग्न लावून दिलें. पित्याप्रमाणेंच अतिथि कुलवान् , शूर आणि मनोजयी होता.

एकदां राजा कुशाला इंद्राकडून दुर्जय नांवाच्या राक्षसाविरुद्ध लढण्यासाठीं पाचारण करण्यांत आलें. त्याप्रमाणें कुशराजा इंद्राच्या साहाय्यार्थ सैन्यासह इंद्रलोकीं गेला. देवासुरांत घनघोर युद्ध होऊन त्यांत कुशानें दुर्जयाला ठार मारलें. पण या झटापटींत कुशालाहि वर्मी घाव लागून त्यांत त्याचा अंत झाला. त्याच्याबरोबर त्याची धर्मपत्नी कुमुद्वती सती गेली.

## : ७ :
## आदर्श राजनीतिधुरंधर अतिथि

* * * * * * * * * * * * * *

मंत्र्यांनीं कुशानंतर अतिथीला राज्यावर समारंभपूर्वक बसविलें. कुशानें लढाईवर जातांना त्याप्रमाणें सांगूनच ठेवलें होतें. अभिषेकाकरितां सचिवांनीं खूप उंच सिंहासन तयार करवून त्यावर एक भव्य मंडप उभारविला.

मंडपाला रत्नांनीं सुशोभित केलेल्या चार खांबांचा आधार दिला होता. अशा सिंहासनावर अतिथि बसल्यावर प्रजाजनांनीं सोन्याच्या भांड्यांतून आणलेल्या तीर्थांनीं त्याच्यावर अभिषेक केला. बाहेर तुताऱ्यादि वाद्यांचा निनाद चालू असून, आंत मंडपांत चारहि वेदांचा मंत्रघोष सुरू होता. वडिलधाऱ्या माणसांनीं त्याला नीरांजनांनीं ओवाळलें. अथर्वमंत्रांच्या जय-घोषांत नंतर त्यावर ब्राह्मणांनीं अभिषेक केला. राजाच्या शिरावर सतत पडत असलेली अभिषेकाची जलधारा ही शंकराच्या डोक्यावर वर्षत असलेल्या गंगौघाप्रमाणें शोभा देत होती. बंदीजन राजाची स्तुति करीत भोंवतालीं उभे होते. मंगल मंत्रांनीं आणि तीर्थांच्या पवित्र जलांनीं पावन झालेल्या अतिथींच्या शरीरावर विद्युल्लतेचें तेज दिसूं लागलें. अभिषेकानंतर राजानें पुरोहितांना भरपूर दक्षिणा दिली. ब्राह्मणांनीं उलट त्याला आशीर्वाद दिले.

राज्याभिषेकाच्या आनंदाप्रीत्यर्थ अतिथीनें अनेक बंद्यांना बंदीशालेंतून बंधनमुक्त केलें. राजानें मग राज्यपदाचा मौल्यवान् वेष अंगावर चढविला. नंतर त्यानें हत्तीवर बसून नगरप्रदक्षिणा केली. नगरदेवतांची पूजा करायलाहि तो विसरला नाहीं.

**अतिथीचा आदर्श राज्यकारभार**

राज्याभिषेकाचें पाणी वाळतें व वाळतें तोंच राजानें समुद्राकिनाऱ्या-पर्यंतचा प्रदेश जिंकून स्वतःच्या छत्राखालीं आणला. राजाच्या पराक्रमाला राजगुरु वसिष्ठांच्या मंत्रोपदेशाची साथ असल्यावर कोणताहि प्रदेश जिंकणें काय कठीण होतें त्याला! धर्मनीति जाणणारा अतिथि हा प्रतिदिवशीं राजनीति जाणणाऱ्या सभासदांचें साहाय्य घेऊन वादी-प्रतिवादींचे गुतागुंतीचे तंटे यांचा काळजीपूर्वक निवाडा करीत असे. तो जे बोले तें कधीं खोटें झालें नाहीं. दान दिलेली वस्तू त्यानें कधीं परत घेण्याचें मनांतहि आणलें नाहीं.[३८] शत्रूंचा पराभव तो करी पण त्यानें त्यांचीं राज्यें कधीं गिळंकृत केलीं नाहींत. तरुण वय, देखणें रूप आणि ऐश्वर्य हीं एकेक देखील माणसाला उन्मत्त करतात, पण तीनहि तीं एकत्र अतिथीच्या ठिकाणीं असून देखील तो कधीं उन्मत्त झाला नाहीं. अशा रीतीनें प्रजेचीं मनें जिंकून घेऊन तो प्रज्वलित बनला. प्रजेच्या या भक्तीमुळें तो अजिंक्यहि ठरला.

---

३८. **यदुवाच न तन्मिथ्या । यद्ददौ न जहार तत् ।**

राजाला युद्ध कांहीं नेहमींच करावें लागत नसे. जेव्हां शत्रु समोर असतील तेवढ्यापुरता लढाईचा प्रसंग त्याला पार पाडावा लागे. अशा प्रकारें बाहेरचे शत्रु हे अशाश्वत आणि दूर देशीं राहाणारे असतात. पण कामक्रोधादि विकार हे नेहमीं शरीरांत राहाणारे जवळचेच असतात. पण राजानें त्यांनाहि जिंकून घेतलें होतें. राज्यश्री ही जात्या चंचल खरी; पण अतिथीच्या ठिकाणीं मात्र ती स्थिर राहिली होती.

पराक्रमविरहित केवळ नीतिमान् असणें हा भित्रेपणा होय. आणि नीती-शिवाय नुसतें पराक्रमी असणें ही पशुता होय.[३९] पण अतिथि हा शूर तसा नीतिमानहि होता. त्यामुळें तो सर्वत्र यशस्वी होत गेला. त्यानें आपल्या राज्यांत हेरांचें जाळेंच पसरून ठेवलें असल्यानें त्याला राज्यांत घडणाऱ्या सगळ्या घटनांची अगदीं बित्तंबातमी असे. राज्यविषयक कर्तव्यांत तो रात्रंदिवस जागरूक होता. मंत्र्यांच्याबरोबर तो रोज गुप्तपणें विचार करी. पण अशा गुप्त गोष्टींचा स्फोट त्यानें कधींहि होऊं दिला नाहीं. शत्रूमध्यें आणि स्वकीयांमध्येंहि परस्परांना माहीत नसलेल्या हेरांची पेरणी त्यानें केल्यानें झोपेंतहि त्याची जागरूकता कधीं भंग पावली नाहीं.

राजा अतिथि हा शत्रूवर चढाई करून जात असे खरा. पण त्यानें आपले किल्ले मात्र शत्रूला चढाई करण्याच्या दृष्टीनें फार कठीण करून ठेवले होते. सगळ्या प्रकारचें वैभव त्याच्या पायांवर लोळण घेत होतें. तरी पण त्यानें दुष्ट मार्गांचा केव्हांहि अवलंब केला नाहीं. प्रजेच्या मनां-तला कसल्याहि प्रकारचा असंतोष दूर करण्यास तो समर्थ असतांनाहि मुळांत असंतोषच उत्पन्न होणार नाहीं याची तो काळजी घेई. त्याचें प्रत्येक कृत्य हें प्रजाहिताचें, विचारपूर्वक व बोभाटा होऊं न देतां केलेलें असें असे.

राजधर्म, काम आणि अर्थ या तीनहि बाबींकडे त्याचें सारखेंच लक्ष असल्यानें त्यांपैकीं एकहि बाब राजाच्या उपेक्षेनें अपुरी राहिली नाहीं. कोणाहि मित्र-राष्ट्रांना त्यानें प्रमाणाबाहेर श्रीमंत होऊं दिलें नाहीं.तसेंच त्यांना गरिबीची स्थिति न यावी याची पण त्यानें काळजी घेतली. शत्रूवर स्वारी करण्याअगोदर त्याच्या आणि आपल्या बळाबळाचा तो बारकाईनें विचार

---

३९. कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् ।

करी. आणि आपल्यापेक्षां कमी शक्ति असलेल्या शत्रूवरच तो चालून जाई. ढग पाण्यानें भरलेले असले तरच त्यांचें चातक पक्षी अभिनंदन करतात ४०. म्हणून त्यानें आपलें द्रव्यभांडार नेहमीं समृद्ध राखलें होतें. कारण रित्या खजिन्याच्या माणसाला लोक कांहींच किंमत देत नसतात शत्रुराज्यांतले उद्योगधंदे त्यानें जरी धुळीस मिळवले तरी स्वतःच्या राज्यांत मात्र ते भरभराटींतच ठेवले. स्वतःच्या देहाइतकी किंबहुना त्यापेक्षां अधिक तो आपल्या शस्त्रास्त्रसज्ज सैन्याची काळजी घेत असे. त्यानें आपला प्रभाव, उत्साह आणि विचारविनिमय यांना कधींहि ओहोटी लागूं दिली नाहीं.

त्याच्या राज्यांतला व्यापार जसा राजरस्त्यावरून चाले, तसाच तो जलमार्गानें, अरण्यांतून आणि पर्वतांमधल्या अवघड वाटांमधूनहि चालत असे. ज्ञान, शक्ति, संपदा आणि सेवा ह्या सर्वांचें पालन प्रजेकडून तो यथासांग करवून घेई आणि त्यासंबंधांत येणाऱ्या विघ्नांचें तो निवारणहि करी. त्याच्या राज्यांतली भूमि धान्यफळांनीं समृद्ध होती. शेतांतून धान्यें आणि खाणींतून वेगवेगळीं मूल्यवान् खनिज द्रव्यें पण त्याला मिळत असत. अरण्यांतून हत्तीसारख्या उपयोगी प्राण्यांची वाढ होत असे. अशा प्रकारें रानावनांचें आणि धनधान्य प्रसवणाऱ्या भूमीचें राजा मनापासून रक्षण करतो, हें जाणून या आपल्या संरक्षणाच्या मोबदल्यांत वनें आणि भूमि हीं राजाला वरीलप्रमाणें जणुं करभार देत असत.

त्याच्या अंगीं वक्तृत्व, शत्रूंच्या दमनाची सिद्धता, तर्ककुशलता, स्मरणशक्ति, नीतिनिपुणता आणि विद्वत्ता हे राज्यशासकांना लागणारे सहाहि गुण होते. तसेंच त्याच्यापाशीं शरीरबल, शौर्य, सैन्यबळ, शस्त्रास्त्रें, राज्यनीतिनिपुणता आणि आवश्यक वस्तूंचा भरपूर पुरवठा हीं सहा प्रकारचीं बळेंहि होतीं. साम, दाम, दंड आणि भेद ही दंडनीति तो यथाकाल उपयोजित असल्यानें शत्रूकडून कोठल्याहि प्रकारचे अडथळे न होतां त्याच्या साम्राज्यांत तो असीम सुखानें राज्य करूं शकत होता. कपटयुद्धांत निपुण असला तरी तो नेहमींच व्यवहारांत नीति आणीत असे. त्यामुळें विजयलक्ष्मी त्याच्यापाशीं एखाद्या पतिव्रतेप्रमाणें प्रेमभावानें राहिली होती. केवळ

---

४० **अंबुगर्भो हि जीमूतः चातकैरभिनंदते ।**

पराक्रमाच्या जोरावर शत्रूला जिंकण्याचा त्याच्या स्वभाव होता. पण त्याच्या प्रतापाशीं कोणीहि शत्रु बरोबरी करण्यास धजत नसल्यानें प्रायः प्रत्यक्ष युद्ध करण्याचा प्रसंग त्यावर क्वचित्‌च येई. चंद्राची नेहमींच क्षय-वृद्धि होत असते. समुद्रहि भरती-ओहोटीनें कमीअधिक होतो. पण अतिथि राजाची नेहमींच भरभराट असे. त्याच्या दानशूरतेमुळें त्याच्या राज्यांत कोणीहि दरिद्री उरला नाहीं. त्यानें केलेल्या सत्कृत्यांची कोणी स्तुति केली तर ती त्याला मुळींच खपत नसे.

उगवलेल्या सूर्यनारायणाप्रमाणें अतिथि राजा आपल्या नुसत्या नीतिमान् आणि सत्यवादी दर्शनानें दुष्कृत्यांचा नाश करी आणि त्यायोगें त्यानें प्रजेला स्वतंत्र, स्वावलंबी आणि निर्भय बनविलें होतें. राजाच्या अंगच्या गुणांची वाहवा आणि आदर यांना त्याच्या शत्रूंच्या हृदयांतहि स्थान प्राप्त झालें होतें. ४१ शास्त्राच्या मर्यादा यत्किंचितहि न ओलांडणारा हा राजा स्वतःच्या प्रभावानें सर्व राजांचा राजराजेश्वर बनला होता. अतिथि शौर्यादि गुणांत चारहि लोकपालांच्या तोडीचा, लोकोपयोगित्वाच्या संबंधांत पंचमहाभूतांच्या योग्यतेचा आणि भूदेवीचें संरक्षण करण्यांत सात कुलपर्वतांच्या तुलनेचा होता. पृथ्वीवरील इतर सगळे राजे अतिथि सम्राटाची आज्ञा शिरसावंद्य मानीत. अश्वमेधांतल्या त्याच्या दानशूरपणानें कुबेरालाहि लाजविलें. यथाकाल पाहिजे तेवढा पाऊस पाडून इंद्रानें, प्रजेवरील अकालीं मरणाची आपत्ति टाळून यमानें, जलमार्ग निर्विघ्न करून वरुणानें आणि द्रव्यभांडार नेहमीं भरलेलें ठेवून कुबेरानें अतिथीला त्याच्या राज्यकारभारांत चांगली साथ दिली.

अतिथीची पत्नी ही निषधदेशच्या राजाची मुलगी. तिच्या पोटीं आलेल्या पराक्रमी मुलाचें अतिथीनें 'निषध' म्हणजे निषध नांवाच्या पर्वताप्रमाणें सामर्थ्यवान्, असें नांव ठेविलें. निषधाच्या पायगुणानें अतिथीच्या राज्याची अधिकच भरभराट झाली. त्यामुळें सगळी प्रजा आणि त्याबरोबरच राजाहि अतिशय आनंदित झाला.

---

**४१ गुणास्तस्य विपक्षेऽपि गुणिनो लेभिरेऽन्तरम् ।**

८७ २०५५२ —— अरिम....
८८८ ५-७-६७



सम्राट अतिथीनें दीर्घकालपर्यंत राजैश्वर्य उपभोगिलें. नंतर म्हातारपण आल्यावर त्यानें आपल्या सुपुत्रावर—निषधावर—राज्यव्यवस्था सोंपविली. अतिथीनें आजन्म शुद्ध आणि पवित्र कर्मांचेंच आचरण केलें असल्यानें नंतर तो त्याला सहजपणें लाभलेल्या स्वर्गलोकांत निघून गेला.

: ८ :

## बालराजा सुदर्शन

* * * * * * *

कुशाचा नातू निषध यानेंहि एकछत्री साम्राज्याचा उपभोग घेतला. निषधानंतर रघुवंशीय वीस राजे गादीवर बसले. विसावा बालराजा सुदर्शन. तो लहान सहा वर्षांचा असतांना त्याचा पिता ध्रुवसंधि हा शिकार करीत असतांना सिंहाकडून मारला गेला. म्हणून मग प्रधानांनीं बालवयी सुदर्शनाला राज्यावर बसवून त्याच्या नांवें राज्यकारभार सुरू केला. हा बालराजा आकाशांतल्या बालचंद्राप्रमाणें, अरण्यांतल्या सिंहछाव्याप्रमाणें अथवा विशाल सरोवरांतल्या एकाकी कमलकलिकेप्रमाणें शोभत होता.

छोट्या सुदर्शनाच्या मस्तकावरील राजमुकुट त्याच्या पित्याच्या पराक्रमाची आठवण करून देई. सुदर्शनाची स्वारी जेव्हां हत्तीवर बसून राजधानींत मिरवे, तेव्हां प्रजाजन त्याच्याकडे आदरभावानें पहात असत. सोन्यासारख्या कांतीचें त्याचें लहानगें शरीर त्या सिंहासनाला शोभवीत असे. त्याचे इवलेसे पाय सिंहासनाच्या खालीं लीलेनें किंचित् लोंबकळत असतांना मोठमोठ्या मुकुटधारी राजांना त्यांवर डोकें ठेवतांना अभिमानच वाटे. इंद्रनील मणी आकारानें लहान असला, तरी मोलानें त्याला जसें 'महानील' म्हणून गौरवितात, त्याप्रमाणें त्या कुमार राजाला 'महाराजा' म्हणून गौरविण्यांत कोणालाहि कमीपणा वाटत नव्हता. कानावर झुलपें ठेवण्याइतका सुदर्शन राजा लहान होता, तरी त्याची आज्ञा उल्लंघिण्यास कोणताहि राजा धजला नाहीं.

सुवर्णाचा मुकुट मस्तकावर धारण केलेल्या व कुंकुम तिलकानें

भालप्रदेशाला शोभा आणणाऱ्या त्या हंसतमुख सुदर्शनाचे शत्रु त्याच्या नुसत्या नांवाच्या उच्चारानें नम्र होत शिरीषपुष्पाप्रमाणें सुकुमार असलेल्या त्या राजाचें सामर्थ्य असें विलक्षण होतें कीं, त्याला आसमुद्र पृथ्वीचें राज्य करण्यांत कोणतीहि अडचण उपस्थित झाली नाही. एकीकडे त्याचें विद्या-संपादन चालू असतांनाच अनुभवी वृद्ध अमात्यांच्या संगतींत असल्यानें तो दंडनीतींतहि प्रवीण झाला. विजयशाली राज्यलक्ष्मीनें त्याच्या गळ्यांत तो कुमार असतांनाच माळ घालून ती स्वतःला धन्य समजूं लागली.

कुमार राजा सुदर्शनाला अद्याप जरी धनुर्विद्या येत नव्हती, किंवा तलवारीचे हातहि अजून त्याला शिकायचे होते, तरी त्याच्या नांवाच्या नुसत्या दराऱ्यानें त्याच्या राज्याचें रक्षण होत होतें. त्याचें वय जसजसें हळूहळू वाढत होतें, तसतशी त्याच्या ठिकाणच्या राजगुणांचीहि वाढ त्याप्रमाणांत होत होती. फारसे परिश्रम न घेतां पूर्वजन्मार्जित पुण्याच्या जोरावर त्यानें धर्मार्थकाममूलक तीन वेदांचें अध्ययन पदरांत पाडून घेतलें आणि त्याबरोबरच प्रजेचें प्रेम आणि विश्वासहि संपादिला. कालांतरानें राजाला तारुण्य प्राप्त झालें आणि पृथ्वी व राज्यलक्ष्मी या दोन स्त्रियांना सौंदर्यांत मागें टाकणाऱ्या एका रूपसंपन्न स्त्रीशीं त्याचें यथाशास्त्र लग्न झालें.

कांहीं वर्षें सुखानें राज्य केल्यावर वेदविद्यासंपन्न आणि जितेंद्रिय सुदर्शन राजानें म्हातारपणीं अग्निवर्ण नांवाच्या आपल्या मुलाला आपल्या जागीं राज्यपदावर बसविलें आणि त्यानंतर तो निमिषारण्यांत तपस्येसाठीं निघून गेला. त्या ठिकाणीं त्यानें पर्णकुटी उभारली. दर्भाची शय्या बनविली. तीर्थ-स्थानांनीं शरीर पवित्र केलें. आणि मनांत कोणतीहि ऐहिक इच्छा न बाळगतां ईश्वरसाक्षात्कारासाठीं तपाचरण आरंभिलें.आणि अंतीं त्याला सद्गति लाभली.

सुदर्शनाचा मुलगा अग्निवर्ण हा मात्र विलासी निघाला. तरुणपणींच त्यानें मंत्र्यांवर राज्यकारभार सोंपवून तो स्वतः विलासासाठीं स्त्रियांसह दूर जाऊन राहिला. कालांतरानें तो तेथें क्षयरोगाला बळी पडला.

कविकुलगुरु कालिदासानें एकोणीस सर्गांत गायिलेल्या रघुवंशाचा शेवट या ठिकाणीं झाला.

• • •

... ग्रंथ संग्रहालय ...
क्र. १०९७६

REFBK-0010977